लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-२०१३ च्या स्थानिक संस्था अहवालामधील नगरविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.३, ४.५, ४.६, ४.८ व ४.९) यावरील

चव्वेचाळीसावा अहवाल

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक नोव्हेंबर, २०१८ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर.
नोव्हेंबर, २०१८

लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-२०१३ च्या स्थानिक संस्था अहवालामधील नगरविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.३, ४.५, ४.६, ४.८ व ४.९) यावरील

चव्वेचाळीसावा अहवाल

एचबी १४१९–१

लोकलेखा समिती

२०१७-२०१८

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि. स. स.

सदस्य

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१२) श्री. सुरेश ऊर्फ बाळुभाऊ धानोरकर, वि.स.स.

(१३) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(१४) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१५) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स.

(१९) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(२०) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

*(२१) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(२२) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

**(२३) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

(२३अ) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

***(२४) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

(२५) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

निमंत्रित

****(२६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी विधानसभा व दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठित करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM).

(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(४) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि. अ.

(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(६) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी.

(७) श्री. रवींद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी.

* **श्री. विजय** उर्फ **भाई गिरकर, वि.प.स यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. विजय** उर्फ **भाई गिरकर, वि.प.स यांची पुन्हा दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

** **श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर श्री.विक्रम काळे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

*** **श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे जागा रिक्त झाली.**

**** **श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी निमंत्रित समिती सदस्य म्हणून दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी नामनियुक्ती केली होती. दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे त्यांची निमंत्रित समिती सदस्यत्वाची नियुक्ती संपुष्टात आली होती. ते विधानपरिषद सदस्य म्हणून पुन्हा निवडून आल्यामुळे मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून रिक्त जागेवर नामनियुक्ती केली.**

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरून भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२- २०१३ च्या स्थानिक संस्था अहवालामधील नगरविकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.३, ४.५, ४.६, ४.८ व ४.९) यावर विचार करून लोकलेखा समितीचा **चव्वेचाळीसावा** अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक ६ व २६ जून, दिनांक २९ ऑगस्ट, २०१८ रोजी प्रधान सचिव, नगरविकास विभाग व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र, नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचे देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट “अ” मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट “ब” मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीत नगरविकास विभागासंदर्भात तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून प्रारुप अहवालाला मान्यता दिली.

विधान भवन,	**गोपालदास अग्रवाल,**
मुंबई/नागपूर,	समिती प्रमुख,
दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८.	लोकलेखा समिती.

अनुक्रमणिका

अ.क्र. (१)	विभाग व तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना	(पाच)
(१)	**नगरविकास विभाग**	१
	(परिच्छेद क्र. ४.३)	१
	(परिच्छेद क्र. ४.५)	३
	(परिच्छेद क्र. ४.६)	५
	(परिच्छेद क्र. ४.८)	९
	(परिच्छेद क्र. ४.९)	१०

नगरविकास विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील **परिच्छेद क्र. ४.३ "महसूलाची हानी"** यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

परिच्छेद क्रमांक- ४.३ महसूलाची हानी

१.१ बाह्य स्त्रोतांचा वापर करून खाजगी संस्थांच्या मदतीने संरक्षण शुल्क वसूलीचे कंत्राट २२ महिन्यांच्या प्रदीर्घ काळात अंमलात न आणल्यामुळे मिरा-भाईंदर महानगरपालिकेला रु. ३९.६२ कोटी इतकी महसूली हानी झाली.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (MMC Act, १९४९) च्या कलम ४४६(१)(अ)(फ) सी कलम १४७ अंतर्गत, महानगरपालिकेच्या क्षेत्रातून मार्गस्थ होणाऱ्या वाहनांकडून संक्रमण शुल्क (संरक्षक शुल्क) वसूल करण्यासाठी महानगरपालिकांना त्यांच्या आयुक्तांद्वारे प्राधिकृत करण्यात आले आहे. त्यानुसार, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने (MBMC) महानगरपालिका क्षेत्रातून मार्गस्थ होणाऱ्या वाहनांवर संरक्षक शुल्क आकारले आणि स्वतःचे स्त्रोत वापरून ऑक्टोबर, २००७ ते ऑगस्ट, २००८ या कालावधीत (११ महिने) रु. ८०.९३ लाख प्राप्त केले. त्यानंतर, सदर रक्कमेची वसूली करतेवेळी वाहन थांबविताना महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे ही मोहिम बंद करण्यात आली.

नोव्हेंबर, २०१० मध्ये, संरक्षक शुल्काची वसूली बाह्य स्त्रोतांचा वापर करून करण्यासाठी MBMC ने निविदा मागविल्या. मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. (कंत्राटदार) या उच्चतम बोलीदाराला संरक्षक शुल्क वसुल करण्यासाठी सात वर्षांच्या कालावधीसाठी कार्यादेश जारी करण्यात आला (मे, २०११) संरक्षक शुल्क प्रदान सुचीनुसार, कंत्राटदाराने दोन हप्ते आगावू भरावयाचे होते म्हणजे मागणी दाखल करताना रु. ८३.४२ लाख आणि व्यवहारांच्या पहिल्या वर्षासाठी ५० आठवड्यांकरीता प्रत्येक आठवड्यासाठी रु. ४१.७१ लाख भरावयाचे होते. कराराचे पुढील वर्ष सुरू होण्याच्या एक महिना आधी त्या वर्षासाठीची रक्कम प्रदानाची सुची जारी करावयाची होती. कंत्राटदाराकडून कामास प्रारंभ होण्यापूर्वी MBMC ने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC), भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) आणि वाहतूक पोलीस विभाग यांच्याकडून ना-हरकत प्रमाणपत्रे (NICs) प्राप्त करावयाची होती.

मुख्य लेखा अधिकारी (CAO), MBMC यांच्याकडील दस्तऐवजांची तपासणी करताना असे निदर्शनास आले (जानेवारी, २०१३), की, जरी मे, २०११ मध्ये कार्यादेश जारी करण्यात आला होता. तरी संबंधित प्राधिकाऱ्यांकडून NOC प्राप्त होण्यात पाच ते १२ महिन्यांचा कालावधी लागला. NHAI कडून (ऑक्टोबर, २०११), MSRDC कडून (जानेवारी, २०१२ पासून संरक्षक शुल्क वसूलीचे काम सुरू करण्याविषयी कंत्राटदाराला सूचना जारी केल्या नव्हत्या. परिणामी, जून, २०१२ ते मार्च, २०१४ (२२ महिने किंवा ९५ आठवडे) या कालावधीसाठीचे संरक्षक शुल्क वसूल न केल्यामुळे MBMC ला रु. ३९.६२ कोटी चा महसूली तोटा झाला होता.

MBMC च्या आयुक्तांनी असे प्रतिपादन केले (मे, २०१३), ४ नोव्हेंबर, २०१० रोजी स्थायी आदेश जारी करून महापालिका आयुक्तांनी एजंटद्वारे (बाह्य स्त्रोत) संरक्षक शुल्काची आकारणी व वसूली करण्यात अधिमान्यता दिली होती आणि तो आदेश डिसेंबर, २०१० मध्ये स्थायी समितीने मंजूर केला होता. महानगरपालिकेने घेतलेले हे निर्णय महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाला कळविण्यात आले होते. परंतु, त्यांना ते मान्य असल्याचे त्यांनी कळविले नाही. आयुक्तांनी पुढे असेही सांगितले की, महापालिका क्षेत्रात जकात रद्द करण्यात आली आहे आणि १ एप्रिल २०१० पासून स्थानिक संस्था कर (LBT) आकारण्यास सुरूवात करण्यात आली आहे. तसेच, ज्या ठिकाणी LBT लागू असतो अशा ठिकाणी संरक्षक शुल्काची आकारणी व वसुली करण्यासाठी MMCA अधिनियम, १९४९ मध्ये कोणतीही विशिष्ट तरतूद नाही.

खालील मुद्यांमुळे हे उत्तर मान्य करता येत नाही :–

- MMCA अधिनियम, १९४९ च्या कलम ४६६(१)(अ)(फ) अंतर्गत, महानगरपालिका क्षेत्रातून मार्गस्थ होणाऱ्या वाहनांवर संरक्षक शुल्क आकारण्यासाठी स्थायी आदेश जारी करण्यासाठी आयुक्तांना अधिकार देण्यात आले आहेत. म्हणूनच यासाठी शासनाची मान्यता प्राप्त करण्याची गरज नव्हती.

- कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने २०१२-१३ मध्ये LBT (रु. ८६.१० कोटी) सह संरक्षक शुल्क (रु. ११.२४ कोटी) प्राप्त केले होते. नाशिक महानगरपालिकेने २२ मे, २०१३ ते ३१ मार्च, २०१४ दरम्यान LBT (रु.४४४.५१ कोटी) सह संरक्षक शुल्क (रु. १२.५७ कोटी) प्राप्त केले होते आणि ठाणे महानगरपालिकेने २०१३-१४ दरम्यान LBT (रु.३७०.०१ कोटी) सह संरक्षक शुल्क (रु. ४६.६१ कोटी) प्राप्त केले होते असे लेखापरिक्षकांकडे असलेल्या माहितीवरून निदर्शनास आले. अशा प्रकारे, LBT बरोबर संरक्षक शुल्काची आकारणी MBMC कडे कोणतेही सबळ कारण नव्हते.

जून, २०१३ मध्ये हे प्रकरण शासनाकडे निर्दिष्ट करण्यात आले, त्यांचे उत्तर मार्च, २०१४ पर्यंत प्राप्त झालेले नव्हते.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नगरविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

१.२ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम (१२७ अ) नुसार महानगरपालिकेस जकात कर बसविता येतो. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १२७ (२)(इ) नुसार शहर महानगरपालिकेचे हद्दीमध्ये प्रवेश करणारे वाहनांवर वाहन कर (पथकर) लागू करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. तर उक्त अधिनियमाच्या कलम १४७ मध्ये तात्काळ निर्यातीसाठी आयात केलेल्या वस्तूंबाबत विवेचन करण्यात आले आहे. त्यानुसार त्वरीत निर्यात करावयाचा जकातपात्र माल शहरात प्रवेश करणाऱ्या ज्या वाहनांमधून नेला जातो, त्या वाहनांवर महानगरपालिका क्षेत्रातील प्रवेश नाक्यावरून निर्गमण नाक्यावर जाताना लेखी परवानगी व परागमन पास देता येतो. तद्नंतर संबंधितांकडून मार्गस्थ दाखला शुल्क (एस्कॉर्ट फी) वसूल करता येते.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून दिनांक ३१ मार्च २०१० पर्यंत जकात कर वसूल केला जात होता. तद्नंतर शासन अधिसूचना, नगरविकास विभाग, दिनांक १ जानेवारी २०१० अन्वये इतर काही महानगरपालिकांबरोबरच मिरा-भाईंदर महानगरपालिकेस दिनांक १ एप्रिल २०१० पासून उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी शहराच्या हद्दीमध्ये होणाऱ्या मालांच्या प्रवेशावर जकात किंवा उपकर यांच्याऐवजी स्थानिक संस्था कर बसविण्याबाबत निर्देश देण्यात आले. त्यानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून दिनांक १ एप्रिल २०१० पासून स्थानिक संस्था कर वसुल करण्यास सुरूवात करण्यात आली व जकात कर रद्दबातल ठरविण्यात आला. पारगमन शुल्काची वसुली जकात कर अस्तित्त्वात असेपर्यंतच करणे अभिप्रेत असल्याने जकात कर रद्द केल्यानंतर आपोआपच पारगमन शुल्काची वसुली बंद होणे अपेक्षित होते.

पारगमन शुल्क (रहदारी पावती/Transit Pass) वसुलीची पद्धत बंद करण्याबाबतच्या शासनाच्या निर्णयास आव्हान देणारी याचिका क्र. २०१४/७०५३ मा. उच्च न्यायालयाच्य औरंगाबाद खंडपीठात दाखल करण्यात आली होती. या याचिकेच्या अनुषंगाने राज्य शासनाने मा. उच्च न्यायालयास असे सादर केले की, अशी शुल्क वसुली ही जकात वसुलीच्या कर प्रणालीचा अविभाज्य भाग असल्याने जकात वसुलीची पद्धत बंद केल्यानंतर पारगमन शुल्क सुरू ठेवता येणार नाही. शासनाच्या या भुमिकेस अनुसरून मा. उच्च न्यायालयाने दिनांक १० सप्टेंबर २०१४ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयात पुढील निरिक्षण नोंदविले आहे.

"In our view, the State Government was justified in directing the Corporation not to collect escort fees and to dismental the infrastructure created for collection of charges at the entry point of the city and permit the transporters to move the goods within and outside the city limits without putting any artificial barriers."

मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून ऑक्टोबर, २००७ ते ऑगस्ट, २००८ या कालावधीत मार्गस्थ दाखला शुल्क (Escort fee) आकारण्यात आले होते. त्यावेळी महानगरपालिका क्षेत्रात जकात कर प्रणाली अंमलात होती. त्यामुळे महानगरपालिकेची मार्गस्थ दाखला शुल्क (Escort Fee) वसूलीची कार्यवाही अधिनियमातील तीतूर्दींशी सुसंगत अशीच होती.

तथापि, दिनांक १ एप्रिल २०१० पासून महानगरपालिका क्षेत्रात स्थानिक संस्था कर प्रणाली अंमलात आल्यांनतर दिनांक २७ मे २०११ रोजीच्या कार्यादेशान्वये मार्गस्थ दाखला शुल्क वसूलीकरीता खाजगी ठेकेदाराची नियुक्ती करण्याबाबत निर्गमित केलेले आदेश हे अधिनियमातील तरतूर्दींशी सुसंगत नव्हते. यासंदर्भात नमूद करण्यात येते की, मार्गस्थ दाखला शुल्क प्रणाली लागू करण्याकरीता भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादीत व पोलीस अधिक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण (वाहतूक विभाग) या ३ प्राधिकरणांकडून ना-हरकत दाखले मिळण्याकरीता अर्ज केले होते. त्यापैकी पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांच्या व्यतिरिक्त उर्वरित दोन प्राधिकरणांची ना-हरकत प्रमाणपत्र महानगरपालिकेस प्राप्त झाले. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांनी दिनांक २ ऑगस्ट २०११ व दिनांक १७ सप्टेंबर २०१२ च्या पत्रान्वये ना-हरकत प्रमाणपत्र देता येणार नाही, असे कळविल्याने महानगरपालिकेकडून मार्गस्थ दाखल शुल्क वसूलीची कार्यवाही झाली नाही. यासंदर्भात नमूद करण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे या कालावधीत दिनांक १ एप्रिल २०१० स्थानिक संस्था कर प्रणाली लागू करण्यात आल्यामुळे तेथे मार्गस्थ दाखला शुल्क वसूली अधिनियमातील तरतूर्दींशी सुसंगत नव्हते. सबब, आक्षेपामध्ये नमूद करण्यात आल्यानुसार या कालावधीत मार्गस्थ दाखला शुल्क वसूल करण्यात आले नसले तरी, वसूली न करण्याची/होण्याची कार्यवाही ही अधिनियमातील तरतूर्दींशी सुसंगत असल्याने मार्गस्थ दाखला शुल्क वसूली न झाल्याने महसूलाची हानी झाली, असे म्हणता येणार नाही.

वरील विविचेन विचारात घेता, उक्त कालावधीत मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून स्थानिक संस्था कर वसूल करण्यात येत असल्याने मार्गस्थ दाखला शुल्क/पारगमन शुल्क वसूल करणे अभिप्रेत नव्हते. सबब, महानगरपालिकेच्या महसुलाची हानी झाली आहे, असे म्हणता येणार नाही.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. ४.५ "निष्काळ खर्च" यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

परिच्छेद क्रमांक-४.५ निष्फळ खर्च

१.३ नागपूर सुधार प्रन्यासने माहिती तंत्रज्ञान इमारतीचे सार्वजनिक खाजगी भागीदारी पद्धतीने योग्य नियोजन न केल्यामुळे रु.१.८३ कोटीचा निष्फळ खर्च झाला.

गायत्रीनगर, नागपूर येथे नागपूर सुधार प्रन्यास (नासुप्र) ने माहिती तंत्रज्ञान (IT) संकुल टप्प्याटप्प्याने बांधण्याचे प्रस्तावित (नोव्हेंबर,२००५) केले, ज्याचा अंदाजित खर्च रु.२.७७ कोटी एवढा होता. नकाशे, आराखडा आणि अंदाजपत्रक तयार करण्यासाठी संमंत्रक वास्तुशास्त्रज्ञाची नियुक्ती (मे, २००६) करण्यात आली ज्यांचा मोबदला कामाच्या संपूर्ण किंमतीच्या ३ टक्के दरा एवढा होता. पहिल्या टप्प्याच्या कामासाठी जुलै, २००६ मध्ये निविदा मागविण्यात आल्या, ज्यामध्ये तळघर, आणि पहिल्या मजल्याच्या कामाचा समावेश होता. बांधकामाचे कंत्राट (नोव्हेंबर, २००६) कंत्राटदाराला रु.२.८८ कोटी किंमतीत, १५ महिन्याच्या कालावधीत (फेब्रुवारी, २००८) पूर्ण करण्याच्या अटीवर बहाल करण्यात आले.

अभिलेख्यांच्या पडताळणीत (सप्टेबर, २०१०) असे निदर्शनास आले की, कंत्राटदाराने तळघराच्या खोदकामाचे आणि प्रलंबित सिमेंट कॉंक्रिट (RCC) स्तंभाचे रु. १.७८ कोटी किंमतीचे बांधकाम जून, २००८ पर्यंत केले. वास्तुशास्त्रीय शुल्क म्हणून वास्तुशास्त्रज्ञ संमंत्रकाला रु. ४.८६ लाख रकमेचे भुगतान करण्यात आले. कामाच्या प्रगती दरम्यान, नागपूर सुधार प्रन्यासला असे आढळून आले की, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रालगतच्या भागात खाजगी चालकांद्वारे बांधण्यात आलेल्या खाजगी इमारतींचे सौंदर्यीकरण केलेले होते. खाजगी चालकाने बांधकामाच्या अत्याधुनिक तंत्राचा तसेच अत्याधुनिक बांधकाम साहित्याचा उपयोग केला होता. त्या इमारती मध्ये माहिती तंत्रज्ञानाला लागणाऱ्या सर्व प्रकारच्या अत्याधुनिक सुविधा होत्या. नासुप्रला असेही आढळले की, नागपूर शहराचा समावेश JNNURM योजनेमधील शहरांमध्ये असल्यामुळे शहरात अनिवार्य सुधारणा करण्यास नासुप्र बांधील होते, ज्यात सार्वजनिक खाजगी भागीदारीला (PPP) प्रोत्साहन देण्याचा समावेश होता. वरील बाबींना गृहित धरुन नासुप्रने चालू असलेला कंत्राट रद्द करण्याचे ठरविले (ऑगस्ट,२००९) आणि सार्वजनिक खाजगी भागीदारीतून संकल्पचित्र, बांधा, स्वीकारा, वापरा आणि हस्तांतरित करा (DBOOT) या तत्वावर प्रकल्पाचे कार्यान्वयन करण्याचे ठरविले.

निविदा सूचनेद्वारे DBOOT तत्वावर माहिती तंत्रज्ञान संकुलाचा विकास करण्यासाठी ऑक्टोबर, २०११ मध्ये, प्रस्तावासाठी विनंती (RFP) मागविण्यात आली आणि फेब्रुवारी, २०१२ मध्ये हे काम सवलती दरास रु. १५.०५ कोटी अधिक वार्षिक भू-भाडे रु. ३०.१० लक्ष, ३० वर्षाच्या सवलत कालावधीसाठी, जो की ९० वर्षापर्यंत वाढविला जाऊ शकतो, या आर्थिक मोबदल्यावर देण्यात आले. लेखापरिक्षेत असे आढळले की, पहिला कंत्राट रद्द केल्यामुळे आपले आर्थिक हित सांभाळण्यासाठी नासुप्रने कुठलीही यंत्रणा/योजना तयार केली नाही. नासुप्रने DBOOT प्रकल्पाकरिता RFP दस्तावेज तयार केले, त्यामध्ये कामाच्या ठिकाणी जवळपास १,४०० चौ.मी. पायाचे RCC बांधकाम झालेले असण्याचा उल्लेख होता. परंतु कोणत्याही प्रकारच्या आर्थिक विवरणाचा उल्लेख नव्हता, अशा प्रकारे अंशतः बांधकामावर नासुप्रने सुरुवातीला केलेला रु. १.८३ कोटीचा खर्च निष्फळ ठरला.

अधीक्षक अभियंता (SE) नासुप्रने ही वस्तुस्थिती मान्य केली की, पहिल्या कंत्राटदाराने केलेल्या कामाची किंमत REP दस्तावेजात समाविष्ट केली नव्हती. नासुप्रने असे नमूद (मार्च, २०१३) केले की, "तिथे जसे असेल तसे" या तत्वावर, निवडलेल्या कंत्राटदाराला जमीन प्रदान करण्यात आली होती आणि त्याला माहिती तंत्रज्ञान संकुलाचा विकास उपलब्ध असलेल्या जुन्या मजबूत सिमेंट कॉंक्रिट (RCC) बांधकामाचा उपयोग करुनच करावा अशी कोणतीही सक्ती करण्यात आली नव्हती. अधिक्षक अभियंत्यानी पुढे नमूद केले की, निवडलेल्या कंत्राटदाराला नासुप्रने मंजूर केलेले नकाशे, आराखडा आणि विनिर्देश याप्रमाणे बांधकाम करावयाचे होते.

नासुप्रला माहिती तंत्रज्ञान संकुलाचे पहिल्या कंत्राटदाराद्वारे बांधकाम हाती घेते वेळीच, आजूबाजूला सुरेख प्रमुख दर्शन व अत्याधुनिक सुविधा सह IT-ITES इमारती मोठया संख्येत असण्याची जाणीव होती. यावरुन असे स्पष्टपणे निदर्शनास येते की I.T. पार्कच्या विकासाचे नियोजन सुरुवातीपासूनच चुकीचे होते, ज्यामुळे रु. १.८३ कोटीचा निष्फळ खर्च झाला.

ही बाब जून, २०१३ मध्ये शासनास कळविण्यात आली, मार्च, २०१४ पर्यंत त्यांचे उत्तर प्रतिक्षित आहे.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नगरविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

१.४ महालेखापाल यांचेकडून सदरहू परिच्छेदात आक्षेपीत करण्यात आलेली रक्कम रु. १.८३ कोटी एवढी नसून प्रत्यक्षात ती रु. १.७० कोटी एवढी आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे :—

अ.क्र.	तपशील	महालेखापाल यांनी नमूद केलेली रक्कम (रु.कोटीत)	प्रत्यक्षात खर्च करण्यात आलेली रक्कम (रु.कोटीत)
१	वास्तुशास्त्रज्ञ यांची फी	०.४८६	०.०४८६
२	तळघराचे खोदकाम, आरसीसी स्तंभाचे बांधकाम यासाठी कंत्राटदारास देण्यात आलेली रक्कम	१.७८	१.६५
	एकूण	**१.८३**	**१.७०**

गायत्रीनगर, नागपूर येथील प्रश्नाधीन जागेवर नागपूर सुधार प्रन्यासकडून ज्या इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आले होते. तो परिसर एमआयडीसीद्वारे माहिती तंत्रज्ञान संकुलासाठी व कार्यालयासाठी राखीव ठेवण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने नागपूर सुधार प्रन्यासकडून प्रश्नाधीन जागेवर माहिती तंत्रज्ञान संकुलासाठी इमारत उभारण्याचे प्रस्तावित केले होते व त्यानुसार लेखापरिच्छेदात नमूद केल्यानुसार प्रक्रियाही पार पाडली होती, ही वस्तुस्थिती खरी आहे.

तथापि, सदरची इमारत बांधण्याचे सन २००५ मध्ये निश्चित केल्यानंतर, या परिसरात राखीव असलेल्या प्रयोजनासाठी सुयोग्य इमारत असणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आल्यानंतर, विश्वस्त मंडळ, नागपूर सुधार प्रन्यास यांनी ठराव क्र.६/१०६९ (तहकूब) दिनांक ४/१०/२००८ अन्वये

सार्वजनिक खाजगी भागीदारीतून संकल्पचित्र, बांधा, स्वीकारा, वापरा आणि हस्तांतरित करा (DBOOT) या तत्वावर "जिथे, जसे असेल तसे" (on as is where is basis) या तत्वावर प्रकल्पाचे कार्यान्वयन करण्याचे ठरविले.

नागपूर सुधार प्रन्यासकडून वेगवेगळया प्रकारचे प्रकल्प राबविले जातात, असे प्रकल्प राबवित असताना, नागपूर सुधार प्रन्यासला कोणत्याही प्रकारचे आर्थिक नुकसान होईल अशा बाबी टाळल्या जातात.

प्रस्तुत प्रकल्प रद्द करतानाही पूर्णपणे व्यावसायिक व आधुनिक तंत्रज्ञान समोर ठेवून, सदरचा निर्णय घेण्यात आलेला आहे. व त्याअनुषंगाने, या जागेवर नवीन संकुलाचे बांधकाम करताना, सदरचा प्रकल्प सार्वजनिक खाजगी भागीदारीतून संकल्पचित्र, बांधा, स्वीकारा, वापरा आणि हस्तांतरित करा (DBOOT) या तत्वावर " जिथे, जसे असेल तसे" (on as is where is basis) या तत्वावर विकसीत करण्यास देण्यात आलेला आहे.

या प्रकल्पातून नागपूर सुधार प्रन्यासला रु. १५.०५ कोटी प्रिमीयम (टप्प्याटप्प्याने) म्हणून व प्रतीवर्षी या प्रिमीयमच्या रकमेवर २ टक्के रक्कम रु. ३०.१० लक्ष भूभाटक म्हणून मिळणार आहे.

संबंधीत विकसकाकडून प्रिमीयमपोटी आतापर्यंत रु. ८.३० कोटी इतकी रक्कम नागपूर सुधार प्रन्यासला ऑक्टोबर, २०१५ पर्यंत प्राप्त झाली आहे. पुढील हप्ते प्रत्येकी रु. २.२५ कोटी क्रमशः ऑक्टोबर २०१६, २०१७, २०१८ ला प्राप्त होणार आहेत.

उक्त वस्तुस्थिती पहाता, नागपूर सुधार प्रन्यासकडून या मूळ प्रकल्पावर रु. १.७० कोटी खर्च झालेला असला तरी, सदरहू प्रकल्पाचे काम सार्वजनिक खाजगी भागीदारीतून संकल्पचित्र, बांधा, स्वीकारा, वापरा आणि हस्तांतरित करा (DBOOT) या तत्वावर देताना "जिथे, जसे असेल तसे" (on as is where is basis) या तत्वावर देण्यात आलेले आहे. त्यामुळे मूळ प्रकल्प सुधारित करताना नागपूर सुधार प्रन्यासकडून यापूर्वी या प्रकल्पावर झालेला खर्च सुधारित नियोजनामध्ये समाविष्ट केला असल्याचे दिसून येते.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. ४.६ "निधीची अडवणूक आणि किंमतीतील टाळता येण्याजोगी वाढ" यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

परिच्छेद क्रमांक- ४.६ "निधीची अडवणूक आणि किंमतीतील टाळता येण्याजोगी वाढ"

१.५ नागपूर सुधार प्रन्यासद्वारे जलतरणिकेच्या बांधकामाचे योग्य नियोजन न केल्यामुळे सहा वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी रु. एक कोटी एवढ्या निधीची अडवणूकच झाली नाही तर प्रकल्पाच्या किंमतीत रु. १.७२ कोटीची वाढ झाली.

उत्तर नागपूर येथील रहिवाशांना मनोरंजनपर सुविधा देण्याच्या दृष्टीने नागपूर सुधार प्रन्यासने (ना.सु.प्र.) वैशालीनगर येथे रु. १७५.०० लक्ष एवढया अंदाजित किंमतीत जलतरणिका बांधण्याचा निर्णय घेतला (जुलै, २००४) महाराष्ट्र शासन आणि ना.सु.प्र. यांनी या प्रकल्पासाठी प्रत्येकी रु. ५० लक्ष अंशदान द्यावे या अटीवर नगरविकास विभाग (न.वि.वि.) महाराष्ट्र शासन यांनी विशेष शासन अनुदाना अंतर्गत या उद्देशासाठी रु. एक कोटीचा निधी राखून ठेवला. महाराष्ट्र शासनाने त्यांचा रु. ५० लक्ष एवढा हिस्सा ना.सु.प्र. ला ऑगस्ट, २००४ मध्ये वितरीत केला.

अभिलेख्यांच्या पडताळणीत (सप्टेंबर, २०१०) आणि ना.सु.प्र.ने सादर केलेल्या माहितीच्या (ऑक्टोबर, २०१३) तपासणीत प्रकल्पाच्या अंमलबजावणीत खालील अपर्याप्तता निदर्शनास आल्या :

- आर्थिक टंचाईमुळे ना.सु.प्र. ने त्यांचे रु. ५० लक्ष अंशदान दिले नाही.
- जलतरणिकेच्या चार घटकांच्या बांधकामासाठी ना.सु.प्र.ने एकूण रु. १०७.१० लक्ष किंमतीवर डिसेंबर, २००४ ते सप्टेंबर, २००७ दरम्यान चार कंत्राट बहाल केले.
- जे जून, २००५ ते जानेवारी, २००८ दरम्यान (दोन ते सहा महिने) पूर्ण करावयाचे होते. चार घटकांपैकी, फक्त दोन घटक जानेवारी, २००७ (वाढीव कालावधी दरम्यान) आणि जुलै, २००९ (वाढीव कालावधीच्या एक वर्षा नंतर) मध्ये पूर्ण करण्यात आले. उर्वरित दोन घटकांपैकी एक घटक एप्रिल, २००६ मध्ये अंशतः पूर्ण झाला आणि संकल्पचित्रातील बदलामुळे दुसऱ्या घटकाचे काम थांबविण्यात आले. ऑक्टोबर, २०१३ पर्यंत कंत्राटदारांना रु. १००.१० लक्षाचे भुगतान केले गेले. (परिशिष्ट-XVI)
- सुरुवातीला जलतरणिकेच्या बांधकामासाठी रु. ७६.६३ लक्ष किंमतीचा अंदाज बांधला होता आणि रु. ७६.५४ लक्ष किंमतीला निविदा मंजूर करण्यात आली. तथापि, कंत्राटदाराला कार्यादेश या अटीवर निर्गमित करण्यात आले की खर्च फक्त रु.५० लक्षा एवढाच मर्यादित करण्यात येईल. परिणामी, निविदेमध्ये समाविष्ट असलेल्या ९५ कामांच्या बाबींपैकी फक्त २० कामाचे कार्यान्वयन करण्यात आले. आणि त्याचे अंतिम देयक रु. ४९.९५ लक्ष म्हणजेच महाराष्ट्र शासनाद्वारे ऑगस्ट, २००४ मध्ये दिलेल्या रु.५० लक्ष अंशदानाइतपत होते. वर्ष २००५-०६ ते २००७-०८ दरम्यान महाराष्ट्र शासनाद्वारे दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत (DVSY) वितरित केलेल्या अनुदानामधून रु. ५०.१५ लक्षचा (रु. १००.१० लक्ष-रु. ४९.९५ लक्ष) उर्वरित खर्च करण्यात आला.
- ऑक्टोबर, २०१३ पर्यंत जलतरणिकेला कुठल्याही प्रकारे पाणीपुरवठ्याची जोडणी करण्यात आली नव्हती. जरी ना.सु.प्र.ने जलतरणिकेपासून अंदाजे ५०० मीटरच्या अंतरावर स्थित विहिरीपर्यंत पाईप लाईन टाकली होती तरी विहीरीतून पाणी काढण्यात आले नाही कारण विहीरीच्या बाजूची जागा एका मंदिर संस्थेच्या अनधिकृतपणे ताब्यात होती.
- जलतरणिकेचे बांधकाम पूर्ण झाले नसतांनाही नागपूर सुधार प्रन्यासच्या विश्वस्त मंडळाने सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP) अंतर्गत जलतरणिकेच्या आवारातच "कलब हाऊस" चे बांधकाम करण्याचे ठरविले (सप्टेंबर, २०११). समंत्रक वास्तुशास्त्रज्ञाने जलतरणिकेचे काम पूर्ण करण्यासह या प्रकल्पाच्या किंमतीचा रु.११ कोटीचा अंदाज बांधला होता. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाद्वारे ना.सु.प्र. ने दिलेले रु.१.३५ कोटीचे विशेष शासन अनुदान ऑक्टोबर, २०१३ पर्यंत उपयोगात आणले गेले नाही. कारण समंत्रक वास्तुशास्त्रज्ञाद्वारा तयार केलेले क्लब हाऊस चे प्रमुख दर्शन (elevation) आणि संकल्पचित्र आधीच असलेले स्नान घर पाडून करावयाचे होते, ज्यास ना.सु.प्र. कडून मंजुरी प्राप्त झाली नव्हती.

ना.सु.प्र. ने सांगितले (ऑक्टोबर, २०१३) की "कलब हाऊस" चा प्रस्ताव आता रद्द करण्यात आला आहे. अपूर्ण जलतरणिकेचे बांधकाम लवकर करण्यात येईल आणि त्यानुसार रु. २४६.५७ लक्षाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करून महाराष्ट्र शासनाकडे मान्यतेकरिता सादर करण्यात येईल. दलित वस्ती सुधार योजना २०११-१२ अंतर्गतही रु. १०० लक्षची तरतूद करण्यात आली आहे. ना.सु.प्र. ने पुढे असेही नमूद केले की, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेद्वारा पडताळणी केल्यानंतर जलतरणिकेसाठी पाण्याची व्यवस्था त्याच आवारात वेगवेगळया ठिकाणी स्थित असलेल्या दोन बोअर विहिरीद्वारा करण्यात येईल.

वरील घटनांच्या क्रमावरुन असे स्पष्ट होते की, जलतरणिका प्रकल्प अंमलबजावणीच्या नियोजनात गंभीर उणिवा होत्या. निधीच्या उपलब्धतेची खातरजमा न करता अथवा प्रकल्पाच्या सुसाध्यतेचा अभ्यास/सर्वेक्षण न करता प्रकल्पाचे कार्यान्वयन करण्यात आले. त्यामुळे सहा वर्षापेक्षा (ऑक्टोबर, २०१३) पर्यंत जास्त कालावधीसाठी रु. एक कोटी एवढया निधीची अडवणूक करण्यात आली. शिवाय प्रकल्पाच्या किंमतीत रु. १.७२ कोटी ची वाढ झाली.

ही बाब जुलै, २०१३ मध्ये शासनास कळविण्यात आली. मार्च, २०१४ पर्यंत त्यांचे उत्तर प्रतिक्षित आहे.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नगरविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

१.६ ● नागपूर सुधार प्रन्यासकडून सन २००४-२००५ मध्ये मौजा बिनाखी, वैशालीनगर येथे स्वीमींग पूल कॉम्प्लेक्स चा प्रकल्प तीन टप्प्यात पूर्ण करण्याच्या दृष्टीने, वास्तुशास्त्र सल्लागार यांचेकडून वेगवेगळया टप्प्याचा प्रकल्प अहवाल मागविला होता. त्यानुसार या प्रकल्पामध्ये करावयाची कामे व त्यांची किंमत याचे विवरण खालीलप्रमाणे :—

● **पहिला टप्पा**

उत्तर नागपूर, मौजा बिनाखी, वैशालीनगर येथे स्वीमींग पूलाचे बांधकाम करणे (पहिला टप्पा)

कामे	किंमत (रु.लक्ष)
जलतरण तलाव	५०.२५
स्नानगृह	३६.४०
डेक	२६.७७५
बॅलन्सिंग टंक	०४.०६
भूमिगत पाण्याची टाकी	१.६०
संरक्षक भिंत	९.७६
जल शुद्धीकरण सयंत्र	१०.००
पाण्याखालील प्रकाश योजना	०१.००
विद्युतीकरण	३.२३
उद्यान व वाहनतळ	४.५०
जलतरणासाठी विविध ॲसेसरिज	२.७५
एकूण :-	**१५०.३३**
कॅन्टीजन्सीज (१०%)	१५.०३
प्रोफेशनल फी (४%)	६१
व्यवसाय कर (१०.२०%)	०.६७
एकूण :-	**१७२.६६**

õ **दुसरा टप्पा**

मौजा बिनाखी येथे स्वीमींग पूलाचे बांधकाम करणे (दुसरा टप्पा)

कामे	किंमत (रु.लक्ष)
व्यायाम शाळा (जिमन्याशिअम)	३९.००
एकूण :-	**३९.००**

तिसरा टप्पा

मौजा बिनाखी येथे स्वीमींग पूलाचे बांधकाम करणे (तिसरा टप्पा)

कामे	किंमत (रु. लक्ष)
युथ हाऊस	१२०.००
बॅडमींटन कोर्ट	२७.००
ओपन कोर्ट	११.५०
कॅन्टीन आणि उपहार गृह	१०.००
एकूण :-	**१६८.५०**

- या तीन टप्प्याची मिळून या योजनेची एकूण किंमत रु. ३८०.१६ इतकी होती.
- पहिल्या टप्प्यातील कामे निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचा नासुप्रने निर्णय घेतला.
- त्यानुसार नासुप्रने पहिल्या टप्प्यातील एकूण किंमतीच्या रकमेपैकी रु. ७६.६३ लक्ष ची निविदा बोलाविली. सदरची निविदा न्यूनतम रक्कम रु. ७६.५४ ला प्राप्त झाली.
- तथापि, यावेळी नागपूर सुधार प्रन्यासच्या आर्थिक टंचाईमुळे नागपूर सुधार प्रन्यासच्या विश्वस्त मंडळाने सदरचे अनुदान देता येणार नाही असे ठरविले होते. त्यामुळे त्यावेळी शासनाकडून मंजूर रु. ५०.०० लक्ष च्या मर्यादेत जलतरण तलावाचे काम करण्याबाबत कंत्राटदाराला कळविण्यात आले.
- यावेळी नासुप्रची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने नासुप्रला त्यांचा हिस्सा देता आला नाही, ही बाब खरी आहे.

याबाबतची (जलतरणिकेचे चार घटक यांची) वस्तुस्थिती खालील तक्त्यात नमूद आहे :—

एकूण कामे	एकूण किंमत (रु. लक्ष)	कार्यादेश दिनांक	पूर्ण करण्याचा कालावधी	कामे कधी पूर्ण झाली	प्रत्यक्ष अदा केलेली रक्कम
जलतरणिकेचे बांधकाम.	५०.००	१६/१२/२००४	६ महिने	४/४/२००६ (सुमारे १६ महिने)	५१.३९
सिमेंट कॉंक्रिटचा फरसबंदी रस्ता.	२५.६५	२७/६/२००६	४ महिने	२५/१/२००७ (सुमारे ७ महिने)	२१.३९
स्नानघर व इतर नागरिक कामे.	२५.३२	२१/९/२००७	४ महिने	१४/७/२००८ (सुमारे ९ महिने)	२५.३१
शुद्धीकरण सयंत्राची उभारणी आणि कार्यान्वयन करणे.	१३.९३	१९/७/२००७	२ महिने	— (अद्याप अपूर्ण)	१०.२१
एकूण :-	**११४.९**				**१०८.३०**

- होय. तथापि, त्यावेळी नासुप्र विश्वस्त मंडळाने, नागपूर सुधार प्रन्यासची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने, नासुप्रचा निधी उपलब्ध करून दिलेला नव्हता. परंतु, शासनाकडून त्यावेळी मंजूर रु.५०.०० लक्ष इतका निधी वित्तीय नियमावलीनुसार विहित कालमर्यादेत खर्च होणे आवश्यक असल्याने, या निधीच्या मर्यादेत कंत्राटदारास काम करण्याच्या अटीच्या अधीन राहून, तेवढ्याच किंमतीचे काम देण्यात आले. यास कंत्राटदाराचा कोणताही आक्षेप नव्हता.

- दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत जिल्हाधिकारी यांचेकडून सन २००५-०६ मध्ये रु.२५.६५ लक्ष, सन २००६-०७ मध्ये रु.३९.२५ लक्ष व सन २००७-०८ मध्ये रु.३४.४० लक्ष असा एकुण रु.९९.३० लक्ष इतका निधी प्राप्त झाला. त्यामुळे शासनाकडून जसजसा निधी प्राप्त होईल तसतसा प्रकल्प पूर्णत्वाकडे नेण्याचे नासुप्रचे त्यावेळी धोरण होते.
- यापैकी सन २००५-०६ व २००६-०७ च्या निधीमधून १) सिमेंट कॉंक्रीटचा फरसबंदी रस्ता (C.C.Pavement). २) बाथ हाऊसचे काम व ३) जलशुद्धीकरण सयंत्र या कामासाठी रु.५६.९१ लक्ष इतका निधी खर्च झालेला आहे. उर्वरित खर्च सन २०१५-१६ मध्ये झालेला आहे.
- जलतरणिकेला पाणीपुरवठ्याची जोडणी झालेली होती. तथापि, जलतरण तलावाचे काम अपूर्ण असल्यामुळे प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू करण्यात आलेला नव्हता. सद्य:स्थितीत जलतरण तलावाचे काम अंतिम टप्प्यात असून, डिसेंबर, २०१५ अखेर ते पूर्ण करण्याचा मानस आहे. जलतरणिकेमधून पाणीपुरवठा सुरळित सुरू आहे.
- उक्त नमूद तीन टप्प्यातील कामे एकुण ४८८२ चौ.मी. या जागेवर प्रस्तावित होते.

  यापैकी मूळ आराखड्यामध्ये झालेले बांधकाम तोडून त्या जागेवर नव्याने (स्वीमींग पूलचे बांधकाम तसेच ठेवून) "क्लब हाऊस" चे बांधकाम PPP तत्वावर प्रस्तावित करण्यास नासुप्रच्या विश्वस्त मंडळाने सप्टेंबर,२०११ मध्ये निश्चित केले होते.
- नव्याने प्रस्तावित "क्लब हाऊस" व जलतरणिकेच्या कामाचा रु.११.६० कोटी इतक्या रकमेचा अंदाज केलेला होता.
- तथापि, सदर ठरावाची कोणत्याही प्रकारे अंमलबजावणी झालेली नसल्याने, प्रश्न उद्‌भवत नाही.
- शासनाकडून सन २००८-०९ मध्ये रु.५०.०० लक्ष व सन २००९-१० मध्ये रु. ८४.९७ लक्ष असे एकूण रु. १३४.९७ लक्ष इतका निधी "क्लब हाऊस" च्या बांधकामासाठी प्राप्त झाला, हे खरे आहे.
- तथापि, प्रस्तुत जागेवर यापूर्वी शासकीय निधीतून खर्च करून, बांधकामे झालेली होती. ही बांधकामे तोडून या जागेवर "क्लब हाऊस व जलतरणिकेचे" चे बांधकाम करण्याचे प्रस्तावित होते. परंतु शासकीय खर्चातून झालेली बांधकामे तोडून, त्याठिकाणी शासनाकडून सन २००८-०९ व २००९-१० मध्ये प्राप्त झालेल्या निधीतून "क्लब हाऊस" चे बांधकाम करणे वित्तीय शिस्तीला धरून नसल्याने, "क्लब हाऊस" हा प्रकल्प नासुप्रने पुढे राबविलेला नाही.
- सदरचा निधी शा.नि.क्रमांक-व्हीआयपी-७२/२०१२/प्र.क्र.९९/नवि-१६, दिनांक १५ मे २०१२ च्या आदेशान्वये नागपूर उत्तर मतदार संघातील इतर कामावर खर्च करण्यास मान्यता दिलेली आहे.
- त्यानुसार सदरचा निधी सन २०१५-१६ अखेर पूर्णपणे खर्च झालेला आहे.
- त्यावेळी जलतरण तलावासाठी वेगवेगळ्या ठिकाणाहून किती पाण्याचे स्त्रोत निर्माण होऊ शकतात, याची पडताळणी नासुप्रने केलेली होती, हे खरे आहे. तथापि, सद्य:स्थितीत या प्रकल्पासाठी उपलब्ध असलेल्या विहीरीमध्ये मुबलक पाणीसाठी असल्याने, अन्य पाणीपुरवठा व्यवस्था करण्याची आवश्यकता भासलेली नाही.
- या प्रकल्पाचा प्रकल्प आराखडा सन २००४-०५ मध्ये निश्चित करण्यात आलेला होता. विहित कार्यपद्धतीनंतर सदरचा प्रकल्प सन २००५-०६ मध्ये प्रत्यक्षात सुरू झाले. कारण त्यावेळी नागपूर सुधार प्रन्यासची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे, नागपूर सुधार प्रन्यासकडून त्यावेळी निधी उपलब्ध करून देता येत नव्हता.
- त्यानुसार या प्रकल्पासाठी सन २००४-०५ ते सन २०१२-१३ या कालावधीत वेगवेगळ्या योजनेंतर्गत शासनाकडून आतापर्यंत एकूण रु.४९६.४४५ लक्ष इतका निधी मंजूर झालेला आहे.
- यापैकी वळता करण्यात आलेला रु.१३४.९७ लक्ष व अप्राप्त निधी रु.११२.१७५ लक्ष वजा जाता एकूण रु.२४९.३० लक्ष इतका निधी प्रत्यक्ष प्राप्त झालेला आहे.
- यापैकी रु.२४०.४५ लक्ष इतका निधी पूर्णपणे खर्च झालेला आहे.
- प्रकल्पाचा सन २००४-०५ चा एकूण (तीन टप्प्याचा) प्रकल्प खर्च रु.३८०.१६ लक्ष इतका होता.
- प्रकल्प पूर्ण होईपर्यंत या प्रकल्पाचा एकूण खर्च अंदाजे रु.३६१.४७ लक्ष इतका अपेक्षीत आहे.
- एकूण प्रकल्प खर्चाच्या किंमतीपैकी शासनाने दिलेला निधी वगळता उर्वरित (रु.३६१.४७ लक्ष - रु.२४०.४५ लक्ष) रु.१२१.०२ इतका खर्च नागपूर सुधार प्रन्यास त्यांच्या निधीतून करणार आहे.
- नागपूर सुधार प्रन्यासने निधीची उपलब्धता विचारात घेऊनच त्याचे नियोजन करणे आवश्यक होते. तथापि, तसे न झाल्याने, प्रकल्प पूर्ण होण्यास जास्तीचा कालावधी लागलेला आहे. भविष्यात नागपूर सुधार प्रन्यासकडून राबविण्यात येणा-या प्रकल्पामध्ये अशी परिस्थिती उद्‌भवू नये याची काळजी घेण्याबाबत नागपूर सुधार प्रन्यासास सूचना देण्यात येतील.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील **परिच्छेद क्र. ४.८ "व्यापारी संकुलाच्या बांधकामाची वेळ आणि खर्चात वाढ व महसूल हानी"** यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.–

परिच्छेद क्रमांक- ४.८ "व्यापारी संकुलाच्या बांधकामाची वेळ आणि खर्चात वाढ व महसुल हानी"

१.७ व्यापारी संकुलाच्या बांधकामावर, रु. ८५ लाख खर्च केल्यानंतर निधीच्या कमतरतेमुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने जानेवारी, २००८ मध्ये हे काम थांबविले. हे काम मार्च, २०१४ पर्यंतदेखिल पूर्ण झाले नव्हते, परिणामी त्याच्या मुल्यात रु. ३.१९ कोटीची वाढ झाली, तर रु. ८५ लाखाचा निधी हा सात वर्षापेक्षा जास्त काळापासून अडकून पडला आणि भाडेपट्टी भाड्यापाटी रु. १.५२ कोटी प्रतिवर्ष इतका आवर्ती महसुली हानी झाली.

रस्ता रुंदीकरणामुळे विस्थापित झालेल्या दुकानदारांच्या पुनर्वसनासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने (PCMC) चिंचवड येथील राखीव भूखंडावर एक व्यापारी संकुल बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता दिली होती (जून, २००३). हे काम रु. १.४२ कोटी निविदा मुल्ल्यावर एका कंत्राटदाराला देण्यात आले होते. (ऑक्टोंबर २००५). जे एप्रिल २००७ पर्यत पूर्ण व्हावयास हवे होते. कामासाठी नोव्हेंबर, २००७ पर्यंत मुदतवाढ दिली गेली होती. परंतु, रु. ०.८५ कोटी खर्चून, ७० टक्के काम पूर्ण झाल्यावर निधीच्या कमतरतेच्या कारणावर PCMC ने काम थांबविले (जानेवारी, २००८).

त्यांनतर PCMC ने बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा (BOT) या तत्वावर उर्वरीत काम पूर्ण करण्याचा निर्णय घेतला ज्याला BOT समितीने जुलै, २००९ मध्ये मान्यता दिली रु.५.९६ कोटी बोली देणारे मे. इंटरनॅशनल कंन्वहेयर लिमिटेड, कोलकता (विकासक) हे उच्चतम बोलीदार ठरल्यामुळे ऑक्टोबर, २०१० मध्ये विकासकाला वाटप पत्र (LOA) जारी केले गेले आणि विकासकाला LOA प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत PCMC आणि विकासक यांच्या दरम्यान एक विकास करार करावयाचा होता. BOT प्रकल्प विकासकाला ७० वर्षाच्या भाडेपट्टी कालावधी करीता देण्यात आला होता.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, स्थानिक रहिवासी, विधानमंडळ सदस्य आणि महापालिकेच्या माजी सदस्यांनी प्रकल्पास जोरदार विरोध दर्शविल्यामुळे BOT प्रकल्पाच्या कामामध्ये प्रगती होऊ शकली नाही. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने PCMC ला, व्यापारी संकुलाचा पालिकेच्या स्वतःच्या निधीतून आणि BOT व्दारे विकास करण्याचा तुलनात्मक अभ्यास करून जे जास्त फायदेशीर आहे त्यानुसार निर्णय घेण्याचा सल्ला दिला होता (नोव्हेंबर, २०१० व जानेवारी, २०११). PCMC ने UDD ला असे कळविले (फेब्रुवारी, २०११) की, संदर्भित संकुलाचा BOT तत्वावर विकास करणे अधिक फायदेशीर होते (कारण कंत्राटदारास निर्धारित अधिमूल्य आगाऊ भरावे लागणार होते) आणि याबाबतीत पुढे मार्गदर्शन करण्यास सांगितले. लेखापरीक्षणात असे आढळून आले की, UDD ने त्यांचा निर्णय कळविण्याऐवजी सप्टेंबर, २०१२ मध्ये म्हणजे जवळजवळ १९ महिन्यानंतर नवीन शंका उपस्थित केल्या ज्यांचे निरसन PCMC ने जानेवारी, २०१३ मध्ये केले.

मार्च, २०१३ मध्ये PCMC ला असे लक्षात आले की (अ) UDD कडून निर्णय घेण्यात विलंब झाला होता, (ब) ऑक्टोबर, २०१० मध्ये LOA जारी करून दोन वर्षे आणि पाच महिने उलटल्यावरही विकासकाबरोबर कोणताही विकास करार करण्यात आला नव्हता, (क) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९, अंतर्गत तयार करण्यात आलेल्या नवीन विनियमांना लक्षात घेता महानगरपालिकेच्या मालकीच्या सर्व मालमत्ता जास्तीत जास्त ३० वर्षासाठी भाडेपट्टी वर देण्यास मुभा होती, तरीही, BOT प्रकल्प ७० वर्षाच्या भाडेपट्टीवर देण्यात आला होता आणि (ड) दरम्यानच्या कालावधीत जमिनीच्या किंमतीमध्ये वाढ झाली होती. वरील सर्व प्रतिकूल घटक विचारात घेऊन PCMC ने LOA रद्द करण्याचा प्रस्ताव मांडला जो जूलै, २०१३ मध्ये BOT समितीने मंजूर केला. महानगरपालिकेच्या स्वतःच्या निधीमधून उर्वरीत बांधकाम हाती घेऊन रस्ता रुंदीकरणामुळे विस्थापित झालेल्या दुकानदारांचे लवकरात लवकर पूनर्वसन करण्याचाही निर्णय घेण्यात आला.

PCMC ने जानेवारी २०१३ मध्ये केलेल्या अंदाजानुसार शिल्लक कामाची किंमत रु.३.७६ कोटी होती व मार्च, २०१४ पर्यंतदेखील कामासाठी निविदा मागवण्यात आल्या नव्हत्या. सुधारित आराखडे आणि अंदाजपत्रक तयार केल्यावर व निविदा मागवल्यावर प्रकल्पाच्या किंमतीमध्ये वाढ होण्याची शक्यता होती. मार्च, २०१४ पर्यंत महानगरपालिकेच्या स्वतःच्या अंदाजानुसार, सात वर्षाहूनही अधिक काळ (जानेवारी, २००८ ते मार्च, २०१४) रु.०.८५ कोटी एवढा निधी अडकून राहणे आणि भाडेपट्टी भाड्यापोटी प्राप्त व्हावयाच्या कमीत कमी वार्षिक रु.१.५२ कोटी इतक्या महसूलाचा आवर्ती हानी होणे या बरोबरच प्रकल्पाची किंमत रु.३.१९३८ कोटीने वाढली होती.

PCMC च्या आयुक्तांनी वस्तूस्थिती मान्य केली व असे नमूद केले (जूलै, २०१३) की महाराष्ट्र शासनाकडून योग्य निर्देश प्राप्त न झाल्यामुळे त्यांना याबाबतीत अंतिम निर्णय घेता येऊ शकला नाही.

जुलै,२०१३ मध्ये ही बाब शासनास कळविण्यात आली. त्यांचे उत्तर मार्च, २०१४ पर्यंत प्राप्त झाले नव्हते.

महालेखापाल कार्यालयाचे अभिप्राय :-

(१) प्रकल्पांचे बांधकाम जानेवारी, २००८ मध्ये अधिवेशनात आले व बीओटी कमिटीमार्फत जुलै, २००९ मध्ये प्रस्तावित करणेत आले या दीड वर्ष कालावधीतील विलंबाची कारणे.

(२) शासनाकडील निर्णय कळविणेस १९ महिन्यांचा विलंब झालेबाबतची कारणे?

(३) नवीन निविदा अंतिम झाली असल्यास कामाची निविदा दिनांक.

(४) यापूर्वी केलेले बांधकाम सुस्थितीत असले तरी बांधकामावर केलेला खर्च रु. ८५ लाख मागील ७ वर्षांपासून अडकून पडला आहे. सदरचे बांधकाम इतर कामासाठी वापरात आणले आहे काय ?

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नगरविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

१.८ सन २००८-०९, २००९-१० या आर्थिक वर्षामध्ये महानगरपालिकेची आर्थिक स्थिती खालावल्याने त्या वेळेस महानगरपालिकेमार्फत विकास कामावर करणेत येणाऱ्या खर्चात कपात करणेत येऊन प्राधन्याने आवश्यक असणारी कामेच पूर्ण करणेत येत होती. या प्रकल्पाचे काम महानगरपालिकेने स्वखर्चातून करण्यात येत होते. निधीच्या कमतरतेमुळे सदरचे काम जानेवारी, २००८ मध्ये थांबविणेत आले. तदनंतर सदरचे काम महानगरपालिका स्तरावर करावे किंवा बीओटीवर करावे याबाबतचा निर्णय विचाराधीन असलेने निर्णय घेणेस विलंब झाला आहे.

बीओटी तत्त्वावरील निविदेप्रक्रियेप्रमाणे मे. इंटरनॅशनल कन्वहेअर लि. यांना इरादापत्र (LOI) देणेत आले. दरम्यानच्या काळात सदरचा प्रकल्प बीओटी तत्त्वावर विकसित न करता पुन्हा महानगरपालिकेमार्फत करणेत यावा यासाठी विषयांकित प्रकल्पाबाबत स्थानिक नगरसदस्य व इतर यांनी शासनस्तरावर मा. मुख्यमंत्री महोदया कडून तसेच स्थानिक आमदार श्री. विलास लांडे व इतर विधानसभा सदस्य यांनी तारांकित प्रश्न क्र. २३९००

(प्रपत्र क्र.१) अन्वये काही मुद्द्यांच्या खुलासा नगरविकास, महाराष्ट्र शासन यांच्याकडील पत्र क्र. विसप्र-३०१०/प्र.क्र. ५८५/नवि-२२, दिनांक १६.११.२०१० व क्र. पीसीसी- ३०११/११४/प्र.क्र. ७०८/नवि-२२, दिनांक २१.९.२०१२

(प्रपत्र क्र.२) अन्वये महानगरपालिकेकडील सविस्तर अहवाल मागवून विषयांकित प्रकल्पाबाबत महानगरपालिकेचे आर्थिक फायद्याचा निर्णय घ्यावा असे कळविणेत आले. यानुसार महानगरपालिकेमार्फत तारांकित प्रश्नास व मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या पत्रास आनुषंगिक खुलासा दिनांक २८.२.२०११ व दिनांक २८.१.२०१३.

(प्रपत्र क्र.३) रोजीच्या पत्रान्वये महानगरपालिकेमार्फत सादर करण्यात आलेला आहे.

यामध्ये महानगरपालिकेची तत्कालीन आर्थिक परिस्थिती लक्षात घेता महानगरपालिकेमार्फत उर्वरित प्रकल्प बीओटी तत्त्वावर लवकरात-लवकर पूर्ण करणे आर्थिक हिताचे असल्याचे म्हणणे मांडले व प्रकल्पाबाबत पुढील मार्गदर्शन करणेत यावे अशी विनंती शासनास करण्यात आली होती. या सर्व घडामोडीमध्ये १९ महिन्यांचा विलंब झालेला आहे.

सदर उर्वरित काम महानगरपालिकेमार्फत पूर्ण करण्यासाठी रु.१,५२,५०,०००/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करुन निविदा काढली असून प्राप्त निविदामधून लधुत्तम १३.५% कमी दराची रु. १४४७०६५०/- निविदा स्वीकृत करून मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. १४९०९, दि. ३.२.२०१५ अन्वये ठेकेदाराबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळाली आहे व त्याप्रमाणे कामाचे आदेश निर्गमित केले आहेत.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील **परिच्छेद क्र. ४.९ "मालमत्ता कराची कमी आकारणी"** यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

परिच्छेद क्रमांक- ४.९ मालमत्ता कराची कमी आकारणी

१.९ मालमत्तेचे पट्टीयोग्य मूल्य ठरविताना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या तरतुदींचे अनुपालन न केल्यामुळे रु. ४३.९६ कोटीच्या मालमत्ता कराची कमी आकारणी झाली परिणामी पुणे महानगरपालिकेला महसुली हानी झाली.

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका (बीपीएमसी) अधिनियम, १९४९ च्या अनुसूची ड अंतर्गत प्रकरण VII (कर नियम) च्या नियम ७ (१) तरतुदींनुसार मालमत्ता कर देय असलेल्या कुठल्याही इमारती किंवा जमिनीचे पट्टीयोग्य मूल्य (आरव्ही) ठरविताना अशी जमीन किंवा इमारत भाड्याने दिल्यास, अशी जमीन किंवा इमारत दरवर्षी सर्वसाधारणपणे ज्या अपेक्षित दराने भाड्याने दिली जाईल त्या वार्षिक भाड्याच्या १०% रक्कम वजा करावी व दुरुस्ती किंवा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी केलेल्या वजावटीऐवजी केलेली असावी. (बीपीएमसी) अधिनियमातील सदर अधिसूचीच्या नियम ९ (ब) मध्ये अशी तरतूद आहे की प्रत्येक इमारत आणि जमिनीचे आरव्ही अधिनियमाच्या तरतुदींनुसार ठरवायला हवे.

मालमत्ता कर विभागाच्या २०१०-११ ते २०१२-१३ या कालावधीच्या दस्तऐवजांची तपासणी केली असता असे आढळून आले की, पुणे मनपाने (पीएमसी) मालमत्तेचे आरव्ही ठरविताना अधिनियमांतर्गत दुरुस्तीसाठी अनुज्ञेय असलेल्या १०% वजावटी १५% वजावट ग्राह्य केली. परिणामी रु. ४३९६ कोटी इतकी मालमत्ता कराची कमी आकारणी झाली. ज्यामुळे पीएमसीला त्याप्रमाणात महसुलाची हानी झाली. त्याचा तपशील खाली दिला आहे :—

वर्ष	वार्षिक भाड्याच्या ८५% निश्चित दराने केलेले आरव्ही (रुपये कोटीत)	वार्षिक भाड्याच्या ९०% दराने निश्चित करावयाचे आरव्ही (रुपये कोटीत)	आरव्ही ची कमी निश्चित (रुपये कोटीत)	मालमत्ता कराचा दर (टक्क्यांत)	मालमत्ता कराची कमी आकारणी (रुपये कोटीत)
२०१०-११	४४३.६०	४६९.६९	२६.०९	३९.७५	१०.३७
२०११-१२	५०८.४२	५८३.३३	२९.९१	५०.७५	१५.१८७
२०१२-१३	५६०.०१	५९२.९५	३२.९४	५५.९०	१८.४१
				एकूण	४३.९६

लेखापरीक्षणात हे निदर्शनास आणून दिल्यानंतर पीएमसीने असे सांगितले (जून २०१३) की, केलेली १५% वजावट ही दिनांक ३ एप्रिल १९७० ला झालेल्या पीएमसीच्या सर्वसाधारण सभेच्या बैठकीत झालेल्या ठरावाला (क्र. ५) अनुसरून ग्राह्य करण्यात आली होती.

हे उत्तर मान्य करता येत नाही कारण अधिनियमात योग्य दुरुस्ती केल्याशिवाय आरव्हीच्या दरात बदल करता येत नाही.

अशा प्रकारे बीपीएमसी अधिनियम, १९४९ च्या सद्य तरतुदीचे अनुपालन न केल्यामुळे रु. ४३.९६ कोटी मालमत्ता कराची कमी आकारणी झाली.

हे प्रकरण शासनाला जुलै २०१३ मध्ये संदर्भित केले होते. मार्च २०१४ पर्यंत उत्तर प्राप्त झाले नव्हते.

ज्ञापन :—

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नगरविकास विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

१.१० (१) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९अन्वये पुणे शहरातील मिळकतींची करआकारणी करण्यात येते. परिशिष्ट ८ नियम ७ मध्ये करपात्र रक्कम ठरविताना वार्षिक भाड्यातून देखभाल दुरुस्तीसाठी १०% सवलत देणेबाबत तरतूद आहे.

(२) मुख्यसभा ठराव क्र. ५, दिनांक ३.४.१९७० अन्वये पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकतींची करआकारणी करताना वार्षिक भाड्यातून १०% ऐवजी १५% सवलत देणेबाबत ठराव संमत करण्यात आला असल्याने त्याप्रमाणे वार्षिक करपात्र रक्कम ठरविताना १५% सवलत देण्यात आलेली आहे.

(३) या संदर्भातील वरील उत्तर महालेखापाल यांना मान्य नसल्याने याबाबत सखोल चौकशी व माहिती घेतली असता, खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आढळून आली आहे. महाराष्ट्र शासन अर्बन डेव्हलपमेंट पब्लिक हेल्थ ॲंड हौसिंग डिपार्टमेंटचे पत्र क्र. पीएमसी-१०६९/१२२९२-सी, दिनांक ३.१२.१९६९ तसेच शासनाकडील अधिसूचना क्र.पीएमसी १०६९/१२२९२-सी, डिसेंबर, १९६९ तसेच पुणे महानगरपालिकेचे आयुक्त यांचेकडील अधिसूचना क्र. टीए/नील/९८३, दिनांक २.११.१९७० अन्वये सदर सुधारित नियम दिनांक १.४.१९७१ पासून लागू करण्यात आली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ परिशिष्ट ८ नियम ७ (१) मध्ये केवळ पुणे महानगरपालिकेकरिता वरीलप्रमाणे देखभाल दुरुस्तीकरिता १५% सवलत देणेबाबत मिळालेली मंजूर नोटीफिकेशनची प्रत सोबत जोडली आहे त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होण्याचा प्रश्न उद्भवत नसल्याने परिच्छेद वगळण्यास विनंती आहे.

साक्ष :-

परिच्छेद क्र. ४.३ — महसुलाची हानी (मिरा-भाईंदर महानगरपालिका)

२.१ परिच्छेद क्र. ४.३ महसुलाची हानी या परिच्छेदाबद्दल महालेखाकारांचे वेटिंग विभागाकडे आले असेल तर याबाबत विभागाचे काय म्हणणे आहे? अशी समितीने विचारणा केली असता, या विषयामध्ये दोन प्रणाली होत्या याची समितीला कल्पना असेल. एक म्हणजे ऑक्ट्रॉय प्रणाली होती आणि ही प्रणाली संपुष्टात येऊन एलबीटी प्रणाली लागली. ज्या काळात ऑक्ट्रॉय प्रणाली होती त्या काळात पारगमन शुल्कदेखील होते. कारण ऑक्ट्रॉय कर हा मूव्हमेंट ऑफ गुडसवर लावला जायचा. गुडसची मूव्हमेंट जेव्हा शहराच्या एका नाक्यातून येऊन दुसऱ्या नाक्यातुन बाहेर पडायची तेव्हा त्याला ट्रान्झीट फी किंवा पारगमन शुल्क लागायचे. पारगमन शुल्क हा ऑक्ट्रॉय प्रणालीमध्ये होता. जेव्हा आपण एन्ट्री थ्रू मूव्हमेंट टॅक्स लावणे बंद केले आणि बुक बेस्डवर आपण गेलो तेव्हा हे पारगमन शुल्क आपोआपच संपूष्टात आले. एलबीटी लागल्यानंतर ऑक्ट्रॉयचे नियम संपुष्टात आले. एलबीटीचे नियम पाहिले तर तिथे कुठेही पारगमन शुल्कचा उल्लेख नाही कारण बुक बेस्ड अकाऊंटिंगमध्ये पारगमन शुल्कला काही अर्थ नाही. मिरा-भाईंदरचे उदाहरण घेतले तर सन २०१० मध्ये जेव्हा त्यांनी एलबीटी लावला तेव्हापासून पारगमन शुल्क वसूल करण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही, असे शासनाने सादर केलेले आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

जेव्हा आपण बुक बेस्ड व्हॅल्यूवर टॅक्स वसूल करतो तेव्हा तिथे पारगमन शुल्क कसे वसूल होणार आहे. बुक बेस्डवरवर टॅक्स लागतो तर आपल्याला इतर टॅक्सची गरज नाही. तरीदेखील कल्याण-डॉबिंवली महानगरपालिकेने अधिकची फी घेतली तसेच नाशिक व ठाणे महानगरपालिकेनेदेखील ती फी घेतली आहे. ती फी परत दिली पाहिजे. मोठ्या प्रमाणात ती फी घेतली आहे म्हणजे ठाणे महानगरपालिकेने ४६ कोटी रुपये, नाशिक महानगरपालिकेने १२ कोटी ५७ लक्ष रुपये आणि कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने ११ कोटी २४ लक्ष रुपये एवढी फी घेतली आहे. Is this rule applicable to Mira-Bhayander only or they have taken it in a wrong way? अशी समितीने विचारणा केली असता, This rule is applicable uniformly and universally, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्यांनी जी फी घेतलेली आहे ती परत करणार काय ? असा प्रश्न समितीने केला असता, त्यांनी जी फी घेतली आहे ते एलबीटीच्या नियमामध्ये नव्हते. पण काही कार्पोरेशनने सुरू ठेवल्यामुळे एक कोर्ट केस झाली. त्या कोर्ट केसमध्ये जे रुलिंग आले ते विभागाने समितीला सादर केले आहे आणि तेच सन्माननीय समितीने म्हटले आहे. As it was a public revenue the Court has protected that recovery as it has come to the Corporation, म्हणून कोर्टाने कोणतीही परताव्याची ऑर्डर पास केली नाही. कोर्टाने स्पष्टपणे म्हटले की, अशा प्रकारची वसुली करता येत नाही. यानंतर जे खूप ऑबव्हीयस होते तरीदेखील सन २०१४ मध्ये वसुली करण्यात येऊ नये असे दिनांक १४ नोव्हेंबर २०१४ रोजी सांगितल आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

When some Corporation is referring the matter to the Government, they are silent. When some Corporation is continuing to recover transit fee they are silent, then naturally the matter will go to the Court.

त्या वेळी न्यायालयाने जो निर्णय दिला तो राज्य सरकारने त्यांची बाजू भक्कमपणे न मांडल्यामुळे दिलेला आहे. राज्य शासनाने सन २०१४ ला यासाठी स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित केलेला होता. त्याचप्रमाणे जर नाशिक महानगरपालिका किंवा ठाणे महानगरपालिका आणि कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी कर वसूल केला असेल तर महाराष्ट्रातील इतर एकाही महानगरपालिकेने कर घेतलेला नाही. त्यामुळे ज्या महानगरपालिकांनी पारगमन शुल्क मागितले असेल ते त्यांना परत केले पाहिजे, तसेच महालेखापालांनी सांगितले आहे की, राज्य शासनाने जी भूमिका घ्यावयास पाहिजे ती घेतलेली नाही. एकीकडे अनधिकृतपणे वसुली करण्यात येत होती आणि दुसरीकडे सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली जात नाहीत. त्यामुळे सदर बाब ही चुकीची आहे, असे मला वाटते. त्यामुळे राज्य शासनाने वसुली थांबवावयास पाहिजे होती. इतर महापालिका वसुली करीत असतील म्हणून उक्त महानगरपालिकेने वसुलीबाबत राज्य शासनाकडे विचारणा केली असेल. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आयुक्तांनी याबाबत राज्य शासनाकडे विचारणा करावयास नको होती, अशा प्रकारे विभागाने सांगितलेले आहे. असे असताना त्या आयुक्तांनी याबाबतची विचारणा करणे अयोग्य आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, राज्य शासनाने त्यांना उत्तर देणे अपेक्षित आहे. आताही जर शासनाकडे एखादा संदर्भ प्राप्त झाला असेल तर त्याबाबत उत्तर देणे अपेक्षित आहे. ज्या वेळी एखादा नियम अत्यंत सुस्पष्ट असतो तेव्हा त्या नियमाची अंमलबजावणी करणे हे अपेक्षित असते. तरीदेखील शासनाकडे प्राप्त झालेल्या संदर्भाची दखल घेऊन त्यावर उत्तर देणे अपेक्षित असते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याच नियमाच्या अनुषंगाने विभागाने कार्यवाही करावी असे समितीने निदेश दिले असता विभागाने त्यास मान्यता दिली.

अनेक नगरपालिका आणि महानगरपालिका विभागाकडे याबाबत विचारणा करीत असतात. परंतु त्याचे उत्तर संबंधित महापालिकांना विहित वेळेत प्राप्त होत नाहीत. त्यामुळे याबाबत एक महिन्यात संबंधितांना उत्तरे मिळतील, अशा प्रकारे कार्यवाही करावी, असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी समितीने सूचना केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासित केले.

परिच्छेद क्र.४.५ : निष्फळ खर्च

२.२ नागपूर सुधार प्रन्यासने माहिती तंत्रज्ञान इमारतीचे सार्वजनिक खाजगी भागीदारी पद्धतीने योग्य नियोजन न केल्यामुळे रु. १.८३ कोटीचा निष्फळ खर्च झाला. उक्त परिच्छेद क्रमांक ४.५ बाबत माहिती देण्यात यावी. विभागाने जी ऑर्डर दिलेली होती त्यामध्ये किती रुपये खर्च झालेले आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, एक कोटी ७० लाख रुपये खर्च झालेले आहेत. असे विभागीय सचिवांनी होकारार्थी उत्तर दिले.

त्यामध्ये कन्सल्टींग चार्जेस आहेत काय ? अशी समितीने विचारणा केली असता त्यास विभागीय सचिवांनी होकारार्थी उत्तर दिले.

या सर्व विषयाबाबत समितीला माहिती देण्यात यावी. असे समितीने निदेश दिले असता, आय.टी. पार्क करण्यासंदर्भातील सदरहू विषय आहे आणि यामधील निर्णय हा एन.आय.टी. बोर्डाचा आहे. सदरहू ठिकाणी ई.पी.सी. तत्वावर आय.टी. पार्क उभारण्याचा निर्णय एन.आय.टी. बोर्डाने घेतला होता. त्यासाठी २.८८ कोटी रुपयांची एक निविदा काढण्यात आलेली होती. त्यापैकी १.७० कोटी रुपये खर्च झालेले आहेत. सदर बाब ही सन २००६ ला करण्यात आलेली होती. त्यानंतर सन २००८ मध्ये एन.आय.टी.च्या बोर्डाने पूर्वी घेतलेल्या निर्णयावर फेरविचार करुन दोन एफ.एस.आय. वापरण्याचा निर्णय घेतला होता आणि अधिक विस्तृत बांधकाम करुन DBOOT तत्वावर एक निविदा बोर्डाने काढली होती. DBOOT तत्वावर काम केल्यामुळे १५ कोटी रुपयांचा प्रिमियम मिळाला होता. आतापर्यंत १.५५ कोटी रुपये खर्च झाले आहेत, १२.८० कोटी रुपये आतापर्यंत मिळालेले आहेत. उर्वरित रक्कम पुढील वर्षी मिळणार आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागाने १ कोटी ७० लाख रुपये खर्च केलेले आहेत. त्याचप्रमाणे सन २००८ मध्ये नवीन योजनेप्रमाणे DBOOT प्रमाणे टेंडर काढण्यात आले. असे असताना त्या कामाचे एस्कलेशन झालेले होते, कॉलम उभारण्यात आलेले होते आणि या सर्वांसाठी १ कोटी ७० लाख रुपयांचा खर्च करण्यात आलेला होता. हा सर्व खर्च गृहीत न धरता विभागाने मागणी केली होती. त्यामुळे विभागाला जी संकल्पना सूचली होती त्याचा विचार एन.आय.टी.ने का केला नाही. जेणेकरुन एक कोटी ७० लाख रुपये खर्च झाले नसते. सदरहू व्यवहार हा नियोजन न करता केलेला आहे. त्यामुळे हा निधी निष्फळ खर्च झालेला आहे. आता विभागाने दोन एफ.एस.आय. आय.टी. पार्कसाठी घेतलेला आहे, ही बाब समितीला आता मान्य आहे. परंतु एक कोटी ७० लाख रुपये निधी शिल्लक ठेवता आला असता, यामध्ये जर ऐलिव्हेशनचे कारण सांगण्यात येत असेल तर ते योग्य नाही. सदर काम हे खासगी कन्सल्टंटला दिलेले आहे. त्यामुळे त्यांच्याकडून निधी परत मिळेल याची शाश्वती विभागाने केलेली आहे काय ? या सर्व बाबी यामध्ये आढळून आलेल्या आहेत, असे मत समितीने व्यक्त केले असता, एन.आय.टी.च्या बोर्डने चेंज ऑफ पॉलिसी केलेली आहे.

सन २००५ मध्ये इमारत बांधकाम करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यावेळी एक एफ.एस.आय.वर ९९०० स्क्वेअर मिटरचे बांधकाम करण्याचे ठरविण्यात आले. सन २००८ मध्ये सदर बांधकाम करण्याचे ठरविले होते त्याची कालमर्यादा निश्चित करण्यात आली होती. सन २००८ मध्ये ज्यावेळी याबाबतचा आढावा घेण्यात आला त्यावेळी काम पूर्ण करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले. दोन कोटी ८८ लाख रुपयांचे सदर टेंडर होते. तळमजल्यावर ४ हजार ७०० चौरस मिटरचे बांधकाम करावयाचे होते आणि पहिल्या मजल्यावरही ४ हजार ७०० चौरस मिटरचे बांधकाम करावयाचे होते, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

समितीने बेसमेंट आणि पहिला मजला एवढे बांधकाम दिलेले होते, हे निदर्शनास आणले असता, विभागीय प्रतिनिधींनी होकारार्थी उत्तर दिले तसेच, विहित मुदतीमध्ये काम पूर्ण केले नाही. त्यानंतर दिनांक ४ ऑक्टोबर २०१० ला यासाठी फेर निर्णय घेण्यात आला. असेही समितीस अवगत केले.

विहित मुदतीमध्ये काम केले नसल्यास त्यांना अनेक मार्गांनी दंड आकारता येतो. काम पूर्ण झालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. एन.आय.टी.ने नवीन योजना तयार केली. त्यानुसार एक कोटी ७० लाख रुपये राखीव ठेवून DBOOT नुसार बांधकाम सुरु करण्यात आले. त्यामुळे या सर्व गोष्टी काम सुरु करण्यापूर्वीच का लक्षात आल्या नाही. त्यामुळे एक कोटी ७० लाख रुपये निष्फळ ठरलेले आहेत. एक कोटी ७० लाख रुपयांचा निधी कोणत्याही नियोजनाशिवाय खर्च करण्यात आलेले आहेत. ज्यावेळी टेंडर काढण्यात आले त्यावेळी सांगण्यात आले की, that the ground is on "as is where is" basis. तुम्हाला जे करायचे आहे ते करा. ७० लाख रुपयांचे बांधकाम करण्यात आल्याचे टेंडरमध्ये नमूद करण्यात आलेले नाही. त्यामुळे ७० लाख रुपयांचे करण्यात आलेले काम निष्फळ ठरलेले आहे. त्यामुळे महालेखापालांनी जो आक्षेप काढलेला आहे तो योग्य आहे. कोणतेही नियोजन करण्यात आलेले नाही. त्याचप्रमाणे ऐलिव्हेशनचे कारण दाखवून नवीन योजना अंमलात आणली, ते योग्य नाही, असे समितीला वाटते, असे समितीने मत व्यक्त केले.

एक कोटी ७० लाख रुपये निष्फळ खर्च करण्यात आलेले आहेत. त्यासाठी जबाबदार कोण आहेत ? पी.पी.पी. तत्वावर काम करण्याचा निर्णय सन २००८ ला घेण्यात आला होता. त्यासाठी सन २०११ मध्ये रिक्वेस्ट प्रपोझल मागविण्यात आले. त्यामुळे प्रस्ताव मागविण्यासाठी तीन वर्षांचा कालावधी लागण्याचे कारण काय ? तसेच ज्यावेळी पी.पी.पी. तत्वाने काम करण्याचा निर्णय घेतला त्यावेळी टेंडर काढण्यात आल्यानंतर त्या कामाचे प्लिंथचे काम झाल्याचे टेंडरमध्ये का नमूद करण्यात आले नाही ? अधीक्षक अभियंता यांनी मान्य केले की, सुरुवातीला केल्या

कामाची किंमत समाविष्ट केली नव्हती. परंतु टेंडर निविदा काढण्यासाठी दोन वर्षांचा कालावधी का लागलेला आहे ? आर.ए.पी.मध्ये एक कोटी ७० लाख रुपये नमूद केलेले नाही. या दोन्ही विषय हेतू:पुरस्सर पीपीपी मॉडेल तयार करण्यात आले, असे समितीला वाटत आहे. तरी याबाबत विभागाचे काय मत आहे ? अशी समितीने विचारणा केली असता, दिनांक ७ एप्रिल २०१० DBOOT तत्त्वावर पहिली निविदा मागविण्यात आली होती. त्यावेळी महत्तम निविदा ही पाच कोटी ७८ लाख रुपयांची प्राप्त झाली होती. अंतिम ठरावाला विश्वस्त दिनांक २० ऑगस्ट, २००९ रोजी विश्वस्त मंडळाने मंजुरी दिली होती. त्यानुसार दिनांक ७ एप्रिल २०१० ला नवीन पीपीपी तत्वानुसार निविदा काढण्यात आली होती. त्यामध्ये दिनांक २० ऑगस्ट २००९ पासून दिनांक ७ एप्रिल २०१० पर्यंतचा कालावधी अनावश्यक होता, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला अवगत केले.

अधीक्षक अभियंता, नागपूर यांनी ही वस्तुस्थिती मान्य केली आहे की, एक कोटी ७० लाख रुपयांचा कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. अशा प्रकारची चूक करण्यात आल्यानंतर त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली ? तसेच, चालू असलेले काम थांबविण्याचे योग्य कारण आढळून येत नाही. दोन किंवा चार एफ.एस.आय. पुर्वीच्या बांधकामामध्येही करता आला असता. ज्यावेळी विभागामार्फत कामाचे टेंडर देण्यात आलेले आहे, त्यावेळी कामाचे मुल्यांकन करुन ते हस्तांतरीत केले पाहिजे. त्याप्रमाणे टेंडर काढले पाहिजे. या सर्व प्रकारात कोणत्याही प्रकारचे नियोजन करण्यात आलेले नाही. सन २००६ मध्ये काम सुरु करण्यात आले होते. प्रत्येक काम वेळेवर न झाल्यामुळे एक कोटी ७८ लाख रुपये खर्च करण्यात आले. ऐलिव्हेशनचे कारण सांगून त्याला बदल्याचे जे कारण सांगण्यात आले, ते समितीला योग्य वाटत नाही. तसचे, यामध्ये १४०० चौरस मिटरच्या बांधकामचा कोणत्याही प्रकारे उल्लेख करण्यात आलेला नाही. या सर्व प्रकारामध्ये विभागाने काय कारवाई केली आहे ? सदरहू एक कोटी ७० लाख रुपयाबाबत विभागाने दाखवावयास पाहिजे होते. नवीन धोरणाप्रमाणे काम करण्याचे लक्षात आणून देण्याची जबाबदारी कोणाची होती ? त्यामुळे यासाठी जबाबदारी निर्धारित केली पाहिजे आणि त्याबाबत समितीला विभागाने योग्य अभिप्राय दिले पाहिजेत. विभागाने याबाबतची जबाबदारी निर्धारित करुन समितीला पुढील पंधरा दिवसामध्ये अहवाल सादर असे समितीने निदेश दिले.

दिनांक ६ जून २०१८ रोजी समितीपुढे साक्ष झालेली होती. समितीने पुन्हा दिनांक २९ ऑगस्ट २०१८ रोजी साक्ष घेतली. १.७० कोटी रुपये निष्फळ खर्च झाल्याचे दिसून आले होते. याबाबत अधिक माहिती देता येईल का? अशी समितीने विचारणा केली असता, नागपूर सुधार प्रन्यासच्या माध्यमातून पहिले जे टेंडर काढले होते त्यावर १.७० कोटी रुपये खर्च झाला होता. २००८ मध्ये नासुप्र बोर्डाने ठराव घेतला आणि डीबूट तत्वावर on as is where is basis नुसार पुन्हा टेंडर काढले. कराराप्रमाणे जे ठेकेदार होते त्यांना दिनांक २१.२.२०१२ ते २१.२.२०१५ पर्यंत ३ वर्षे बांधकामाची मुदत देण्यात आली होती. दिनांक २१.२.२०१५ पर्यंत बांधकाम पूर्ण झाले नाही म्हणून अतिरिक्त प्रव्याजी वसुली करुन मुदतवाढ देण्यात आली. अशा प्रकारची मुदतवाढ दोन वेळा देण्यात आली. दिनांक २१.२.२०१५ ते २१.२.२०१६ पर्यंत मुदतवाढ देताना मूळ रक्कम १५.०५ कोटी रुपयांच्या ५ टक्केप्रमाणे ७५.२५ लाख रुपये वसुली करण्यात आली. दिनांक २१.२.२०१६ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही म्हणून दिनांक २१.२.२०१६ ते २१.२.२०१७ पर्यंत आणि दिनांक २१.२.२०१७ ते २१.२.२०१८ पर्यंत आणि पुन्हा २१.२.२०१८ ते १७.४.२०१८ पर्यंत मुदतवाढ देताना १.७० कोटी रुपये अशी एकूण २.४५ कोटी रुपये अतिरिक्त वसुली करण्यात येऊन मुदतवाढ देण्यात आली. याबाबत नागपूर सुधार प्रन्यास आणि कन्सेशनर यांच्यात एक ॲडिशनल करार दिनांक १७.६.२०१७ रोजी करण्यात आला होता. त्या करारनाम्यात अटी व शर्ती आहेत त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे मुदतवाढीकरिता १.७० कोटी रुपये वसुली करण्यात आली. या करारनाम्यावर उभय पक्षांनी स्वाक्षरी केली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले. **(विभागाकडून प्राप्त झालेली माहिती विवरणपत्र क्रमांक १)**

परिच्छेद क्रमांक ४.६-निधीची अडवणूक आणि किंमतीतील टाळता येण्याजोगी वाढ-

२.३ उपरोक्त परिच्छेदाबाबत माहिती देण्यात यावी, असे समितीने निदेश दिले असता, एनआयटीने १ स्विमिंग पूल कॉम्पलेक्स बांधला असून त्यामध्ये स्विमिंग पूल, चेंजींग रूम योगा सेंटर आणि टॉयलेट ब्लॉक्स या सुविधा देण्यात आलेल्या आहेत. शासनाने २००४-२००५ मध्ये सुरूवातीला ५० लाख रूपये दिले होते. त्यावेळी असे सांगितले होते की, त्यामध्ये एनआयटीने ५० टक्के शेअर्स टाकावे. २००५ मध्ये एनआयटीने शासनाला अशी विनंती केली की, आमची बिकट आर्थिक परिस्थिती पाहता आम्हाला ५० टक्के शेअर्स देता येणार नाही त्यामुळे शासनाने पूर्ण निधी द्यावा. त्यामुळे शासनाने २००५-२००६ पासून २०१५-२०१६ पर्यंत एनआयटीला टप्याटप्याने वेगवेगळ्या योजनेखाली निधी प्राप्त करून दिला. याकरिता आजपर्यंत एकूण ३ कोटी ७२ लाख रूपये खर्च झालेले आहेत. त्यापैकी यामध्ये एनआयटीने १९ लाख रूपयांचे योगदान दिलेले आहे. बाकीचा सर्व निधी शासनाचा आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

३ कोटी ७२ लाख रूपये कोणकोणत्या योजनेसाठी मिळाले व कोणत्या तारखेला मिळाले याची सविस्तर माहिती सादर करण्यात यावी. तसेचच स्विमिंग पूल कॉम्पलेक्सच्या सद्यःस्थिती बाबत माहिती द्यावी, असे समितीने सूचित केले असता, शासनाने स्विमिंग पूल कॉम्पलेक्सकरिता २००४-२००५ मध्ये ५० लाख रूपये विशेष अनुदान दिले. त्यानंतर २००५-२००६ मध्ये दलित वस्तीतून २५ लाख ६५ हजार रूपये मिळाले, २००६-२००७ मध्ये दलित वस्तीतून ३९ लाख २५ हजार रूपये मिळाले, २००७-२००८ मध्ये दलित वस्तीमधून ३४.४० लाख रूपये मिळाले असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

दलित वस्तीतील निधी या कामाकरिता कसा काय वापरण्यात आला ? दलित वस्तीचा निधी कशा प्रकारे वापरण्यात आला. त्याची माहिती देण्यात यावी. हा स्विमिंग टँक दलित वस्तीमध्ये आहे काय? हा एरिया दलित वस्तीमध्ये नोटीफाईड होता किंवा कसे? अशी समितीने विचारणा केली असता, दिनांक १५ मार्च २००२ रोजीच्या नगरविकास विभागाच्या शासन निर्णयाप्रमाणे यातील कंम्पोनंट होते. दिनांक ५ मार्च, २००२ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे ज्या एरियामध्ये पैसे खर्च करणे अपेक्षित आहे, त्या एरियामध्ये हा एरिया येतो तसेच तो दलित वस्तीमधील आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

हा प्रस्ताव एनआयटीने शासनाला पाठविला होता की, शासनाने एनआयटीला पाठविला होता? अशी समितीने विचारणा केली असता, हा प्रस्ताव शासनाकडून आलेला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

नागपूर सुधार प्रन्यासाने जलतरणाचे योग्य नियोजन न केल्यामुळे स्विमिंग पूल कॉम्पलेक्स बांधण्याचा प्रस्ताव एनआयटीने शासनाला पाठविला होता की, शासनाने एनआयटीला पाठविला होता ? अशी समितीने विचारणा केली असता, हा प्रस्ताव शासनाकडून आलेला आहे. तसेच नागपूर शहराच्या विकासासाठी २००४-२००५ मध्ये मंजूर विशेष अनुदानातून हे काम घेण्यात आले होते, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

याकरिता मिळालेल्या निधीची विभागाने सविस्तर माहिती दिलेली आहे. सुरूवातीला ५० लाख रूपये शासनाने अनुदान स्वरूपात दिले होते. त्यानंतर मिळालेले सर्व पैसे दलित वस्तीचे आहे काय ? तसेच १९ लाख रूपये नासुपचे आहेत काय ? असे समितीने विचारले असता, ५० लाख रूपया व्यतिरिक्त मिळालेला निधी दलित वस्तीतून मिळालेला आहे व १९ लाख रूपये नासुप्रचे आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सध्याच्या परिस्थितीत तेथे कोणकोणते बांधकाम झालेले आहे. As on today, Whether the Swimming tank is in operation or not? Is there availability of water? अशी समितीने विचारणा केली असता, स्विमिंग टँकचा प्रोजेक्ट पूर्ण झालेला आहे. त्या ठिकाणी पहिला टप्पा, दुसरा टप्पा आणि तिसऱ्या टप्प्यामध्ये काम घेण्यात आले होते. प्रत्यक्षात जलतरण तलाव, स्नानगृह, डेक, भूमिगत पाण्याची टाकी, संरक्षक भींत व जलशुद्धीकरण केंद्र ही काम पूर्ण झालेली आहेत. तसेच जलतरण तलावामधील व्यायाम शाळेचे काम पूर्ण झालेले आहे. तसेच युथ हाऊस, बॅडमिंटन कोर्ट, कँटीन व ओपन कोर्टचे काम पूर्ण झालेले आहे. या व्यतिरिक्त नागपूर सुधार प्रन्यासच्या मालकीच्या जागेवरील विहीरीतून पाणीपुरवठा करण्यासाठी ५०० मीटरची पीव्हीसी पाईप लाईन टाकण्यात आलेली आहे. टॅपच्या माध्यमातून पाण्याचा पुरवठा सुनिश्चित करण्यात आला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

नागपूर महानगरपालिकेला स्विमिंग पूल कॉम्पलेक्सचा ताबा देण्यात आलेला आहे, परंतु त्याचे कुलूप उघडण्यात आलेले आहे काय ? स्विमिंग पूल कॉम्पलेक्सचे कुलूप उघडण्यात आलेले नाही, म्हणजेच ते बंद आहे. स्विमिंग पूल कॉम्पलेक्स महानगरपालिकेला केव्हा हस्तांतरित करण्यात आले आहे? अशी समितीने विचारणा केली असता, दिनांक १२.१२.२०१७ रोजी स्विमिंग पूल कॉम्पलेक्सचा ताबा नागपूर महानगरपालिकेला देण्यात आलेला आहे असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

स्विमिंग पूल कॉम्पलेक्सच्या बांधकामाला २००४ पासून २०१७ पर्यंतचा कालावधी लागला. स्विमिंग पूल कॉम्पलेक्स आता पूर्णपणे तयार झाले असल्याचे फोटोग्राफ्स समितीकडे उपलब्ध आहेत.त त्या फोटो मध्ये असे दिसत आहे की “It is under Lock and Key.” स्विमिंग पूल कॉम्पलेक्सचे बांधकाम दलित वस्तीमध्ये करण्यात आलेले आहे व दलित लोकांसाठी केलेले आहे. स्विमिंग पूल कॉम्पलेक्सचा उपयोग झाला पाहिजे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीमध्ये पुढील एका महिन्यामध्ये स्विमिंग पूल कॉम्पलेक्सच्या वापरास सुरूवात झाली पाहिजे. निविदा प्रक्रिया झाली नसेल तर स्वतः एनएमसीने स्विमिंग पूल कॉम्पलेक्स चालू करावे, तसेच विभागाने मागील ६ महिने काय केले, याची माहिती समितीला मिळणे आवश्यक आहे. सर्व मशिनरी किंवा सर्व साहित्य उपलब्ध असताना स्विमिंग पूल चालू न होण्यास किंवा त्याचे कुलूप न उघडण्याचे काय कारण होते, याची माहिती देण्यात यावी, अशी समितीने सूचना केली असता, त्यासंदर्भातील निविदा काढण्यात आली असून फायनान्सशीअल बीड ओपन झालेले आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

परिच्छेद क्र. ४.८ :- व्यापारी संकुलाच्या बांधकामाच्या वेळ आणि खर्चात वाढ आणि महसूल हानी-

२.४ परिच्छेद क्र. ४.८ संदर्भात विभागाने खुलासा करावा. व्यापारी संकुलाचे काम सुरू करण्यात आले व नंतर निधी अभावी काम बंद झाले, असा एर्जीनी आक्षेप नोंदवलेला आहे. कोणतेही काम सुरू करण्यापूर्वी बजेटची तरतूद करणे आवश्यक असते. बजेटची तरतूद करण्यात आली होती काय ? किती तरतूद करण्यात आली होती, किती रक्कमेचे काम होते, त्याचे नियोजन कसे केले होते ? अशी समितीने विचारणा केली असता, सन २००३ मध्ये सदर कामाचे नियोजन करण्यात आले होते. त्यावेळी निविदा प्रक्रिया करून काम सुरू करण्यात आले होते. या नंतर मनपाची आर्थिक स्थिती खराब झाली होती असे विभागीय प्रतिनिधींने समितीस अवगत केले.

सन २००३ मध्ये कामाची निविदा काढण्यात आली त्यावेळी बजेटमध्ये कामाची तरतूद होती काय ? असा प्रश्न समितीने केला असता, सन २००४-०५ मध्ये बांधकाम परवानगी घेऊन प्रथम निविदा काढली होती. सन २००५-०६ मध्ये १ कोटी ४१ लाख ६२ हजार १०९ रुपयांची निविदा रक्कम होती. सन २००५ मध्ये अॅवॉर्ड करण्यात आले त्यावेळी बजेटमध्ये तरतूद केली होती असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

कोणत्याही कामाकरिता निविदा काढण्यापूर्वी निधीची मान्यता घेतली जाते, बजेटमध्ये तरतूद आहे की नाही, हे तपासले जाते. या कामाकरिता राज्य किंवा केंद्र शासनाचा निधी मिळणार नव्हता. तरतूद करून निविदा काढली होती काय ? असे समितीने विचारले असता, सन २००५-०६ मध्ये निधीची तरतूद केली होती असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

निविदा काढण्यापूर्वी बजेटमध्ये तरतूद केली होती काय ? असा प्रश्न समितीने केला असा विभागीय प्रतिनिधींने होकारार्थी उत्तर दिले.

निविदेची तारीख काय आहे ? असा प्रश्न समितीने केला असता, या संबंधीची सर्व माहिती समितीला उपलब्ध करून देण्यात येईल तसेच मनपाचा ठराव दिनांक ९ फेब्रुवारी, २००४ नुसार कार्यवाही करण्यात आली होती असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

निविदा नियमानुसार काढली की नाही हा समितीचा विषय नाही. निविदा काढण्यापूर्वी बजेटमध्ये तरतूद करून बजेट सभागृहाने मंजूर केले होते काय ? असा प्रश्न समितीने केला असता विभागीय प्रतिनिधीने होकारार्थी उत्तर दिले.

एकूण कामाची किंमत किती होती ? महापालिकेची आर्थिक स्थिती कमकुवत झाल्यामुळे निर्णय बदलला असे उत्तर दिले आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका सर्वात श्रीमंत महापालिका असल्याची चर्चा होत असते. बजेटमध्ये तरतूद असेल तर निधीचा प्रश्न कसा काय येतो ? असा प्रश्न समितीने केला असता, १ कोटी ४१ लाख ६२ हजार १०९ रुपये एकूण कामाची किंमत होती. सन २००५-०६ मध्ये महापालिकेचे ५११ कोटी रुपये जकातीची उत्पन्न होते. सन २००७-०८ व सन २००८-०९ या २-३ वर्षात आर्थिक मंदीमुळे अचानकपणे उत्पन्नात घट आली. यामुळे तत्कालीन आयुक्त यांनी मोठ्या प्रकल्पाचे काम सुरू ठेवून लहान प्रकल्पांच्या कामांना काट लावण्याचा निर्णय घेतला. यामुळे लहान स्वरुपाची अनेक कामे बाजुला ठेवण्यात आले व मोठी कामे पूर्ण करण्यात आली. वर्षाला जेवढी तरतूद होती तेवढे काम झाले असे विभागीय प्रतिनिधीनी समितीस अवगत केले.

किती तरतूद केली होती, किती टक्के तरतूद कमी पडली ? उत्पन्न कमी झाल्यामुळे कट लावला जातो. तशा प्रकारे किती रकमेला कट लावला होता ?

हा लहान प्रकल्प असून त्याचे ७० टक्के काम पूर्ण झाले होते. असे असताना तो थांबवण्यात आला. या ठिकाणी सदर कामाकरिता तरतूद केल्याचे कोठेच दिसत नाही. यामुळे हा प्रश्न निर्माण होत आहे. सदर प्रकल्पामध्ये अफेक्टेड दुकानदार किती होते ? असे समितीने विचारले असता, या संबंधी सध्या माहिती उपलब्ध नाही. समितीकडून मुदत मिळाल्यास पुढील बैठकीत ही सर्व माहिती उपलब्ध करून देण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधीने समितीस आश्वासित केले.

सुरू असलेला प्रकल्प थांबवून बीओटीवर करावा असा निर्णय आयुक्त पातळीवर घेण्यात आला होता काय ? बीओटी करार देखील २ वर्षे का करण्यात आला नाही असा समितीने प्रश्न उपस्थित केला. त्यावर सन २००३ मध्ये प्रकल्प सुरू झाल्यानंतर सन २००४-०५मध्ये तरतूद करून निविदा काढली आहे. सन २००७-०८ मध्ये एस्कलेशन करिता बिल देण्यात आले तेव्हा तरतूद केली होती. सन २००७-०८ मध्ये पेमेंटची बिले येण्यास सुरुवात झाली. त्यावेळी महापालिकेची वित्तीय स्थिती चांगली नसल्यामुळे तत्कालीन आयुक्तांनी काम थांबवण्याचा निर्णय घेतला. सन २००९-१० मध्ये बीओटी समिती व तत्कालीन आयुक्त यांच्या माध्यमातून बीओटी करण्याचा निर्णय घेण्यात आला. २०१० मध्ये बीओटी समितीकडून त्यास मान्यता देण्यात आली, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

मूळ किंमतीमध्ये एस्कलेशन झाले काय ? अशी समितीने विचारणा केली असता, प्रत्येक निविदेमध्ये एस्कलेशन असते. मटेरिअलची किंमत वाढत असते त्या नुसार इश्यू केले जाते असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

या प्रकरणात ७० वर्षाची भाडेपट्टी देण्यात आली. महापालिकांना ७० वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्याचे अधिकार आहेत काय ? ७० वर्षाकरिता मान्यता कोणी दिली? असा प्रश्न समितीने केला असता, सर्वाधिक ३० वर्षाकरिता भाडेपट्टयाने दिली जाते तसेच तत्कालीन बीओटी समिती व सर्वसाधारण सभेने देखील या निर्णयास मान्यता दिली होती असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या निर्णयाबाबत बीओटी समिती व सभेमध्ये जे रिमार्क्स लिहिले गेले असतील ते समितीला उपलब्ध करून द्यावेत. सन २००३ मध्ये निविदा झाली, सन २००५ मध्ये वर्क ऑर्डर आली. सन २००३ मध्ये महापालिकेची आर्थिककस्थिती भक्कम होती. तरी देखील ऑर्डर देण्यास एवढा वेळ का लावला ? यामुळे समितीला विभागाच्या हेतूवर शंका निर्माण होत आहे. पहिल्या दिवसापासून विभागाला हा प्रकल्प करावयाचा नव्हता. हा निर्णय तत्कालीन आयुक्तांनी दबावापोटी घेतला का? दुसरा प्रश्न असा की, लोकांनी बीओटी संदर्भात आंदोलन केले हे विभागाने खुलाशात नमूद केले आहे. या प्रकरणात नगर विकास विभागावर ताशेरे ओढण्यात आले आहे की, मार्च २००३ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या असे लक्षात आले की, नगर विकास विभागाकडून येण्यास फार विलंब होत आहे. सन २००३ मध्ये निविदा काढण्यात आली आणि आता सन २०१२ साल उजाडले.

सन २००३ चा हा विषय आहे. सन २०१३ मध्ये शासन स्तरावर १९ महिने हे प्रकरण ठेवून घेतले. महापालिकेने हे अडवून ठेवले. त्यानंतर शासनाने त्यावर निर्णय घेतला नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, पहिल्यांदा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने ईपीसी कॉन्ट्रॅक्ट १ कोटी ४२ लाख रुपयांचा केला. सन्माननीय सदस्य म्हणाले तेच शासनाचे धोरण आहे की, आर्थिक स्थिती कमकुवत झाल्यामुळे काही कामे थांबवायची असतील, जी कामे फार पुढे गेलेली आहेत ती कामे सर्वसाधारणपणे आपण थांबवत नाही. ५० टक्क्याच्या वर ज्याचा खर्च झाला असेल ती कामे आपण पूर्णत्वास नेतो. शासनाने वेळोवेळी परिपत्रकांद्वारे अधोरेखित केले आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने सन २०१० मध्ये बीओटी तत्वावर बांधण्याचा निर्णय घेतला तेव्हा या बीओटीवर एलएक्यू झाला होता. त्याच्या अनुषंगाने शासनाने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला नोव्हेंबर, २०१० मध्ये पत्र दिले. त्यामध्ये उल्लेख केला की, महापालिकेने विविध गोष्टी तपासून घ्याव्यात. महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने निर्णय घेण्याबाबत सन २०१० मध्ये पत्र दिले, ही वस्तुस्थिती आहे. सन २०११ मध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने काही प्रश्न शासनाला विचारले होते. शासनाने यापूर्वीच सन २०१० मध्ये कळविले होते की, आपणच सक्षम आहात. आपला आर्थिक हेतू तपासून आपण निर्णय घ्यावा. त्यामध्ये शासनाने बीओटी तत्वावर बांधावे याबद्दल कळविले नाही किंवा त्यावर स्थगितीही दिलेली नाही. सन २०१३ मध्ये त्यांच्या स्तरावर ईपीसीवर देण्याचा निर्णय घेतला. पहिल्या कामाचे स्ट्रक्चरचे पूर्ण काम झाले होते. उर्वरित फिनिशिंगसाठी पुन्हा टेंडर काढले. आज ते संकूल पूर्ण झालेले आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

त्या कामासाठी एकूण किती खर्च झाला? असा प्रश्न समितीने केला असता, ईपीसीवर ते काम केले. त्यासाठी एकूण २.२९ कोटी रुपये खर्च आला असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने २.२९ कोटी रुपयांमध्ये हे काम केले. विभागाने बीओटीवर करण्याचा निर्णय घेतला तेव्हा किंमत सहा कोटी रुपये केली होती. म्हणजे एस्कलेशन ६ कोटी रुपये आणि ७० वर्ष दाखविली होती. जे काम मनपाने पाच वर्षानंतर त्याच्या अर्ध्या किंमतीत स्वतः हे काम पूर्ण केले. यावरुन हे काम व्यवस्थित नाही असे विभागास वाटत नाही का? जे काम मनपाने २ कोटी २९ लाख रुपयांमध्ये केले त्याच कामासाठी सन २००९ मध्ये बीओटी तत्वावर ५.९५ लावणार होते असा प्रश्न समितीने केला असता, तो विभागाकडून प्रिमियम देणार होता. त्याची कन्स्ट्रक्शन कॉस्ट ती नाही. ५ कोटी ९५ लाख रुपये त्याने ७० वर्षाचे भाडे धरून प्रिमियम आम्हाला देऊ केले होते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सन २००३ मध्ये विभागाने निविदा काढली आणि सन २००५ मध्ये वर्क ऑर्डर दिली नाही. हे सर्व करीत असताना विभागाने सन २०१३ मध्ये बीओटीचे एस्टिमेटस ३ कोटी ७६ लाख रुपयांचे तयार केले आणि प्रत्यक्षात सदरचे काम २ कोटी २९ लाख रुपयांमध्ये झाले. बीओटीला जास्त दराने द्यावे म्हणून पीसीएमसीने ३ कोटी ७६ लाख रुपयांचे एस्टिमेटस २०१३ मध्ये तयार केले होते का? या सर्व गोष्टींच्या सुस्पष्ट माहितीसह पुढील साक्षीच्या वेळी माहिती द्यावी असे समितीने निदेश दिले.

परिच्छेद क्र. ४.९ मालमत्ता कराची कमी आकारणी -

२.५ या परिच्छेदाबाबत माहिती द्यावी असे समितीने निदेश दिले असता, महाराष्ट्र महापालिका परिशिष्ट ८ मध्ये जो नियम ७ आहे त्यामध्ये रेटेबल व्हॅल्यू ठरविताना ज्याच्यावर कर लागतो त्याच्यावर काय काय डिडक्शन्स पर्मीसिबल आहेत, हे दिलेले आहे. कायद्यामध्ये १० टक्के रिपेअर्स डिडक्शन पर्मिशिबल आहे. सन १९६९ साली शासनाने एक ड्रॉफ्ट नोटिफिकेशन काढले. हे डिडक्शन १५ टक्के असावे, परंतु हे ड्रॉफ्ट नोटिफिकेशन सुध्दा अंतिम झालेले नाही. या ड्रॉफ्ट नोटिफिकेशननुसार कायद्यात बदल पण केला गेला नाही. त्याच्यामुळे पर्मिशिबल डिडक्शन्स १० टक्के आहे. पुणे महानगरपालिकेने मात्र १५ टक्क्याने डिडक्शन केले, असा ए.जी. चा आक्षेप आहे.

विभागाला ते मान्यच आहे. As a Government, we are not able to defend this. असे विभागीय सचिवानी समितीस अवगत केले.

महालेखाकार यांचे म्हणणे आहे की, ४४ कोटी रुपयांचे नुकसान झाले हे सुध्दा खरे आहे काय ? असा प्रश्न समितीने विचारले असता, कायद्याच्या पलिकडे जाऊन कोणत्याच महापालिकेला कारवाई करता येत नाही. त्यांना संरक्षण देण्याचा प्रयत्न करणे शासनालाा क्रमप्राप्त वाटत नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या सर्व विषयामध्ये कायदा अंतिम होण्याच्या अगोदर पुणे महानगरपालिकेने या सर्व गोष्टी केल्या. महालेखापाल यांनी शासनाचे या संदर्भात ४४ कोटी रुपयांचे नुकसान झाले असे आक्षेप नोंदविले आहे या विषयी शासनाची काय भूमिका आहे? असा प्रश्न समितीने उपस्थित केला.

I would like to draw the attention of the Principal Secretary to the reply given by Government. It is mentioned in it, “This Notification dated 2/11/1970, of Pune Municipal Commissioner, this revised rule was implemented from 01/04/1971.” असे प्रधान महालेखाकार यांनी समितीस माहिती दिली.

चालू वर्षाची बिले गेलेली आहेत. बिले जरी गेली असली तरी ती विभागाला रेक्टिफॉय करता येतात. अजून आर्थिक वर्ष संपलेले नाही. आर्थिक वर्ष सन २०१८-२०१९ पासून कायद्यात तरतूद आहे त्यानुसार डिडक्शन देऊन मालमत्ता कर अंतिम करावा, अशा स्वरुपाच्या सूचना विभागाकडून येत्या दोन दिवसात लेखी स्वरुपात देणार आहोत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०११-२०१२ पासून ते आतपर्यंत हे सरूच होते का? महालेखाकारांनी सर्व निदर्शनास आणून दिले तरी देखील महापालिकेने दुरुस्त करायला पाहिजे ते केले नाही याबद्दल खुलासा करावा असे समितीने निदेश दिले असता, हा ऑडिट पॅरा निघण्यापूर्वीच महापालिकेच्या लक्षात आले होते. आपण जो टॅक्स दर लागू करतो त्याला महासभेची मंजुरी लागते. महासभेने सकारात्मक निर्णय घेतला नाही तर प्रशासन तो ठराव विखंडीत करण्यासाठी किंवा त्यामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी पाठवू शकते. सन २०१० पासून सलग पुढील पाच वर्षे हा विषय महापालिकेपुढे ठेवला होता, परंतु महापालिकेने हा विषय दप्तर दाखल केलेला आहे असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

सन २०१० ते २०१५ मध्ये आमसभेमध्ये हा विषय आणला की, विभागाने १५ टक्के कट लावली ती कायद्याप्रमाणे नाही. विभागाच्या म्हणण्यानुसार आमसभेने ती बाब दप्तरी दाखल करून टाकली. त्यावेळेसच्या महापालिका आयुक्तांनी नगरविकास विभागाला कळविले होते का? ती कळविण्याची जबाबदारी कोणाची होती? असा समितीने प्रश्न केला असता, दुर्दैवाने ही बाब कळविण्याचे राहून गेली आहे. ती प्रशासनाची जबाबदारी होती. सन २०१० पासून ज्या ज्यावेळेला हा विषय ठेवला, त्यांनी सपोर्ट केला नाही. तो महापालिकेच्या हितासाठी केलेला प्रस्ताव होता. त्यासाठी प्रशासन आणि आयुक्त यांचेमार्फत महापालिका अधिनियमातील कलम ४५१ नुसार असा ठराव फेटाळण्याचा निर्णय, तो रद्द करण्यासाठी शासनाकडे आपण पाठवू शकतो. शासन त्यावर उचित निर्णय घेऊ शकते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सन २०१३ मध्ये हे निदर्शनास आणले. त्यापूर्वी सन २०१० मध्ये विभागाच्या लक्षात आले. तेव्हापासून आजपर्यंत ज्या आयुक्तांनी पाठविला नाही त्यांना प्रधान सचिवांनी पत्र पाठवावे की, महापालिकेचे जे नुकसान झाले आहे त्याबाबत तुमच्यावर का कारवाई करू नये. आपण शासनाला कळविले असते आणि शासनाने कारवाई केली नसती तर ती गोष्ट वेगळी होती. शासनाचे प्रतिनिधी म्हणून आयुक्त आणि मुख्य कार्यकारी अधिकारी असतात. त्यामुळे त्यांचे कर्तव्य आणि जबाबदारी आहे की, शासनाच्या नियमाप्रमाणे आणि कायद्याप्रमाणे नगरपालिका, महानगरपालिका काम करते की नाही हे कळविले पाहिजे. अशा प्रकारचे पत्र तत्कालीन आयुक्तांना लिहिले पाहिजे. या प्रकरणात पैशांचे जे नुकसान झालेले आहे त्यासाठी आयुक्ताला जबाबदार का धरू नये? जे जे आयुक्त ज्या ज्या कालावधीत होते, त्यांची जबाबदारी होती तेवढे पैसे विभागा आणि त्यांना पत्र पाठवून विचारणा करावी की, आपली जी जबाबदारी होती ती आपण पार का पाडली नाही? अशी समितीने विचारणा केली असता समितीची परवानगी असेल तर या संदर्भात लेखी उत्तर सदर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वासित केले. **(विभागाकडून आश्वासित माहिती प्राप्त झाली आहे विवरणपत्र क्रमांक २)**

अभिप्राय व शिफारशी :-

४.३.   "महसूलाची हानी"

अभिप्राय

३.१ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ४६६(१)(अ)(फ) सह कलम १४७ अंतर्गत, महानगरपालिकेच्या क्षेत्रातून मार्गस्थ होणाऱ्या वाहनांकडून संक्रमण शुल्क (संरक्षक शुल्क) वसूल करण्यासाठी महानगरपालिकांना त्यांच्या आयुक्तांद्वारे प्राधिकृत करण्यात आले. त्यानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेने महानगरपालिका क्षेत्रातून मार्गस्थ होणाऱ्या वाहनांवर संरक्षक शुल्क आकारले आणि स्वतःचे स्त्रोत वापरून सन २००७-०८ या कालावधीत (११ महिने) रु. ८०.९३ लाख प्राप्त केले. परंतु त्यानंतर वसुली करतेवेळी वाहन थांबविताना महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे ही मोहीम बंद करण्यात आली. त्यामुळे महानगरपालिकेने संरक्षक शुल्काची वसुली बाह्य स्त्रोतांचा वापर करून करण्यासाठी निविदा मागविल्या. मे.कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. (कंत्राटदार) या उच्चतम बोलीदाराला संरक्षक शुल्क वसूल करण्यासाठी सात वर्षाच्या कालावधीसाठी कार्यादेश जारी करण्यात आला. संरक्षक शुल्क प्रदान सूचीनुसार कंत्राटदाराने दोन हप्ते आगावू भरावयाचे होते म्हणजे मागणी दाखल करताना रु.८३.४२ लाख आणि व्यवहारांच्या पहिल्या वर्षासाठी ५० आठवड्यांकरिता प्रत्येक आठवड्यासाठी रु. ४१.७१ लाख भरावयाचे होते. कराराचे पुढील वर्ष सुरू होण्याच्या एक महिना आधी त्या वर्षासाठीची रक्कम प्रदानाची सुची जारी करावयाची होती. कंत्राटदाराकडून कामास प्रारंभ होण्यापूर्वी महानगरपालिकेने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि वाहतूक पोलिस विभाग यांच्याकडून ना-हरकत प्रमाणपत्रे प्राप्त करावयाची होती. परंतु कंत्राटदारास कार्यादेश जारी करण्यात आला तरीही संबंधित प्राधिकाऱ्यांकडून NOC प्राप्त होण्यास ५ ते १२ महिन्यांचा कालावधी लागला. त्यानंतरही महानगरपालिकेने जून, २०१२ पासून संरक्षक शुल्क वसुलीचे काम सुरू करण्याविषयी कंत्राटदाराला सूचना जारी केल्या नव्हत्या. परिणामी या कालावधीसाठीचे संरक्षक शुल्क वसूल न केल्यामुळे मिरा-भाईंदर महानगरपालिकेला रु. ३९.६२ कोटींचा महसुली तोटा झाला होता.

संरक्षक शुल्क आकारणी व वसुलीला स्थायी समितीने अधिमान्यता दिल्यानंतर महानगरपालिकेने हे निर्णय शासनाच्या नगरविकास विभागाला कळविले. परंतु त्यांना ते मान्य असल्याचे त्यांनी कळविले नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. वास्तविकतः MMCA अधिनियम, १९४९ च्या कलम ४६६ (१)(अ)(फ) अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातून मार्गस्थ होणाऱ्या वाहनांवर संरक्षक शुल्क आकारण्यासाठी स्थायी आदेश जारी करण्यासाठी आयुक्तांना अधिकार देण्यात आले असताना यासाठी शासनाची मान्यता प्राप्त करण्याची आवश्यकता नव्हती. त्याचप्रमाणे महापालिका क्षेत्रात जकात कर रद्द करून दिनांक १ एप्रिल, २०१० पासून स्थानिक कर (LBT) आकारण्यास सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी LBT लागू असतो अशा ठिकाणी संरक्षक शुल्काची आकारणी व वसुली करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मध्ये कोणतीही विशिष्ट तरतूद नव्हती. तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने सन २०१२-१३ मध्ये LBT (रु.८६.१० कोटी) सह संरक्षक शुल्क (रु.११.२४ कोटी) प्राप्त केले होते. नाशिक महानगरपालिकेने २२ मे २०१३ ते ३१ मार्च २०१४ दरम्यान LBT (रु.४४४.५१ कोटी) सह संरक्षक शुल्क (रु.१२.५७ कोटी) प्राप्त केले होते आणि ठाणे महानगरपालिकेने सन २०१३-१४ दरम्यान LBT (रु.३७०.०१ कोटी) सह संरक्षक शुल्क (रु.४६.६१ कोटी) प्राप्त केले होते. असे असताना मिरा-भाईंदर महानगरपालिकेने हे शुल्क वसूल न केल्यामुळे निश्चितच त्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

शिफारस

३.२ बाह्य स्त्रोतांचा वापर करून खाजगी संस्थांच्या मदतीने संरक्षक शुल्क वसुलीचे कंत्राट २२ महिन्यांच्या प्रदीर्घ काळात अंमलात न आणल्यामुळे मिरा-भाईंदर महानगरपालिकेला रु.३९.६२ कोटी इतकी महसुली हानी झाली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १२७ (अ) अनुसार महानगरपालिकेस जकात कर बसविता येतो. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १२७ (२) (इ) नुसार शहर महानगरपालिकेचे हद्दीमध्ये प्रवेश करणारे वाहनांवर वाहन कर (पथकर) लागू करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. तर उक्त अधिनियमाच्या कलम १४७ मध्ये तात्काळ निर्यातीसाठी आयात केलेल्या वस्तुंबाबत विवेचन करण्यात आले आहे. त्यानुसार त्वरीत निर्यात करावयाचा जकात पात्र माल शहरात प्रवेश करणाऱ्या ज्या वाहनांमधून नेला जातो, त्या वाहनांवर महानगरपालिका क्षेत्रातील प्रवेश नाक्यावरुन निर्गमन नाक्यावर जाताना लेखी परवानगी व पारगमन पास देता येतो. तदनंतर संबंधितांकडून मार्गस्थ दाखल शुल्क (एस्कॉर्ट फी) वसुल करता येते. त्याआधारे मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून दिनांक ३१ मार्च,२०१० पर्यंत जकात कर व त्याआधारे संरक्षक शुल्क वसूल करणे हे नियमानुसार आवश्यकच होते. त्यानुसार महानगरपालिकेने ऑक्टोबर, २००७ ते ऑगस्ट, २००८ पर्यंत वसुली केली परंतु सप्टेंबर, २००८ ते ३१.३.२०१० (LBT लागू होईपर्यत) या कालावधीत केवळ जकात कर वसूल केला परंतु त्यासोबतच संरक्षक शुल्क वसुली

करणे आवश्यक असतानाही ही वसुली करण्यात आली नाही. ही अतिशय गंभीर बाब असून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणारी आहे. त्यानंतर दिनांक १ एप्रिल २०१० पासून जकात कर बंद होऊन स्थानिक संस्था कर (LBT) वसुल करण्यास सुरूवात झाली. पारगमन शुल्क वसुली ही जकात वसुलीच्या कर प्रणालीचा अविभाज्य भाग असल्याने पारगमन शुल्काची वसुली जकात कर अस्तित्वात असेपर्यंतच करणे अभिप्रेत असल्याने जकात कर रद्द केल्यानंतर आपोआपच पारगमन शुल्काची वसुली बंद होणे अपेक्षित होते. त्यामुळे दिनांक १.४.२०१० पुर्वी जकात कर अस्तित्वात असल्यामुळे व मार्गस्थ दाखला शुल्क वसुली ही जकात वसुलीच्या कर प्रणालीचा अविभाज्य भाग असल्याने त्याच्या वसुलीची कार्यवाही अधिनियमातील तरतूदींशी सुसंगत होती. परंतु स्थानिक संस्था कर लागू झाल्यानंतर पारगमन शुल्क सुरू ठेवता येणार नव्हते, कारण ज्याठिकाणी LBT लागू असतो त्याठिकाणी अशा शुल्काची आकारणी व वसुलीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात कोणतीही विशिष्ट तरतूद नव्हती. ही बाब अतिशय सुस्पष्ट असताना व महानगरपालिका क्षेत्रात स्थानिक संस्था कर प्रणाली अंमलात आल्यानंतर दिनांक २७ एप्रिल २०११ रोजीच्या आदेशान्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेने मार्गस्थ दाखला शुल्क वसुलीकरिता खाजगी ठेकेदाराची नियुक्ती करण्याची बाब अधिनियमातील तरतुदींशी निश्चितच विसंगत होती. यासाठी आवश्यक परवानग्या प्राप्त न झाल्यामुळे कंत्राटदाराला ही वसुली करण्याच्या सूचना जारी झाल्या नव्हत्या, त्यामुळे ही वसुली सरू झाली नाही हा निव्वळ योगायोग आहे. अधिनियमातील तरतूद अतिशय सुस्पष्ट असताना व त्याची अंमलबजावणी सर्वच महानगरपालिका स्तरावरुन समानरित्या होणे अभिप्रेत असताना मिरा-भाईंदर महानगरपालिकेने संरक्षक शुल्काची आकारणी व वसुलीचा निर्णय घेऊन त्याचे कंत्राटदेखील अंतिम केले व तो निर्णय राज्य शासनाच्या नगरविकास विभागाला कळविला. परंतु नगरविकास विभागाने याबाबत कोणतेही उत्तर महानगरपालिकेस दिले नाही. एकीकडे महानगरपालिका क्षेत्रातून जाणाऱ्या वाहनांवर संरक्षक शुल्क आकारण्याचे अधिकार आयुक्तांना देण्यात आले होते. त्यामुळे त्यास शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नव्हती. दुसरीकडे LBT मुळे हे शुल्क आकारणी व वसुली करणे अभिप्रेत नव्हते तरीही अशाप्रकारे इतर ठिकाणी संरक्षक शुल्काची वसुली सुरु असल्याने वसुलीचा निर्णय महानगरपालिकेने घेऊन त्यास शासनाच्या मान्यतेची वाट पाहणे व नगरविकास विभागाने यास कोणतेही उत्तर न देणे ही संपुर्ण कार्यपद्धतीच सदोष व निष्काळजीपणाची आहे. शासन व महानगरपालिकेच्या स्तरावरुन अवलंबिण्यात येणाऱ्या आक्षेपार्ह कार्यपद्धतीबाबत तसेच योग्य समन्वय व ताळमेळाचा अभाव याबाबत महालेखापालांनी अतिशय अचूकपणे काही गंभीर बाबी निदर्शनास आणून दिल्या आहेत. मिरा-भाईंदर महानगरपालिकेमध्ये एकीकडे ही परिस्थिती असताना नाशिक, ठाणे व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने मात्र LBT च्या वसुलीसोबतच संरक्षक शुल्काची देखील वसुली सुरू ठेवली असल्याचे महालेखापालांनी निदर्शनास आणले. शासन व सर्वच महानगरपालिकेच्या स्तरावरुन अधिनियमांची अंमलबजावणी एकसमानरित्या होणे आवश्यक असताना त्यात मोठ्या प्रमाणात तफावत व विसंगती आढळून आली. महानगरपालिका या स्वायत्त स्थानिक संस्था असून त्यांच्या कार्यपद्धतीमध्ये शासनाचा थेट सहभाग नसला तरीही त्या राज्य शासनाच्या नगरविकास विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत आहेत. एकीकडे काही महानगरपालिकांमध्ये LBT नंतरही अशा संरक्षक शुल्काची वसुली सुरूच राहिली तर दुसरीकडे मिरा-भाईंदर महानगरपालिकेने शासनाकडे केलेल्या पत्रव्यवहारासंदर्भात नगरविकास विभागाने कोणतेही उत्तर न देणे या बाबी निश्चितच नगरविकास विभागाच्या स्तरावरून देखील बेजबाबदारपणाच्या आहेत. ज्याअर्थी LBT लागू झाल्यानंतर महानगरपालिकांमध्ये ही शुल्क वसुली सुरू राहिली याचाच अर्थ संरक्षक शुल्क वसुलीबाबत व कायद्याच्या अंमलबजावणीबाबत महानगरपालिका स्तरावर संभ्रम होता. अशा परिस्थितीत शासनाने केवळ बघ्याची भूमिका न घेता व अंमलबजावणीमध्ये एकसमानता आणण्यासाठी शासनस्तरावरुन ही स्पष्टता आणणे अभिप्रेत व आवश्यक होते. परंतु विभागाने ते केले नाही. किंबहुना विभागाकडे महानगरपालिकांकडून करण्यात आलेल्या पत्रव्यवहाराला देखील विभागाने तात्काळ उत्तर देणे अभिप्रेत व आवश्यक असताना विभाग वर्षानुवर्षे उत्तर देखील देत नाही. महानगरपालिकांच्या स्तरावरून या तरतुदींच्या अंमलबजावणीतील संभ्रमामुळेच हे सर्व प्रकरण अखेर न्यायालयात दाखल झाले व न्यायालयाने यासंदर्भात दिनांक १० सप्टेंबर २०१४ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयात LBT लागू झाल्यामुळे पारगमन शुल्क वसुलीची पद्धत बंद करणेबाबतचा निर्णय दिला. ही स्पष्टता विभागाने अगोदरच आणली असती तर हे प्रकरण न्यायालयात गेले नसते. जर न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार हे शुल्क वसुलपात्र ठरत नाही, तर मग अशा परिस्थितीत ठाणे, नाशिक, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने अगोदरच वसुल केलेले शुल्क परत करणे आवश्यक असल्याचे समितीने विचारले असता न्यायालयाने या रकमेच्या परताव्याबाबत कोणतेही आदेश दिलेले नसल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. परिणामी ज्या तीन महानगरपालिकांनी ही शुल्क वसुली केली ती राज्य शासनाने वेळेत थांबविणे आवश्यक होते. परंतु ती न थांबविल्यामुळे निश्चितच अन्यायकारकरित्या ही वसुली झाली. ज्यामुळे लोकांवर निश्चितच कोट्यवधी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक बोजा पडला, ज्याचा नाहक भुर्दंड लोकांना सहन करावा लागला. एकीकडे अनधिकृतरित्या ही वसुली सुरू होती ती थांबविणे आवश्यक होते व दुसरीकडे विभागाने मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या पत्रव्यवहारास देखील कोणताही प्रतिसाद न देणे या सर्वच बाबी गंभीर असून या संपुर्ण

सदोष कार्यपद्धतीबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. तसेच मीरा-भाईंदर महानगरपालिकेमध्ये एल.बी.टी. लागू होणे अगोदर म्हणजेच सप्टेंबर, २००८ ते ३१.३.२०१० (LBT लागू होईपर्यंत) हे संरक्षक शुल्क वसुल करण्यात आले नाही. ही वसुलीची व्यवस्था करण्याची जबाबदारी तत्कालिन म.न.पा. आयुक्तांची होती परंतु ती त्यांनी पार पाडली नाही. परिणामी महानगरपालिकेचे निश्चितच आर्थिक नुकसान झाले आहे. व या संपुर्ण बाबीस मीरा-भाईंदर महानगरपालिकेचे तत्कालिन आयुक्त पुर्णतः जबाबदार आहेत. अतः त्यावेळी कार्यरत असलेल्या महानगरपालिका आयुक्तांवर या महसूलाच्या नुकसानीची जबाबदारी निश्चित करावी व पुढील योग्य ती देखील कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी तसेच विभागाने राज्यात सर्वच महानगरपालिकांच्या स्तरावर कार्यपद्धतीमध्ये एकवाक्यता वा एकसमानता राहण्याच्यादृष्टीने आवश्यक त्या सामायिक मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्या. तसेच विभागाकडे प्राप्त पत्रव्यवहारास विभागाने एक महिन्याच्या आत उत्तर देणे बंधनकारक करण्यात यावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

४.५ "निष्फळ खर्च"

अभिप्राय

३.३ गायत्री नगर, नागपूर येथे नागपूर सुधार प्रन्यास ने माहिती तंत्रज्ञान (IT) संकुल टप्प्याटप्प्याने बांधण्याचे प्रस्तावित (नोव्हेंबर,२००५) केले, ज्याचा अंदाजित खर्च रु.२.७७ कोटी एवढा होता. नकाशे, आराखडा आणि अंदाजपत्रक तयार करण्यासाठी संमंत्रक वास्तुशास्त्रज्ञाची नियुक्ती करण्यात आली ज्यांचा मोबदला कामाच्या संपुर्ण किंमतीच्या ३ टक्के दराएवढा होता. पहिल्या टप्प्याच्या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या, ज्यामध्ये तळघर, तळमजला आणि पहिल्या मजल्याच्या कामाचा समावेश होता. बांधकामाचे कंत्राट (नोव्हेंबर,२००६) कंत्राटदाराला रु.२.८८ कोटी किंमतीत १५ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्याच्या अटीवर बहाल करण्यात आले. परंतु कंत्राटदाराने तळघराच्या खोदकामाचे आणि प्रलंबित सिमेंट कॉंक्रीट (RCC) स्तंभाचे रु.१.७८ कोटी किंमतीचे बांधकाम माहे जून,२००८ पर्यंत केले. त्यासाठी वास्तुशास्त्रीय शुल्क म्हणून वास्तुशास्त्रज्ञ संमंत्रकाला रु.४.८६ लक्ष रकमेचे प्रदान करण्यात आले. कामाच्या प्रगती दरम्यान नागपूर सुधार प्रन्यासला असे आढळून आले की, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रालगतच्या भागात खाजगी चालकांद्वारे बांधण्यात आलेल्या खाजगी इमारतींचे सौंदर्यीकरणाच्या कामात खाजगी चालकाने बांधकामाच्या अत्याधुनिक तंत्राचा तसेच अत्याधुनिक बांधकाम साहित्याचा उपयोग केला होता. तसेच नागपूर शहराचा समावेश JNNURM योजनेमधील शहरांमध्ये असल्यामुळे शहरात अनिवार्य सुधारणा करण्यास नागपूर सुधार प्रन्यास बांधील होते. ज्यात सार्वजनिक खाजगी भागीदारीला (PPP) प्रोत्साहन देण्याचा समावेश होता. वरील बाबींना गृहीत धरून नागपूर सुधार प्रन्यासने चालू असलेल्या कामाचे कंत्राट रद्द करण्याचे ठरविले आणि सार्वजनिक खाजगी भागीदारीतून संकल्पचित्र, बांधा, स्वीकारा, वापरा आणि हस्तांतरित करा (DBOOT) या तत्त्वावर प्रकल्पाचे कार्यान्वयन करण्याचे ठरविले.

निविदा सूचनेद्वारे DBOOT तत्त्वावर माहिती तंत्रज्ञान संकुलाचा विकास करण्यासाठी माहे ऑक्टोबर,२०११ मध्ये प्रस्तावासाठी विनंती (RFP) मागविण्यात आली आणि माहे फेब्रुवारी,२०१२ मध्ये हे काम सवलतीदारास रु.१५.०५ कोटी अधिक वार्षिक भू-भाडे रु.३०.१० लक्ष ३० वर्षांच्या सवलत कालावधीसाठी, जो की ९० वर्षांपर्यंत वाढविला जाऊ शकतो या आर्थिक मोबदल्यावर देण्यात आले. परंतु पहिले कंत्राट रद्द केल्यामुळे आपले आर्थिक हित सांभाळण्यासाठी नागपूर सुधार प्रन्यासने कुठलीही यंत्रणा/योजना तयार केली नाही. नागपूर सुधार प्रन्यासने DBOOT प्रकल्पाकरिता RFP दस्तावेज तयार केले. त्यामध्ये कामाच्या ठिकाणी जवळपास १४०० चौ.मी.पायाचे RCC बांधकाम झालेले असण्याचा उल्लेख होता. परंतु कोणत्याही प्रकारच्या आर्थिक विवरणाचा उल्लेख नव्हता. अशाप्रकारे अंशतः बांधकामावर नागपूर सुधार प्रन्यासने सुरूवातीला केलेला रु.१.८३ कोटीचा खर्च निष्फळ ठरला. अधीक्षक अभियंता, नागपूर सुधार प्रन्यासने ही वस्तुस्थिती मान्य केली की, पहिल्या कंत्राटदाराने केलेल्याकामाची किंमत RFP दस्तावेजात समाविष्ट केली नव्हती. नागपूर सुधार प्रन्यासने असे नमूद केले की, "तिथे जसे असेल तसे" या तत्त्वावर निवडलेल्या कंत्राटदाराला जमीन प्रदान करण्यात आली होती आणि त्याला माहिती तंत्रज्ञान संकुलाचा विकास उपलब्ध असलेल्या जुन्या मजबूत सिमेंट कॉंक्रीट बांधकामाचा उपयोग करूनच करावा अशी कोणतीही सक्ती करण्यात आली नव्हती. अधीक्षक अभियंतानी पुढे नमूद केले की, निवडलेल्या कंत्राटदाराला नागपूर सुधार प्रन्यासने मंजूर केलेले नकाशे, आराखडा आणि विनिर्देश याप्रमाणे बांधकाम करावयाचे होते. नागपूर सुधार प्रन्यासला माहिती तंत्रज्ञान संकुलाचे पहिल्या कंत्राटदाराद्वारे बांधकाम हाती घेते वेळीच आजूबाजूला सुरेख प्रमुख दर्शन व अत्याधुनिक सुविधांसह IT-ITES इमारती मोठ्या संख्येत असण्याची जाणीव होती. तरीही प्रथमतःच पुर्ण विचारांती निर्णय न घेतल्यामुळे I.T. पार्कच्या विकासाचे नियोजन सुरूवातीपासूनच चुकीचे होते, ज्यामुळे रु. १.८३ कोटीचा निष्फळ खर्च झाला. महालेखाकारांनी आक्षेपित केलेली रक्कम रु. १.८३ कोटी एवढी नसून प्रत्यक्षात ती रु. १.७० कोटी एवढी असल्याचेही विभागाने स्पष्ट केले.

आय.टी.पार्क तयार करण्यासंदर्भातील हा विषय असून हा निर्णय नागपूर सुधार प्रन्यासच्या विश्वस्त मंडळाचा असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. रु. २.८८ कोटी किंमतीच्या कामापैकी रु. १.७० कोटी खर्च देखील झाले असताना सन २००८ मध्ये अचानक एन.आय.टी.बोर्डाने

पुर्वी घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करून सार्वजनिक खाजगी भागिदारीतून संकल्पचित्र, बांधा, स्विकारा, वापरा आणि हस्तांतरित करा (DBOOT) या तत्त्वावर "जिथे जसे असेल तसे" (on as is where is basis) या तत्त्वावर प्रकल्पाचे कार्यान्वयन करण्याचे ठरविले. प्रस्तुत प्रकल्प रद्द करताना पुर्णपणे व्यावसायिक व आधुनिक तंत्रज्ञान समोर ठेवुन सदरचा निर्णय घेण्यात आल्याचे विभागाने त्यांच्या लेखी उत्तरात नमूद केले आहे. या नवीन प्रकल्पामुळे नागपूर सुधार प्रन्यासला रु.१५.०५ कोटी प्रिमियम (टप्प्याटप्प्याने) व प्रतिवर्षी या प्रिमियमच्या रकमेवर २ टक्के रक्कम रु.३०.१० लक्ष भूभाटक म्हणून मिळणार आहे. त्याअनुषंगाने संबंधित विकासकाकडून प्रिमियमपोटी आतापर्यंत रु.८.३० कोटी इतकी रक्कम नागपूर सुधार प्रन्यासला माहे ऑक्टोबर, २०१५ पर्यत प्राप्त झाली आहे व पुढील हफ्ते देखील प्राप्त होणार आहेत. सदरहू प्रकल्प DBOOT तत्वावर देताना "जिथे जसे असेल तसे" या तत्त्वावर देण्यात आलेले असल्यामुळे मुळ प्रकल्प सुधारित करताना नागपूर सुधार प्रन्यासकडून यापुर्वी या प्रकल्पावर झालेला खर्च सुधारित नियोजनामध्ये समाविष्ट केला असल्याचे देखील विभागीय प्रतिनिधींनी लेखी उत्तरात नमूद केले आहे.

शिफारस

३.४ नागपूर सुधार प्रन्यासने माहिती तंत्रज्ञान इमारतीचे सार्वजनिक खाजगी भागीदारी पद्धतीने योग्य नियोजन न केल्यामुळे रु.१.७० कोटीचा खर्च निष्फळ ठरला आहे असा गंभीर आक्षेप महालेखाकारांनी घेतलेला आहे. एन.आय.टी.बोर्डाने त्यांच्या हिताचा कुठलाही निर्णय घेण्याबाबत समितीचा कोणताही आक्षेप नाही. केवळ महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात आक्षेपित केलेल्या बाबीपुरतीच समितीची छाननी मर्यादीत आहे. नागपूर सुधार प्रन्यासने प्रथमतः एक निर्णय घेऊन त्याची अंशतः अंमलबजावणी झाल्यानंतर व त्यात रु.१.७० कोटी खर्च झाल्यानंतर मधेच संचालक मंडळाने निर्णयाचा नव्याने फेरविचार करणे व अन्य तत्त्वावर व पद्धतीने काम देण्याचा निर्णय घेणे या सदोष कार्यपद्धतीबाबत महालेखाकारांनी आक्षेप नोंदविलेले आहेत. कोणतेही नियोजन न करता हे काम केल्यामुळे तसेच निर्णयाचा फेरविचार केल्यामुळे अगोदर घेतलेल्या निर्णयाची गुणवत्ता प्रश्नांकित केली, परिणामी हा झालेला खर्च निष्फळ ठरणे. विभागाने सुधारित प्रकल्पावर २ एफएसआय आय.टी. पार्कसाठी घेतलेला आहे हे समितीला मान्य आहे. परंतु या कामांवर रु. १.७० कोटी अगोदर झालेला निष्फळ खर्च याचे समर्थन कोणत्याही परिस्थितीत करता येणार नाही. एखादे धोरण निश्चित करताना अथवा कामाचे नियोजन करतानाच सर्व समावेशक बाबींचा व नागपूर सुधार प्रन्यासच्या हिताचा पुर्ण विचार करुनच संचालक मंडळाने निर्णय घेणे आवश्यक होते. नागपूर सुधार प्रन्यासने त्यांच्या हिताचा कोणताही निर्णय घेणेस समितीची कोणतीही हरकत नाही. परंतु एकदा निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर व त्यावर कोट्यांवधीचा निधी खर्च देखील झाल्यानंतर मध्येच अन्यथा निर्णय घेणे ही बाब निश्चितच योग्य नाही.

त्यातही नागपूर सुधार प्रन्यासने निर्णयाचा फेरविचार करून DBOOT तत्वावर हे काम देताना "जिथे जसे असेल तसे" या तत्वावर दिले परंतु त्याठिकाणी रु. १.७० कोटी खर्च करून झालेल्या बांधकामाचा समावेश मात्र निविदेमध्ये नमूद करण्यात आलेला नाही. अगोदरच्या कंत्राटदाराने हे काम मुदतीत केले नव्हते व त्या कामात दरवाढ झालेली होती. त्यामुळे देखील नागपूर सुधार प्रन्यासने ही नवीन योजना अंमलात आणली हे देखील योग्य नाही. कंत्राटदाराने विहित मुदतीत काम न केल्यास करारातील अटी शर्तीनुसार अनेक मार्गाने त्याचेवर दंड आकारता येतो. त्यामुळेच हा निष्फळ खर्च झाल्याचे महालेखाकारांनी घेतलेले आक्षेप योग्य असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. त्यातही दुसरी निविदा काढण्यासाठी देखील ३ वर्षांचा अनावश्यक कालापव्यय झालेला आहे. ही वस्तुस्थिती विभागीय प्रतिनिधींनी मान्य देखील केली व त्यात रु. १.७० कोटीचा अगोदर झालेल्या बांधकामाचा कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही हे देखील समितीसमोर मान्य केले. ज्यावेळी विभागामार्फत कामाची फेरनिविदा काढण्यात आली त्यावेळी अगोदर केलेल्या कामांचे मुल्यांकन करून त्याचेसह काम हस्तांतरीत करून त्याआधारेच पुनर्निविदा काढणे आवश्यक होते. परंतु या प्रकरणी तसे करण्यात न आल्यामुळे हे गंभीर आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. अगोदरच्या निविदेचे काम थांबविण्यामागील कोणतेही समर्थनात्मक कारण समितीला दिसून येत नाही. अगोदरच्या कामात देखील नागपूर सुधार प्रन्यासला एफ.एस.आय. वाढवून घेता आला असता केवळ इमारतीचे चांगले elevation (वास्तु संकल्प) कारण सांगून कंत्राटदार बदलणे हे कारण योग्य वाटत नाही. या सर्व बाबी संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून देण्याची जबाबदारी ज्याची होती त्यांचेवर जबाबदारी निश्चित करून १५ दिवसात समितीला अहवाल देणेबाबत विभागीय प्रतिनिधींनी समितीला आश्वासित केले.

समितीने या प्रकरणाची तपासणी करणेबाबत दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने आश्वासित केल्याप्रमाणे समितीला असे कळविण्यात आले की, पहिल्या निविदेवर रु.१.७० कोटी खर्च झाले होते. नंतर नागपूर सुधार प्रन्यासने पुन्हा निविदा काढून सदरचा प्रकल्प DBOOT तत्त्वावर बांधण्याचे निश्चित केले व यासाठी कंत्राटदारास सन २०१२ ते २०१५ पर्यंत ३ वर्षांत बांधकाम पुर्ण करणे बंधनकारक होते. परंतु त्या कालावधीत दिनांक २१.२.२०१५ पर्यत विकासकाने बांधकाम पुर्ण केले नाही. त्यामुळे दिनांक १७.४.२०१८

पर्यंत बांधकाम पूर्ण करण्याच्या मुदतवाढीसाठी रु. ७५.२५ लक्ष तात्काळ भरणा करणे करीता आणि अतिरिक्त प्रव्याजी (प्रिमियम) रु.१.७० कोटी दोन हफ्त्यात भरणा करणेबाबत दिनांक २२.५.२०१७ रोजी विकासकाला कळविण्यात आले. त्याअनुषंगाने विकासकाने रु.७५.२५ लक्ष चा भरणा केलेला आहे आणि दिनांक १७.६.२०१७ रोजी विकासक मे. विदर्भ इन्फोटेक प्रा.लि. आणि नागपूर सुधार प्रन्यास यांचेमध्ये नविन करारनामा करण्यात आला. दिनांक १७. ०६.२०१७ रोजीच्या करारातील अट क्र. १ नुसार रु. ७५.२५ लक्ष आणि अतिरिक्त प्रव्याजी (प्रिमियम) रु. १.७० कोटी एकुण रु. २.४५ कोटी शुल्क आकारून बांधकाम पुर्ण करण्यास दिनांक १७.०४.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. करारानुसार बांधकाम मुदतवाढीकरीता रु. ७५.२५ लक्ष चा भरणा दिनांक ०६.०६.२०१७ रोजी विकासकाने केलेला आहे. आणि रु. १.७० कोटी लक्ष दोन हफ्यात आकारणी करण्यात आलेले आहे. यापैकी पहिला हफ्ता रु. ८५ लक्ष दिनांक २०.१०.२०१७ रोजी प्राप्त झाला आहे व दुसरा हफ्ता रु.८५ लक्ष करीता अग्रिम धनादेश आणि बँक गॅरंटी विकासकाने जमा केलेली आहे. त्याप्रमाणे रु. ८५ लक्षच्या दुसऱ्या हफ्याकरिता वसुलीची दिनांक २०.१०.२०१८ ची मुदत संपली असून ती रक्कम देखील वसूल करण्यात आली आहे असे समितीला कळविण्यात आले.

उपरोक्त संपुर्ण घटनाक्रम पाहता नागपूर सुधार प्रन्यासने अद्ययावत व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांच्या हिताचा कोणताही निर्णय घेण्याबाबत समितीचे कोणतेही दुमत नाही. तसेच DBOOT तत्वावर हे काम करणे नागपूर सुधार प्रन्यासच्या आर्थिक हिताचेच आहे यातही काही शंका नाही. परंतु निर्णय घेतेवेळी कामाचे संपुर्ण नियोजन दुरदृष्टी ठेवूनच व तत्कालिन आधुनिक तंत्रज्ञानाचा विचार करूनच करणे आवश्यक असताना सदरहू प्रकरणी नागपूर सुधार प्रन्यासने अवलंबिलेली कार्यपद्धती निश्चितच समर्थनीय नाही. त्यातही अगोदर केलेल्या कामाचा समावेश नवीन कामात न करणे या सर्व बाबी अत्यंत आक्षेपार्ह व नागपूर सुधार प्रन्यासचे आर्थिक नुकसान करणाऱ्या तर आहेतच परंतु झालेला खर्च देखील निष्फळ ठरणारा आहे. सदरहू कामात मोठ्या प्रमाणात नियोजनाचा अभाव समितीला दिसून आला व या संपुर्ण प्रकरणी समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. अतः नागपूर सुधार प्रन्यासने हे काम तातडीने पुर्ण करुन घ्यावे व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती विभागाने टाळावी व कामाचे योग्य नियोजन करावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

४.६ "निधीची अडवणूक आणि किंमतीतील टाळता येण्याजोगी वाढ"

अभिप्राय

३.५ उत्तर नागपूर येथील रहिवाशांना मनोरंजनपर सुविधा देण्याच्यादृष्टीने नागपूर सुधार प्रन्यासने वैशालीनगर येथे रु.१७५ लक्ष एवढ्या अंदाजित किंमतीत जलतरणिका बांधण्याचा निर्णय घेतला (जुलै,२००४). महाराष्ट्र शासन आणि नागपूर सुधार प्रन्यास यांनी या प्रकल्पासाठी प्रत्येकी रु.५० लक्ष अंशदान द्यावे या अटीवर नगरविकास विभागाने विशेष शासन अनुदानांतर्गत या उद्देशासाठी रु.१ कोटीचा निधी राखून ठेवला. महाराष्ट्र शासनाने त्यांचा रु.५० लक्ष एवढा हिस्सा वितरीत केला. परंतु आर्थिक टंचाईमुळे नागपूर सुधार प्रन्यासने त्यांचे रु.५० लक्ष अंशदान दिले नाही. जलतरणिकेच्या चार घटकांच्या बांधकामासाठी नागपूर सुधार प्रन्यासने एकूण रु.१०७.१० लक्ष किंमतीवर डिसेंबर, २००४ ते सप्टेंबर, २००७ दरम्यान चार कंत्राट बहाल केले, जे जून, २००५ ते जानेवारी, २००८ दरम्यान (दोन ते सहा महिने) पूर्ण करावयाचे होते. चार घटकांपैकी, फक्त दोन घटक जानेवारी, २००७ (वाढीव कालावधी दरम्यान) आणि जुलै, २००९ (वाढीव कालावधीच्या एक वर्षानंतर) मध्ये पूर्ण करण्यात आले. उर्वरित दोन घटकांपैकी एक घटक एप्रिल,२००६ मध्ये अंशतः पूर्ण झाला आणि संकल्पचित्रातील बदलामुळे दुसऱ्या घटकाचे काम थांबविण्यात आले. ऑक्टोबर,२०१३ पर्यंत कंत्राटदारांना रु.१००.१० लक्षाचे भुगतान केले गेले.

सुरूवातीला जलतरणिकेच्या बांधकामासाठी रु.७६.६३ लक्ष किंमतीचा अंदाज बांधला होता आणि रु.७६.५४ लक्ष किंमतीला निविदा मंजूर करण्यात आली. तथापि, कंत्राटदाराला कार्यादेश या अटीवर निर्गमित करण्यात आले की, खर्च फक्त रु.५० लक्षाएवढाच मर्यादित करण्यात येईल. परिणामी, निविदेमध्ये समाविष्ट असलेल्या ९५ कामांच्या बाबींपैकी फक्त २० कामांचे कार्यान्वयन करण्यात आले आणि त्याचे अंतिम देयक रु.४९.९५ लक्ष म्हणजेच महाराष्ट्र शासनाद्वारे ऑगस्ट,२००४ मध्ये दिलेल्या रु.५० लक्ष अंशदानाइतपत होते. वर्ष २००५-०६ ते २००७-०८ दरम्यान महाराष्ट्र शासनाद्वारे दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत वितरित केलेल्या अनुदानामधून रु.५०.१५ लक्षाचा (रु.१००.१० लक्ष – रु.४९.९५ लक्ष) उर्वरित खर्च करण्यात आला.

ऑक्टोबर,२०१३ पर्यंत जलतरणिकेला कुठल्याही प्रकारे पाणी पुरवठ्याची जोडणी करण्यात आली नव्हती. जरी नागपूर सुधार प्रन्यासने जलतरणिकेपासून अंदाजे ५०० मीटरच्या अंतरावर स्थित विहिरीपर्यंत पाईप लाईन टाकली होती तरी विहिरीतून पाणी काढण्यात आले नाही. कारण विहिरीच्या बाजूची जागा एका मंदिर संस्थेच्या अनधिकृतपणे ताब्यात होती.

जलतरणिकेचे बांधकाम पूर्ण झाले नसतानाही नागपूर सुधार प्रन्यासच्या विश्वस्त मंडळाने सार्वजनिक खाजगी भागीदारी अंतर्गत जलतरणिकेच्या आवारातच "क्लब हाऊस" चे बांधकाम करण्याचे ठरविले (सप्टेंबर,२०११). संमंत्रक वास्तुशास्त्रज्ञाने जलतरणिकेचे काम पूर्ण करण्यासह या

प्रकल्पाच्या किमतीचा रु.११ कोटीचा अंदाज बांधला होता. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाद्वारे नागपूर सुधार प्रन्यासला दिलेले रु.१.३५ कोटीचे विशेष शासन अनुदान ऑक्टोबर,२०१३ पर्यंत उपयोगात आणले गेले नाही, कारण संमंत्रक वास्तुशास्त्रज्ञाद्वारा तयार केलेले क्लब हाऊसचे प्रमुख दर्शन आणि संकल्पचित्र आधीच असलेले स्नान घर पाडून करावयाचे होते, ज्यास नागपूर सुधार प्रन्यासकडून मंजुरी प्राप्त झाली नव्हती असे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

उपरोक्त जलतरणिकेचा प्रस्ताव शासनाकडून आलेला असून नागपूर शहराच्या विकासासाठी सन २००४-०५ मध्ये मंजूर विशेष अनुदानातून हे काम घेण्यात आले होते व तीन टप्प्यात या कामाची विभागणी करण्यात आली. निधी उपलब्धतेनुसार ही कामे करण्याचा निर्णय नागपूर सुधार प्रन्यासने घेतला व त्यासाठी रु.५० लक्ष एवढा हिस्सा महाराष्ट्र शासनाने व रु.५० लक्ष नागपूर सुधार प्रन्यासने देण्याबाबत निर्णय झाला. परंतु नागपूर सुधार प्रन्यासची आर्थिक परिस्थिती सक्षम नसल्यामुळे त्यांनी त्यांचे हिश्श्याचा निधी उपलब्ध करुन दिला नाही व शासनाने या प्रकल्पासाठीचा पूर्ण निधी द्यावा अशी विनंती शासनास केली. परंतु दरम्यानच्या कालावधीत शासनाकडून प्राप्त निधी वित्तीय नियमावलीनुसार विहित कालमर्यादेत खर्च होणे आवश्यक असल्याने केवळ रु.५० लाखापर्यंतचे काम कंत्राटदारास प्राधान्याने पूर्ण करणेबाबत कळविण्यात आले. त्यानंतर शासनाने सन २००५ ते २०१६ पर्यंत नागपूर सुधार प्रन्यासला टप्प्याटप्प्याने वेगवेगळ्या योजनेखाली निधी प्राप्त करुन दिला. अशाप्रकारे शासनाने रु.३.७२ कोटी व रु.१९ लक्ष नागपूर सुधार प्रन्यासने यात योगदान दिलेले आहे. सदरहू कामासाठी दलितवस्तीसाठीचा निधी कसा काय घेता येईल, अशी विचारणा समितीने केली असता ज्याठिकाणी ही जलतरणीका बांधण्यात येणार होती तो भाग दलितवस्तीमधील असल्याने यास कोणतीही अडचण नव्हती. या तीन टप्प्यातील कामांमध्ये मूळ आराखड्यात झालेले बांधकाम तोडून त्या जागेवर क्लब हाऊसचे बांधकाम PPP तत्वावर प्रस्तावित करण्याचे नागपूर सुधार प्रन्यासच्या विश्वस्त मंडळाने निश्चित केले. त्यासाठी नव्याने रु.११.६० कोटी रकमेचा अंदाज प्रस्तावित केला होता व निधी देखील शासनाकडून प्राप्त झाला. परंतु त्याठिकाणी अगोदरच शासकीय खर्चातून झालेली बांधकामे तोडून नवीन बांधकाम करणे वित्तीय शिस्तीला धरुन नसल्याने नागपूर सुधार प्रन्यासने क्लब हाऊसचा प्रकल्प पुढे राबविला नाही व तो निधी इतर कामांवर खर्च करण्यात आला. सद्यःस्थितीत याठिकाणी जलतरण तलाव, स्नानगृह, डेक, भूमिगत पाण्याची टाकी, संरक्षक भिंत व जलशुद्धीकरण केंद्र ही कामे पुर्ण झालेली आहेत. तसेच जलतरण तलावामधील व्यायामशाळेचे काम युथ हाऊस, बॅटमिन्टन कोर्ट, कॅन्टीन व ओपन कोर्टचे काम पूर्ण झालेले आहे. या व्यतिरिक्त नागपूर सुधार प्रन्यासच्या मालकीच्या जागेवरील विहीरीतून पाणीपुरवठा करण्यासाठी पाईप लाईन टाकलेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले असता नागपूर सुधार प्रन्यासने सदरहू कॉम्प्लेक्सचा ताबा नागपूर महानगरपालिकेला दिला आहे काय, अशी विचारणा समितीने केली असता दिनांक १२.१२.२०१७ रोजी कॉम्प्लेक्सचा ताबा महानगरपालिकेला देण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. यावर समितीने आक्षेप नोंदवित सदरहू कॉम्प्लेक्सचे काम पूर्ण करण्यासाठी नागपूर सुधार प्रन्यासला सन २००४ ते २०१७ एवढा प्रदीर्घ कालावधी लागलेला आहे. त्यातही केवळ महानगरपालिकेला याचा ताबा दिल्याचे समितीसमोर सांगण्यात येत आहे. परंतु वास्तविकतः त्यास अजूनही टाळे लावले असल्याचे फोटोग्राफ समितीकडे उपलब्ध असल्याचे समितीने निदर्शनास आणले असता ही बाब विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्य केली. ही बाब योग्य नसून या संपूर्ण कार्यपद्धतीवर समिती नापसंती व्यक्त करीत आहे.

शिफारस

३.६ नागपूर सुधार प्रन्यासद्वारे जलतरणिकेच्या बांधकामाचे योग्य नियोजन न केल्यामुळे सहा वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी रु.१ कोटी एवढ्या निधीची अडवणूकच झाली. तसेच प्रकल्पाच्या किमतीत रु.१.७२ कोटीची वाढ झाली असे आक्षेप महालेखाकारांनी घेतले. समितीने याची विस्तृत छाननी केली असता जलतरणिका प्रकल्प अंमलबजावणीच्या नियोजनात गंभीर उणिवा समितीला निदर्शनास आल्या असून नागपूर सुधार प्रन्यासने निधीच्या उपलब्धतेची खातरजमा न करता अथवा प्रकल्पाच्या सुसाध्यतेचा अभ्यास किंवा सर्वेक्षण न करता प्रकल्पाचे कार्यान्वयन करण्यात आले. त्यामुळे ६ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी कोट्यावधी रुपयांचा निधी अडकून पडला. शिवाय प्रकल्पाच्या किमतीत रु.१.७२ कोटीची वाढ झाली. या सर्वच बाबी आर्थिक नियोजनाचा अभाव दर्शविणाऱ्या असून वित्तीय शिस्तीला अनुसरुन नाहीत. एवढे करुनही अद्यापही हा जलतरण तलाव व संकुल सर्वसामान्य जनतेसाठी खुला करण्यात आलेला नाही. दलितवस्ती विभागात हे संकुल उभे असून त्यावर झालेला खर्च हा दलितवस्ती निधीमधून करण्यात आलेला असल्यामुळे त्या संकुलाचा पूर्ण लाभ हा दलित कुटुंबांना प्राधान्याने व कमीत कमी शुल्क आकारुन मिळणे अभिप्रेत व आवश्यक असताना अद्यापही त्याची अंमलबजावणी झालेली नाही. नागपूर सुधार प्रन्यासने निधीची उपलब्धता विचारात घेऊनच कामाचे नियोजन करणे आवश्यक होते. तथापि, तसे न केल्याने प्रकल्प पूर्ण होण्यास जास्तीचा कालावधी लागलेला आहे व त्याचा लाभ देखील नागरिकांना मिळू शकलेला नाही ही अतिशय गंभीर बाब आहे. अतः पुढील १ महिन्यात जलतरण तलाव व संकुलाच्या वापरास तातडीने सुरुवात करण्यात यावी व याचा लाभ दलित लोकांना कमीत कमी शुल्क आकारुन मिळावा व हा जलतरण तलाव चालविण्यास देणेबाबतची निविदा आता काढण्यात आली असून आर्थिक निविदा (फायनॅन्शीअल बीड) देखील उघडण्यात आली

असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. अतः ती निविदा प्रक्रिया नियमानुसार अंतिम करुन तात्काळ हे संकुल वापरण्यास खुले करण्यात यावे. असे आदेश समितीने दिले. तसेच नागपूर सुधार प्रन्यासने निधीची उपलब्धता विचारात घेऊनच कामाचे नियोजन करणे आवश्यक होते. तथापि, तसे न झाल्याने प्रकल्प पूर्ण होण्यास सन २००४ ते २०१७ इतका अमर्याद कालावधी लागलेला आहे. कामे कधी सुरु करावी व किती कालावधीत ती पूर्ण करावी याचे कोणतेही नियोजन व ताळमेळ नागपूर सुधार प्रन्यासच्या स्तरावर दिसून आले नाही. भविष्यात नागपूर सुधार प्रन्यासकडून राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पामध्ये अशी परिस्थिती उद्‌भवू नये याची काळजी घेण्याबाबत तसेच आर्थिक बाबींचे नियोजन अधिक योग्यरित्या करणेबाबत नागपूर सुधार प्रन्यासला आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना शासनस्तरावरुन निर्गमित करण्यात याव्यात व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस २ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

४.८ "व्यापारी संकुलाच्या बांधकामाच्या वेळ आणि खर्चात वाढ आणि महसुली हानी"

अभिप्राय

३.७ रस्ता रुंदीकरणामुळे विस्थापित झालेल्या दुकानदारांच्या पुनर्वसनासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने (PCMC) चिंचवड येथील राखीव भूखंडावर एक व्यापारी संकूल बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता दिली होती (जून, २००३). हे काम रु. १.४२ कोटी निविदा मुल्यावर एका कंत्राटदाराला देण्यात आले होते. (ऑक्टोबर, २००५). जे एप्रिल,२००७ पर्यत पूर्ण व्हावयास हवे होते. कामासाठी नोव्हेंबर, २००७ पर्यंत मुदतवाढ दिली गेली होती. परंतु रु. ८५ लक्ष खर्चुन, ७० टक्के काम पूर्ण झाल्यावर निधीच्या कमतरतेच्या कारणावर PCMC ने काम थांबविले (जानेवारी, २००८).

त्यांनतर PCMC ने बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा (BOT) या तत्वावर उर्वरित काम पूर्ण करण्याचा निर्णय घेतला ज्याला BOT समितीने जुलै, २००९ मध्ये मान्यता दिली रु.५.९५ कोटी बोली देणारे मे. इंटरनॅशनल कन्व्हेयर लिमिटेड, कोलकता (विकासक) हे उच्चतम बोलीदार ठरल्यामुळे ऑक्टोबर, २०१० मध्ये विकासकाला वाटप पत्र (LOA) जारी केले गेले आणि विकासकाला LOA प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत PCMC आणि विकासक यांच्या दरम्यान एक विकास करार करावयाचा होता. BOT प्रकल्प विकासकाला ७० वर्षाच्या भाडेपट्टी कालावधीकरिता देण्यात आला होता.

परंतु स्थानिक रहिवासी, विधानमंडळ सदस्य आणि महापालिकेच्या माजी सदस्यांनी प्रकल्पास जोरदार विरोध दर्शविल्यामुळे BOT प्रकल्पाच्या कामामध्ये प्रगती होऊ शकली नाही. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने PCMC ला, व्यापारी संकुलाचा पालिकेच्या स्वतःच्या निधीतून आणि BOT व्दारे विकास करण्याचा तुलनात्मक अभ्यास करून जे जास्त फायदेशीर आहे त्यानुसार निर्णय घेण्याचा सल्ला दिला होता. त्यानुसार PCMC ने संदर्भित संकुलाचा BOT तत्वावर विकास करणे अधिक फायदेशीर होते (कारण कंत्राटदारास निर्धारित अधिमूल्य आगाऊ भरावे लागणार होते) असे नगरविकास विभागास कळवून याबाबतीत पुढे मार्गदर्शन करण्यास सांगितले. परंतु नगरविकास विभागाने त्यांचा निर्णय कळविण्याऐवजी सप्टेंबर, २०१२ मध्ये म्हणजे जवळजवळ १९ महिन्यांनंतर नवीन शंका उपस्थित केल्या ज्यांचे निरसन PCMC ने जानेवारी,२०१३ मध्ये केले.

मार्च,२०१३ मध्ये PCMC ला लक्षात आले की (अ) नगरविकास विभागाकडून निर्णय घेण्यात विलंब झाला होता, (ब) ऑक्टोबर,२०१० मध्ये LOA जारी करून दोन वर्षे आणि पाच महिने उलटल्यावरही विकासकाबरोबर कोणताही विकास करार करण्यात आला नव्हता, (क) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९, अंतर्गत तयार करण्यात आलेल्या नवीन विनियमांना लक्षात घेता महानगरपालिकेच्या मालकीच्या सर्व मालमत्ता जास्तीत जास्त ३० वर्षासाठी भाडेपट्टी वर देण्यास मुभा होती, तरीही, BOT प्रकल्प ७० वर्षाच्या भाडेपट्टीवर देण्यात आला होता आणि (ड) दरम्यानच्या कालावधीत जमिनीच्या किमतीमध्ये वाढ झाली होती. वरील सर्व प्रतिकूल घटक विचारात घेऊन PCMC ने LOA रद्द करण्याचा प्रस्ताव मांडला जो जुलै, २०१३ मध्ये BOT समितीने मंजूर केला व महानगरपालिकेच्या स्वतःच्या निधीमधून उर्वरित बांधकाम हाती घेऊन रस्ता रुंदीकरणामुळे विस्थापित झालेल्या दुकानदारांचे लवकरात लवकर पुनर्वसन करण्याचाही निर्णय घेण्यात आला.

PCMC ने जानेवारी,२०१३ मध्ये केलेल्या अंदाजानुसार शिल्लक कामाची किंमत रु.३.७६ कोटी होती व मार्च,२०१४ पर्यंत देखिल कामासाठी निविदा मागविण्यात आल्या नव्हत्या. सुधारित आराखडे आणि अंदाजपत्रक तयार केल्यावर व निविदा मागवल्यावर प्रकल्पाच्या किमतीमध्ये वाढ होण्याची शक्यता होती. मार्च,२०१४ पर्यंत महानगरपालिकेच्या स्वतःच्या अंदाजानुसार, सात वर्षाहूनही अधिक काळ (जानेवारी,२००८ ते मार्च,२०१४) रु.०.८५ कोटी एवढा निधी अडकून राहणे आणि भाडेपट्टी भाडयापोटी प्राप्त व्हावयाच्या कमीत कमी वार्षिक रु.१.५२ कोटी इतक्या महसूलाचा आवर्ती हानी होणे या बरोबरच प्रकल्पाची किंमत रु. ३.१९ कोटीने वाढली होती. उपरोक्त संपूर्ण कार्यपद्धती अतिशय गंभीर असून निश्चितच महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणारी आहे.

शिफारस

३.८ व्यापारी संकुलाच्या बांधकामावर, रु.८५ लाख खर्च केल्यानंतर निधीच्या कमतरतेमुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने जानेवारी,२००८ मध्ये हे काम थांबविले. जे मार्च,२०१४ पर्यंत देखिल पूर्ण झाले नव्हते, परिणामी व्यापारी संकुलाच्या बांधकामाच्या वेळ आणि खर्चात वाढ होऊन महसुली हानी झाली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नोंदविलेले आहेत. प्रथमतः महानगरपालिकेने व्यापारी संकुलाचे काम सुरु केले व नंतर निधीअभावी ते बंद केले. काम सुरु करण्यापूर्वी कामासाठी लागणारी आर्थिक तरतूद असल्याशिवाय कामे सुरु करणे निश्चितच अभिप्रेत नाही. एकीकडे कामे सुरु करायची व अर्धवट कामे झाल्यानंतर आर्थिक तरतुदीअभावी ती थांबवायची हे विभागांतर्गत कमकुवत आर्थिक नियोजनाचे द्योतक आहे. सन २००३ मध्ये कामाचे नियोजन करतेवेळी व निविदा प्रक्रिया राबवून काम सुरु करेपर्यंत महानगरपालिकेची आर्थिक स्थिती मजबूत असणे परंतु त्यानंतर मात्र ती खालावणे ह्या बाबी निश्चितच अनाकलनीय वाटतात. या कामाकरिता राज्य किंवा केंद्र शासनाकडून निधी प्राप्त न होता तो महानगरपालिकेलाच खर्च करावयाचा असताना त्याचे योग्य नियोजन महानगरपालिकेने करणे आवश्यक होते. सन २००५-०६ मध्ये महानगरपालिकेचे जकातीचे उत्पन्न रु.५११ कोटी एवढे होते. सन २००७ ते २००९ दरम्यान आर्थिक मंदीमुळे अचानकपणे उत्पन्नात घट झाली. त्यामुळे तत्कालिन आयुक्तांनी केवळ मोठ्या प्रकल्पांचे काम सुरु ठेवून लहान प्रकल्पांच्या कामांना काट लावण्याचा निर्णय घेतल्यामुळे ही कामे बाजूला ठेवण्यात आली या विभागाच्या खुलाशावर समितीने आक्षेप नोंदवित प्रकल्पाची कामे थांबविताना केवळ लहान व मोठी कामे असे निकष न लावता प्रकल्पाचे काम किती टक्के पूर्ण झाले आहे व किती टक्के होणे शिल्लक आहे याचा देखील आढावा घेवूनच व ५० टक्क्यापेक्षा जास्त काम पूर्ण झालेल्या प्रकल्पांना देखील पूर्ण करणे हे महानगरपालिकेचे प्राधान्य असणे आवश्यक होते. परंतु तसे करण्यात आले नाही. तदनंतर सदरचे काम महानगरपालिका स्तरावर करावे किंवा बीओटी तत्वावर करावे याबाबतचा निर्णय विचाराधीन राहिल्यामुळे निर्णय घेण्यास अमर्याद विलंब झाला. या प्रकरणी शासनाकडून अभिप्राय मागविण्यात आले असता विषयांकित प्रकरणाबाबत महानगरपालिकेने आर्थिक हिताचा निर्णय घ्यावा असे नगरविकास विभागाने कळविले. महानगरपालिकेची तत्कालिन आर्थिक परिस्थिती लक्षात घेता महानगरपालिकेमार्फत उर्वरित प्रकल्प बीओटी तत्वावर लवकरात लवकर पूर्ण करणे आर्थिक हिताचे असल्याचे म्हणणे मांडले व पुढील मार्गदर्शन करणेबाबत शासनास विनंती करण्यात आली. एकीकडे बीओटी तत्वावर हे काम करण्याबाबत विकासकाला इरादा पत्र देण्यात आले तर दुसरीकडे नागरीकांच्या व लोकप्रतिनिधींच्या तक्रारीमुळे सदरचा प्रकल्प पुन्हा महानगरपालिकेमार्फत करण्याचा निर्णय घेण्यात आला. या संपूर्ण कार्यपद्धतीमध्ये जवळजवळ १९ महिन्यांचा विलंब झाला आहे.

उपरोक्त संपूर्ण कार्यपद्धती पाहता महानगरपालिका स्तरावरील निर्णयामध्ये व त्याच्या अंमलबजावणीमध्ये एकवाक्यता, नियोजनाचा अभाव व निर्णयातील विसंगती या बाबींमुळे हा प्रकल्प पूर्ण होण्यास अमर्याद विलंब लागलेला आहे. याहीउपर जागा भाडेपट्टयाने देण्याचा सर्वाधिक कालावधी हा ३० वर्षांचा असतानाही या प्रकरणात महानगरपालिका सभेत ठराव करुन बीओटी तत्वावरील जागा ९९ वर्षाचे कराराने हस्तांतरीत करणेस मान्यता दिल्याचे समितीला दिलेल्या आश्वासित माहितीमध्ये नमूद करण्यात आले आहे. ही देखील बाब नियमबाह्य आहे. या प्रकल्पात महानगरपालिका स्तरावरुन अवलंबिण्यात आलेली संपूर्ण कार्यपद्धती निश्चितच दोषपूर्ण व शंकास्पद आहे. याहीउपर गंभीर बाब म्हणजे या प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता सन २००३ मध्ये देण्यात आली परंतु मार्च,२०१४ पर्यंत या प्रकरणी कोणतीही कार्यवाही होऊ शकली नाही. मध्यंतरी शासनस्तरावर देखील अभिप्राय देण्यासाठी प्रकरण १९ महिने प्रलंबित राहिले व त्याही नंतर शासनाने त्यावर निर्णय घेतला नाही. या संपूर्ण मुद्यांबाबत विभागाने सुस्पष्ट माहिती समितीस सादर करावी असे समितीने निदेशित केले असता यासंदर्भात विभागाकडून (विवरणपत्र क्र. ३ जोडल्याप्रमाणे) माहिती प्राप्त झालेली आहे. एकूणच या प्रकरणी अवलंबिण्यात आलेली कार्यपद्धती ही निश्चितच सुसंगत, नियोजबद्ध व शासनाच्या वा महानगरपालिकेच्या हिताची नव्हती व अंतिमतः सन २०१३ मध्ये महानगरपालिकेच्या स्तरावर ई.पी.सी.वर हा प्रकल्प देण्याचा निर्णय घेण्यात आला. महानगरपालिकेने सदरहू काम ई.पी.सी. वर एकूण रु.२.२९ कोटीमध्ये (प्रकल्पावर स्थापत्य विभागामार्फत करण्यात आलेला खर्च रु. ८४.८८ लक्ष + प्रकल्पावर आलेला खर्च १.४४ कोटी) पूर्ण केले, जे काम महानगरपालिकेने स्वतः केल्यामुळे रु.२.२९ कोटीमध्ये पुर्ण झाले व त्यापेक्षा कित्येक पटीने जास्त उत्पन्न महानगरपालिकेला प्राप्त होणार आहे. त्याच कामासाठी सन २००९ मध्ये बीओटी तत्वावर ९९ वर्षाच्या भाडेपट्टीस रु.५.९५ कोटी इतक्या रकमेचा प्रस्ताव प्राप्त झाला होता. हा संपूर्ण घटनाक्रम पाहता उपरोक्त प्रकरणी शासन व महानगरपालिका स्तरावर अवलंबिण्यात येणारी कार्यपद्धती अतिशय आक्षेपार्ह असून समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. महानगरपालिकेने त्यांचे अंतर्गत करावयाचे कामाचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. त्यापृष्ठ्यर्थ आवश्यक निधीची तरतूद देखील करुन मगच पुढील कार्यवाही करावी, काम सुरु झाल्यानंतर ते विहित मुदतीत संपवावे व त्यात मध्येच फेरबदल करु नये व प्रकल्प विहित कालावधीत पूर्ण करण्याचा काटेकोर प्रयत्न करावा. तसेच महानगरपालिका स्तरावरुन शासनास काही

बाबींसंदर्भात विचारणा झाल्यास नगरविकास विभागाने देखील विनाविलंब आपले अभिप्राय वा उत्तरे महानगरपालिकेला देऊन शासनाच्या भूमिकेची स्पष्टता विहित मुदतीत करावी व भविष्यात असे आक्षेप टाळावेत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

४.९ "मालमत्ता कराची कमी आकारणी"

अभिप्राय

३.९ मुंबई प्रांतिक महानगरपालिका (बीपीएमसी) अधिनियम, १९४९ च्या अनुसूची "ड" अंतर्गत प्रकरण VII (कर नियम) नियम ७ (१) च्या तरतुदींनुसार मालमत्ता कर देय असलेल्या कुठल्याही इमारत किंवा जमिनीचे पट्टीयोग्य मुल्य (आरव्ही) ठरवितांना अशी जमीन किंवा इमारत भाडयाने दिल्यास, अशी जमीन किंवा इमारत दरवर्षी सर्वसाधारणपणे ज्या अपेक्षित दराने भाडयाने दिली जाईल. त्या वार्षिक भाड्याच्या १०% रक्कम वजा करावी व दुरुस्ती किंवा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी केलेल्या वजावटीऐवजी केलेली असावी. (बीपीएमसी) अधिनियमातील सदर अधिसूचीच्या नियम ९ (ब) मध्ये अशी तरतूद आहे की प्रत्येक इमारत आणि जमिनीचे आरव्ही अधिनियमाच्या तरतुदींनुसार ठरवायला हवे. मालमत्ता कर विभागाच्या २०१०-११ ते २०१२-१३ या कालावधीच्या दस्तऐवजांची तपासणी केली असता असे आढळून आले की, पुणे मनपाने (पीएमसी) मालमत्तेचे आरव्ही ठरवितांना अधिनियमांतर्गत दुरुस्तीसाठी अनुज्ञेय असलेल्या १०% वजावटी ऐवजी १५% वजावट ग्राह्य केली. परिणामी रु. ४३.९६ कोटी इतकी मालमत्ता कराची कमी आकारणी झाली. ज्यामुळे पीएमसीला त्याप्रमाणात महसुलाची हानी झाली. यासंदर्भात पीएमसीने सांगितले (जून, २०१३) की, केलेली १५% वजावट ही दिनांक ३ एप्रिल १९७० ला झालेल्या पीएमसीच्या सर्वसाधारण सभेच्या बैठकीत झालेल्या ठरावाला (क्र.५) अनुसरुन ग्राह्य करण्यात आली होती. वास्तविकतः अधिनियमात योग्य दुरुस्ती केल्याशिवाय आरव्हीच्या दरात बदल करता येत नाही. अशाप्रकारे बीपीएमसी अधिनियम, १९४९ च्या सदर तरतुदीचे अनुपालन न केल्यामुळे रु. ४३.९६ कोटी मालमत्ता कराची कमी आकारणी झाली. दि.०३.१२.१९६९ व डिसेंबर, १९६९ ची अधिसूचना ही प्रारुप अधिसुचना (Draft Notification) असून त्याअनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील परिशिष्ट ८ चे नियम ७ मध्ये बदल करण्याबाबतची कोणतीही अंतिम अधिसूचना निर्गमित झालेली नाही किंवा कायद्यात बदल करण्यात आलेला नाही. त्यामुळे मालमत्ता कर देय असलेल्या कुठल्याही इमारत किंवा जमिनीचे करपात्र मुल्य (Ratable Value) ठरविताना अशी जमीन किंवा इमारत भाड्याने दिल्यास अशी जमीन किंवा इमारत दरवर्षी साधारणपणे ज्या अपेक्षित दराने भाड्याने दिली जाईल त्या वार्षिक भाड्याच्या १० टक्के प्रमाणे रक्कम एकूण करपात्र मुल्यातून वजा करण्याची तरतूद कायम आहे व सदरच्या कायद्यातील तरतुदीनुसार पुणे महानगरपालिकेमार्फत १५ टक्के ऐवजी १० टकके रक्कम करपात्र मुल्यातून वजा करण्याची कार्यवाही होणे अपेक्षित आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे.

शिफारस

३.१० महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९५९ मधील परिशिष्ट ८ नियम (७) मध्ये दिनांक ०३.१२.१९६९ व डिसेंबर, १९६९ ची अधिसूचना ही प्रारुप अधिसूचना (Draft Notification)असून त्याअनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील परिशिष्ट ८ चे नियम ७ मध्ये बदल करण्याबाबतची कोणतीही अंतिम अधिसूचना निर्गमित झालेली नाही किंवा कायद्यात बदल करण्यात आलेला नाही. त्यामुळे मालमत्ता कर देय असलेल्या कुठल्याही इमारत किंवा जमिनीचे करपात्र मुल्य (Ratable Value) ठरविताना अशी जमीन किंवा इमारत भाड्याने दिल्यास अशी जमीन किंवा इमारत दरवर्षी साधारणपणे ज्या अपेक्षित दराने भाड्याने दिली जाईल त्या वार्षिक भाड्याच्या १० टक्के प्रमाणे रक्कम एकूण करपात्र मुल्यातून वजा करण्याची तरतूद कायम आहे व सदरच्या कायद्यातील तरतूदीनुसार पुणे महानगरपालिकेमार्फत १५ टक्के ऐवजी १० टक्के रक्कम करपात्र मुल्यातून वजा करण्याची कार्यवाही होणे अपेक्षित आहे, सन १९६९ मध्ये शासनाने ही कपात १५ टक्के करणेबाबत प्रारुप अधिसूचना काढली. परंतु त्यानुसार अंतिम अधिसूचना निर्गमित न झाल्यामुळे कायद्यात बदल केला गेला नाही त्यामुळे ही कपात १० टक्केच राहिली. परंतु ही सुधारणा अधिनियमात अंतिम झाली नसतानाही पुणे महानगरपालिकेने मात्र १५ टक्क्यांनी कपात करणे सुरु ठेवले. असे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविले असता विभागीय प्रतिनिधींनी हे आक्षेप मान्यच केले व याचे कोणतेही समर्थन विभाग करणार नाही असे समितीसमोर सांगितले. कायद्याच्या पलिकडे जाऊन कोणत्याच महानगरपालिकेला कारवाई करता येत नाही. असे असताना पुणे महानगरपालिकेने या सर्व गोष्टी केल्या व यात महानगरपालिकेचे मालमत्ता करापोटी सन २०१०-२०१३ या गत ३ वर्षात रु.४४ कोटीचे नुकसान झाले, व ही रक्कम आजतागायत म्हणजे सन २०१७-१८ पर्यंत परिगणित केली असता या नुकसानाची अधिकची रक्कम अंदाजे रु. ६० कोटी इतकी आहे व अशाप्रकारे महानगरपालिकेचे २०१०-२०१८ पर्यंत जवळजवळ एकूण रु. १०४ कोटीपेक्षा जास्तीचे आर्थिक नुकसान झाले आहे. अद्यापही आर्थिक वर्ष संपलेले नसल्यामुळे यात सुधारणा करण्यास अजूनही वाव आहे. त्यानुसार कपात करुन मालमत्ता कर अंतिम करावा अशा स्वरुपाच्या सूचना विभागाकडून येत्या दोन दिवसात लेखी स्वरुपात देणार असल्याचे विभागीय

प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. वास्तविकतः या सर्व बाबी महानगरपालिकेच्या निदर्शनास स्वतःहून येणे आवश्यक होते. परंतु महालेखाकारांनी निदर्शनास आणून देईपर्यंत त्याअनुषंगाने कोणतीही कार्यवाही महानगरपालिकेने केली नाही. याहीउपर महालेखापालांनी ही बाब सन २०११-१२ मध्ये आक्षेपाद्वारे निदर्शनास आणून समितीची साक्ष लागेपर्यंत विभागाने या प्रकरणी काहीच कारवाई केली नाही. हे त्याचवेळी महानगरपालिकेने दुरुस्त करणे आवश्यक होते. परिणामी यात महानगरपालिकेचे आजतागायत जवळजवळ रु.१०४ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. यावर विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले की, ही बाब महालेखाकारांच्या आक्षेपाअगोदरच महानगरपालिकेच्या लक्षात आली होती व सन २०१० पासून सलग पुढील ५ वर्षे हा विषय महापालिकेपुढे ठेवला होता. परंतु महापालिकेने हा विषय दफ्तरदाखल केला व त्यावर निर्णय घेण्यात आला नाही. महानगरपालिकेने लावलेली १५ टक्के कपात कायद्याप्रमाणे नाही ही बाब तत्कालिन महापालिका आयुक्तांनी शासनाच्या निदर्शनास आणली नाही, जी प्रशासनाची जबाबदारी होती. एखादा ठराव महासभेने नियमानुसार घेतला नाही तर प्रशासन तो ठराव विखंडीत करण्यासाठी किंवा त्यामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी शासनाकडे पाठवू शकते व यावर शासनाला उचित निर्णय घेणे शक्य होते. परिणामी झालेल्या नुकसानीस तत्कालिन आयुक्त देखील तितकेच जबाबदार आहेत. या प्रकरणी विभागाने व महानगरपालिकेने दिनांक १ एप्रिल,२०१८ पासून पुढे याची अंमलबजावणी करता येईल असेही समितीसमोर आश्वासित केले असता समितीने यावर आक्षेप नोंदवित जी तरतूदच कायद्यात अस्तित्वात नव्हती त्याचा आधार घेऊन या कराची कमी आकारणी करण्यात आली. असे असताना तांत्रिकदृष्ट्या याची अंमलबजावणी आता पुर्वलक्षी प्रभावाने होणे आवश्यक आहे. कारण ही आकारणीच सदोष आहे. कोणीही कायद्याच्या बाहेर जाऊन ही आकारणी करू शकत नाही. या प्रकरणी तत्कालिन महापालिका आयुक्तांना नोटीस देऊन समितीला सुधारीत माहिती सादर करणेबाबत विभागीय सचिवांनी आश्वासित केले. त्याअनुषंगाने समितीस कळविण्यात आले की, (माहिती विवरणपत्र क्र. २ मध्ये जोडल्याप्रमाणे) सदरहु प्रकरणाची वस्तुस्थिती व कायद्यातील तरतुदी विचारात घेता पुणे महानगरपालिकेने केलेल्या कार्यवाहीचे समर्थन करता येणार नाही व त्यास अनुसरून सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार करपात्र मुल्यातून १५ टक्के ऐवजी १० टक्के सवलत देण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी असे दिनांक ०६.०७.२०१८ च्या पत्रान्वये आयुक्त, पुणे महानगरपालिकेस कळविण्यात आलेले आहे. तसेच मुख्यसभा ठराव क्र. ५ दिनांक ०३.०४.१९७० अन्वये पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकतीची कर आकारणी करताना वार्षिक भाड्यातून १० टक्क्याऐवजी १५ टक्के सवलत देणेबाबत ठराव संमत करण्यात आला असून सदर ठराव विखंडन करण्याबाबतची कार्यवाही राज्य शासन स्तरावर सुरू आहे. असे विभागाने समितीला कळविले आहे. परंतु समिती या खुलाशावर सहमती दर्शवू शकत नाही. जी तरतूदच अधिनियमात नव्हती त्याआधारे देण्यात आलेली वाढीव सूट वा सवलत ही नियमबाह्यच आहे. परंतु विभाग यात आता सन २०१८ पासून सुधारणा करीत आहे. परंतु याप्रकरणी सन २०१०-१८ दरम्यानच्या कालावधीत झालेल्या कमी वसुलीबाबत विभाग व महानगरपालिका त्यांचे लेखी उत्तरात काहीही उल्लेख करीत नाही. ही बाब गंभीर असून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणारी आहे. समिती या संपूर्ण कार्यपद्धतीवर तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. विभागाने या प्रकरणी सन २०१० ते २०१८ या कालावधीतील सर्व तत्कालीन आयुक्तांवर व अन्य संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी व ही वसुली सन २०१८ पासून नव्हेतर पुर्वलक्षी प्रभावाने करणे आवश्यक आहे. सदरहू १५ टक्के प्रमाणे सवलत ही सन १९७० पासून लागू झालेली आहे. त्यामुळे इतक्या अगोदरपासून ही वसुली कितपत शक्य आहे याच्या पर्यायाचा देखील विभागाने अभ्यास करून निर्णय घ्यावा. परंतु महालेखाकारांनी हे आक्षेप सन २०१०-११ ते २०१२-१३ चा कालावधीसाठी नोंदविल्यानंतर तरी ही वसुली महानगरपालिकेने करणे आवश्यक होते, परंतु ती करण्यात आली नाही. अतः ही वसुली महालेखापालांनी आक्षेप नोंदविल्यापासून करण्यात यावी व तशाप्रकारच्या सूचना, कार्यवाही व वसुली विभागाच्या व महानगरपालिकेच्या स्तरावरून तात्काळ करण्यात याव्यात व कायद्यातील तरतुदीची तंतोतंत अंमलबजावणी करावी व या संपूर्ण प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिशिष्ट-अ

विवरणपत्र क्र. १

नागपूर सुधार प्रन्यास

स्टेशन रोड, सदर, नागपूर– ४४०००१

(संकेतस्थळ–www.nitnagpur.org)

क्रमांक : नासुप्र सभापती/ 143 नागपूर, दिनांक 27/ 9 /२०१८

प्रति,

मा. समिती प्रमुख,
लोकलेखा समिती,
१९ वा मजला, विधान भवन,
मुंबई–४०००३२.
(मार्फत मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग–२)

विषय:– भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा सन २०१२–२०१३ चा स्थानिक संस्था अहवाल लेखा परिच्छेद क्र. ४.५ संदर्भात समितीसमोर झालेल्या साक्ष अनुषंगाने मुद्यांसंदर्भात माहिती व चर्चा करण्याकरीता आयोजित बैठक.

संदर्भ:– १) मा. समिती प्रमुख, लोकलेखा समिती यांचे मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना निर्गमित दिनांक १८/०९/२०१८ रोजीचे पत्र.
२) कार्यासन अधिकारी, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक–लोलेस–२०१५/प्र.क्र.१११/नवि–२६, दिनांक १९/०९/२०१८.

मा. महोदय,

विषयाधीन प्रकरणी दिनांक ०६/०६/२०१८ रोजी लोकलेखा समितीसमोर साक्ष संपन्न झाल्यानंतर, साक्षी दरम्यान दिलेल्या माहिती संदर्भात काही आक्षेप प्राप्त झाला होता.

या आक्षेपाचे अनुषंगाने दिनांक २९/०८/२०१८ रोजी सभापती, नागपूर सुधार प्रन्यास यांची लोकलेखा समितीसमोर साक्ष संपन्न झाली. या साक्षीच्या संदर्भात दिनाक २५/०९/२०१८ रोजी मा. समिती प्रमुख, लोकलेखा समिती यांच्या विधान भवन मुंबई, येथील दालनात झालेल्या बैठकित मा. समिती प्रमुख यांनी साक्ष दरम्यान वस्तुस्थितीनुसार सभापती, नागपूर सुधार प्रन्यास यांनी त्यांच्या दिनांक २९/०८/२०१८ रोजीच्या साक्षीत सांगितल्या प्रमाणे लेखी वस्तुस्थिती सादर करण्याचे निर्देशित केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे वस्तुस्थिती सादर आहे.

१) सदरचा प्रकल्प DBOOT तत्वावर इमारत बांधण्याचा होता.

२) त्याअनुषंगाने मे. विदर्भ इन्फोटेक प्रा.लि. आणि नागपूर सुधार प्रन्यास यांच्यात बांधकाम पुर्ण करण्याच्या अनुषंगाने दिनांक २१/०२/२०१२ रोजी मुळ करार व दिनांक १७/०६/२०१७ रोजी दुरुस्ती करार (Correction/ Modification/ Amendment to the Agreement dt. 21/2/2012) झालेला आहे.

३) दिनांक २१/०२/२०१२ रोजीच्या करारानुसार बांधकाम दिनांक २१/०२/२०१५ पर्यंत पुर्ण

करणे विकासकाला बंधनकारक होते.

४) दिनांक २१/०२/२०१५ पर्यंत विकासकाने बांधकाम पुर्ण केले नाही.

५) दिनांक १७/०४/२०१८ पर्यंत बांधकाम पूर्ण करण्याच्या मुदतवाढीसाठी रू. ७५.२५ लक्ष तात्काळ भरणा करणे करीता आणि अतिरीक्त प्रव्याजी (प्रिमीयम) रू. १.७० कोटी दोन हप्त्यात भरणा करणेबाबत दिनांक २२/०५/२०१७ रोजी विकासकाला कळविण्यात आले. विकासकाने दिनाक ०६/०६/२०१७ रोजी रू. ७५.२५ लक्ष चा भरणा केलेला आहे आणि दिनांक ०९/०६/२०१७ रोजी सुधारीत करारनामा करण्याबाबत सम्मतीपत्र सादर केले.

६) दिनांक १७/०६/२०१७ रोजी विकासक मे. विदर्भ इन्फोटेक प्रा.लि. आणि नागपूर सुधार प्रन्यास यांचे मध्ये दुरुस्ती करारनामा (Correction/ Modification/ Amendment to the Agreement dt. 21/2/2012) करण्यात आला.

७) दिनांक १७/०६/२०१७ रोजीच्या करारातील अट क्रमांक १ नुसार रू. ७५.२५ लक्ष आणि अतिरीक्त प्रव्याजी (प्रिमीयम) रू. १.७० कोटी आणि असे एकुण रू. २.४५ कोटी शुल्क आकारुन बांधकाम पुर्ण करण्यास दिनांक १७/०४/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

८) दिनांक १७/०६/२०१७ रोजी चा करार उभय पक्षाच्या सम्मती नुसार झालेला आहे. करारानुसार बांधकाम मुदतवाढी करीता रू. ७५.२५ लक्ष चा भरणा दिनांक ०६/०६/२०१७ रोजी विकासकाने केलेला आहे आणि रू. १७० लक्ष दोन हफत्यात आकारणी करण्यात आलेले आहे. या पैकी पहिला हफ्ता रू. ८५ लक्ष दि. २०/१०/२०१७ रोजी प्राप्त झालेला आहे आणि दुसरा हफ्ता रू. ८५ लक्ष दि. २०/१०/२०१८ रोजी प्राप्त होणार आहे. या करीता अग्रिम धनादेश आणि बॅंक गॅरंटी विकासकाने जमा केलेली आहे.

कृपया कळावे, हि विनंती.

आपला विश्वासू

(अश्विन मुदगल)

सभापती

नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर

विवरणपत्र क्र. २

सन २०१०-११ ते २०१२-१३ वरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापन अहवाल.

पुणे महानगरपालिका.

अ.क्र.	भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा महसूली जमा रकमावरील लेखा परीक्षा अहवाल/आक्षेप	विभागाचे स्पष्टीकरणात्मक अभिप्राय
१	**४.९ मालमत्ता कराची कमी आकारणी** मालमत्तेचे पट्टीयोग्य मुल्य ठरवितांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदींचे अनुपालन न केल्यामुळे रु.४३.९६ कोटीच्या मालमत्ता कराची कमी आकारणी झाली परिणामी पुणे महानगरपालिकेला महसूली हानी झाली. महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका (बीपीएमसी) अधिनियम १९४९ च्या अनुसूची ड अंतर्गत प्रकरण VII (कर नियम) च्या नियम ७ (१) तरतुदींनुसार मालमत्ता कर देय असलेल्या कुठल्या ही इमारती किंवा जमिनीचे पट्टीयोग्य मुल्य (आरव्ही) ठरवितांना अशी जमीन किंवा इमारत भाडयाने दिल्यास, अशी जमीन किंवा इमारत दरवर्षी सर्वसाधारणपणे ज्या अपेक्षित दराने भाडयाने दिली जाईल, त्या वार्षिक भाड्याच्या १०% रक्कम वजा करावी व दुरुस्ती किंवा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी केलेल्या वजावटींऐवजी केलेली असावी. (बीपीएमसी) अधिनियमातील सदर अधिसूचीच्या नियम ९ (ब) मध्ये अशी तरतूद आहे की प्रत्येक इमारत आणि जमीनीचे आरव्ही अधिनियमाच्या तरतुदीनुसार ठरवायला हवे. मालमत्ता कर विभागाच्या २०१०-११ ते २०१२-१३ या कालावधीच्या दस्तऐवजांची तपासणी केली असता असे आढळून आले की, पुणे मनपाने (पीएमसी) मालमत्तेचे आरव्ही ठरवितांना अधिनियमांतर्गत दुरुस्तीसाठी अनुज्ञेय असलेल्या १०% वजावटी १५% वजावट ग्राह्य केली. परिणामी रु. ४३९६ कोटी इतकी मालमत्ता कराची कमी आकारणी झाली. ज्यामुळे पीएमसीला त्याप्रमाणात महसूलाची हानी झाली. त्याचा तपशील खाली दिला आहे.	१. या प्रकरणी दि.२६.०६.२०१८ रोजी लोकलेखा समितीची साक्ष झालेली आहे. सदर साक्षीमध्ये झालेल्या चर्चेनुसार मालमत्तेचे पट्टीयोग्य मुल्य ठरवितांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीचे अनुपालन न केल्यामुळे रु.४३.९६ कोटीच्या मालमत्ता कराच्या झालेल्या हानीबाबतच्या आक्षेपाबाबत यापूर्वी पुणे महानगरपालिकेने सादर केलेले अभिप्राय सुधारीत करण्यात येत आहेत. २. प्रस्तुत प्रकरणी महालेखापाल कार्यालयाने "Whether subsequent required amendment in the Act has been done after issuing of notification allowing 15 % deduction for repairs for repairs instead of 10 %" असा आक्षेप घेतला होता. ३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९अन्वये पुणे शहरातील मिळकतीची करआकारणी करण्यात येते. परिशिष्ठ ८ नियम ७मध्ये करपात्र रक्कम ठरवितांना वार्षिक भाड्यातून देखभाल दुरूस्तीसाठी १०% सवलत देणेबाबत तरतूद आहे. ४. मुख्यसभा ठराव क्र.५ दिनांक ०३.०४.१९७० अन्वये पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकतींची करआकारणी करतांना वार्षिक भाड्यातून १०% ऐवजी १५ % सवलत देणेबाबत ठराव संमत करण्यात आला असल्याने त्याप्रमाणे वार्षिक करपात्र रक्कम ठरवितांना १५% सवलत देण्यात आलेली आहे. ५. या संदर्भात सखोल चौकशी व माहिती घेतली असता, खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आढळून आली आहे :- महाराष्ट्र शासन अर्बन डेव्हलपमेंट पब्लीक हेल्थ ॲंड हौसींग डिपार्टमेंट चे पत्र क्र. पीएमसी-१०६९/२२२९२-सी, दिनांक ०३.१२.१९६९ तसेच शासनाकडील अधिसूचना क्र.पीएमसी

वर्ष	वार्षिक भाड्याच्या ८५% निश्चित दराने कलेले आरक्षी (रुपये कोटीत)	वार्षिक भाड्याच्या ९०% दराने निश्चित करावयाचे आरक्षी (रुपये कोटीत)	आरक्षी ची कमी निश्चित(रुपये कोटीत)	मालमत्ता कराचा दर (टक्क्यात)	मालमत्ता कराची कमी आकारणी (रुपये कोटीत)
२०१०-११	४४३.६०	४६९.६९	२६.०९	३९.७५	१०.३७
२०११-१२	५०८.४२	५८३.३३	२९.९१	५०.७५	१५.१८७
२०१२-१३	५६०.०१	५९२.९५	३२.९४	५५.९०	१८.४१
एकूण					४३.९६

लेखापरीक्षणात हे निदर्शनास आणून दिल्यानंतर पीएमसी ने असे सांगितले (जून २०१३) की, केलेली १५% वजावट ही दिनांक ३ एप्रिल १९७० ला झालेल्या पीएमसी च्या सर्वसाधारण सभेच्या बैठकीत झालेल्या ठरावाला (क्र.५) अनुसरुन ग्राह्य करण्यात आली होती.

हे उत्तर मान्य करता येत नाही कारण अधिनियमात योग्य दुरुस्ती केल्याशिवाय आरक्षी च्या दरात बदल करता येत नाही.

अशाप्रकारे बीपीएमसी अधिनियम १९४९ च्या सदय तरतुदीचे अनुपालन न केल्यामुळे रु. ४३.९६ कोटी मालमत्ता कराची कमी आकारणी झाली.

हे प्रकरण शासनाला जुलै २०१३ मध्ये संदर्भित केले होते, मार्च २०१४ पर्यंत उत्तर प्राप्त झाले नव्हते.

१०६९/१२९२ सो. डिसेंबर, १९६९ तसेच पुणे महानगरपालिकेचे आयुक्त यांचेकडील अधिसूचना क्र. टीप/नील/९८३, दिनांक ०२.११.१९७० अन्वये १० % ऐवजी १५% सवलत दिनांक ०१.०४.१९७१ पासून लागू करण्यात आली आहे.

६. त्याअनुषंगाने पुस्तुत प्रकरणी तपासणी केली असता दि.०३.१२.१९६९ व डिसेंबर, १९६९ ची अधिसूचना ही प्रारूप अधिसूचना (Draft Notification) असून त्याअनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील परिशिष्ट ८ चे नियम ७ मध्ये बदल करण्याबाबतची कोणतीही अंतिम अधिसूचना निर्गमित झालेली नाही किंवा कायद्यात बदल करण्यात आलेला नाही. त्यामुळे मालमत्ता कर देय असलेल्या कुठल्याही इमारत किंवा जमिनीचे करपात्र मुल्य (Ratable Value) ठरवितांना अशी जमिन किंवा इमारत भाड्याने दिल्यास अशी जमिन किंवा इमारत दरवर्षी साधारणपणे ज्या अपेक्षित दराने भाड्याने दिली जाईल त्या वार्षिक भाड्याच्या १०% प्रमाणे रक्कम एकूण करपात्र मूल्यातून वजा करण्याची तरतूद कायम आहे व सदरच्या कायद्यातील तरतूदीनुसार पुणे महानगरपालिकेमार्फत १५ % ऐवजी १० % रक्कम करपात्र मूल्यातून वजा करण्याची कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

७. उपरोक्त वस्तुस्थिती व तरतूदी विचारात घेता पुणे महानगरपालिकेने केलेल्या कार्यवाहीचे समर्थन करता येत नाही. त्यास अनुसरून सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार करपात्र मुल्यातून १५ % ऐवजी १०% सवलत देण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी असे दि.०६.०७.२०१८ च्या पत्रान्वये आयुक्त, पुणे महानगरपालिकेस कळविण्यात आलेले आहे.

८. तसेच मुख्यसभा ठराव क्र.५ दिनांक ०३.०४.१९७० अन्वये पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकतींची करआकारणी करतांना वार्षिक भाड्यातून १०% ऐवजी १५ % सवलत देणेबाबत ठराव संमत करण्यात आला असून सदर ठराव विखंडन करण्याबाबतची कार्यवाही राज्य शासन स्तरावर सुरू आहे.

महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.६३०/नवि-२२
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२
दिनांक : ६ जून, २०१८

प्रति,

आयुक्त,
पुणे महानगरपालिका,
पुणे

विषय : भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ स्थानिक संस्था लेखा परिक्षा अहवालातील लेखा परिच्छेद ४.९ बाबत लोकलेखा समितीची साक्ष.

संदर्भ : आपले क्र.टीजीओ/६८२६, दि.२२.३.२०१६ चे पत्र.

महोदय,

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार महानगरपालिका क्षेत्रातील मिळकतींची कर आकारणी करण्यात येते. सदर अधिनियमातील परिशिष्ट ८ नियम ७ मध्ये करपात्र रक्कम ठरविताना वार्षिक भाड्यातून देखभाल दुरुस्तीसाठी १०% सवलत देणेबाबत तरतूद आहे.

२. मुख्यसभा ठराव क्र.५ दिनांक ३.४.१९७० अन्वये पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकतींची कर आकारणी करताना वार्षिक भाड्यातून १०% ऐवजी १५% सवलत देणेबाबत ठराव संमत करण्यात आला असल्याने त्याप्रमाणे वार्षिक करपात्र रक्कम ठरविताना १५% सवलतपुणे महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेली आहे. ही बाब कायद्यातील तरतूदीचा भंग करणारी आहे. या संदर्भात सन २०१२-१३ च्या स्थानिक संस्था अहवालातील लेखापरिक्षण अहवालामध्ये सदर बाब निदर्शनास आलेली असून याबाबत महालेखापाल कार्यालयाने आक्षेप घेतलेले आहेत.

३. मालमत्ता कर देय असलेल्या कुठल्याही इमारत किंवा जमिनीचे करपात्र मुल्य (Ratable Value) ठरविताना अशी जमिन किंवा इमारत भाड्याने दिल्यास, अशी जमिन किंवा इमारत दरवर्षी साधारणपणे ज्या अपेक्षित दराने भाड्याने दिली जाईल, त्या वार्षिक भाड्याच्या १० % प्रमाणे रक्कम एकूण करपात्र मुल्यातून वजा करण्याची तरतूद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील परिशिष्ट ८ मधील नियम ७ मध्ये कायम आहे. त्यामुळे अधिनियमातील सदरहू तरतूदीनुसार पुणे महानगरपालिकेमार्फत १५ % ऐवजी १० % रक्कम करपात्र मुल्यातून वजा करण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे. तरी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार करपात्र मुल्यातून १०% सवलत देण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी.

आपला,

(सं.श.गोखले)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

क्र.पीएसी २०१५/प्र.क्र.६३९/नवि-२२
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ६ जुलै, २०१६

प्रति,

आयुक्त,
पुणे महानगरपालिका,
पुणे

विषय : भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ स्थानिक संस्था लेखा परिक्षा अहवालातील लेखा परिच्छेद ४.९ बाबत लोकलेखा समितीची साक्ष.

संदर्भ : आपले क्र.टीजीओ/६८१६, दि.२२.३.२०१६ चे पत्र.

महोदय,

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदींनुसार महानगरपालिका क्षेत्रातील मिळकतींची कर आकारणी करण्यात येते. सदर अधिनियमातील परिशिष्ठ ८ नियम ७ मध्ये करपात्र रक्कम ठरवितांना वार्षिक भाड्यातून देखभाल दुरूस्तीसाठी १०% सवलतदेणेबाबततरतूदआहे.

२. मुख्य सभा ठराव क्र.५ दिनांक ३.४.१९७० अन्वये पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकतींची करआकारणी करतांना वार्षिक भाड्यातून १०% ऐवजी १५ % सवलत देणेबाबत ठराव संमत करण्यात आला असल्याने त्याप्रमाणे वार्षिक करपात्र रक्कम ठरवितांना १५% सवलत पुणे महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेली आहे.

३. उपरोक्त बाब कायद्यातील तरतूदीचा भंग करणारी आहे. तसेच या संदर्भात सन २०१२-१३ च्या स्थानिक संस्था अहवालातील लेखापरिक्षण अहवालामध्ये सदर बाब निदर्शनास आलेली आहे.

४. याबाबत महालेखापाल कार्यालयाने आक्षेप घेतलेले असूनही सन २०१० पासून तत्कालीन आयुक्तांनी अधिनियमातील तरतूदीनुसार करपात्र मुल्यातून १० % वजावट करण्याऐवजी १५ % वजावट केलेली आहे.

५. महालेखापालांच्या आक्षेपास अनुसरून १० % प्रमाणे वजावट करण्याची बाब वेळोवेळी महापालिकेच्या निदर्शनास आणली असल्याचे अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी लोकलेखा समितीच्या साक्षीमध्ये निदर्शनास आणलेले आहे.

६. वास्तविक उपरोक्त बाब तत्कालीन आयुक्तांनी राज्य शासनाच्या तात्काळनिदर्शनास आणूण ठराव विखंडनाबाबतची योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक होते. तथापि सदर बाब राज्य शासनाच्या निदर्शनास न आणता अधिनियमातील तरतूदीच्या विसंगत असे धोरण मालमत्ता कराच्या आकारणीबाबत अवलंबले आहे. तरी याबाबत सन २०१० पासून पुढील कालावधीत कार्यरत असलेल्या संबंधीत तत्कालीन आयुक्तांचा खुलासा प्राप्त करून घेऊन शासनास ८ दिवसांत सादर करण्यात यावा.

आपला,

(सं.श.गोखले)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

विवरणपत्र क्र. ३

महाराष्ट्र शासन

क्र. पीएमसी-२०१५/प्र.क्र.९८/नवि-२२
नगर विकास विभाग,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०४/१०/२०१८

प्रति,

लेखा अधिकारी (नवि-३१)
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२

विषय :- भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ स्थानिक संस्था लेखा परिक्षा अहवालातील लेखा परिच्छेद ४.८ बाबत लोकलेखा समितीची साक्ष.

महोदय,

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने दि. २६.०६.२०१८ रोजी मा.लोकलेखा समितीसमोर साक्ष झालेली असून सदर साक्षीमध्ये झालेल्या चर्चेच्या वेळी समितीने आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रस्तुत आक्षेपाच्या अनुषंगाने अतिरिक्त माहिती सादर करण्याचे निदेश दिलेले होते. त्यास अनुसरुन आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी उपरोक्त उपस्थित मुद्यांबाबत अतिरिक्त माहिती सादर केलेली असून सोबत विवरणपत्र व आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या दि. ०७.०८.२०१८ च्या अहवालाची प्रत जोडण्यात आलेली आहे.

आपला,

(दिलीप आ. वणिरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

अवर सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, यांना दि. २६.०६.२०१८ रोजी मा.लोकलेखा समिती समोर झालेल्या साक्षीमध्ये समितीने दिलेल्या निदेशास अनुसरुन अतिरिक्त माहितीचे विवरणपत्र व आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचा दि. ०७.०८.२०१८ च्या अहवालाची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे.

११८

सं.क्र. ९२९२/नवि-२२
१०/८/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

ब-क्षेत्रिय कार्यालय, एल्प्रो कंपनी परिसर, लिंक रोड, चिंचवडगांव, पुणे-३३.
(नागरी व प्रशासकीय सेवेसाठी आयएसओ 9001:2008 प्रमाणपत्र प्राप्त संस्था)
Email – bward@pcmcindia.gov.in Website – www.pcmcindia.gov.in
दुरध्वनी क्रमांक – ०२०-२७३५०१५३

जावकक्रमांकबक्षेका/कावि/१२/२९१/२०१८, दिनांक -०७/०८/२०१८

प्रति,
श्री. दिलीप आ. वणिरे,
कक्ष अधिकारी, नवि – २२
नगरविकास विभाग
मंत्रालय मुंबई ३२

विषय – भारताचे नियंत्रण व महालेखापरिक्षक यांच्या लसन २०१२-१३ त्या स्थानिक संस्था लेखा परिक्षा अहवालातील लेखा परिच्छेद क्र ४.८. मधील आक्षेपाबाबत...

संदर्भ – मा. लोक लेखा समिती कडील दि. २६/०६/२०१८ रोजीची साक्ष.

उपरोक्त विषयाबाबत लेखापरीक्षणातील अहवालाच्या अनुषंगाने लेखा परिच्छेद क्र ४.८ बाबतचे मा. लोक लेखा समितीचे साक्षी दरम्यान उपस्थित केलेल्या मुद्दांबाबतचे माहितीचा खुलासा सोबतच्या परिशिष्टाप्रमाणे असुन पुढील योग्य त्या कार्यवाहीकामी आपणाकडे सादर करणेत येत आहे.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८

आज प्राप्त
१०/८/२०१८

टिपण -

दि.०४/०८/२०१८

विषय– भारताचे नियंत्रण व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-१३ त्या स्थानिक संस्था लेखा परिक्षा अहवालातील लेखा परिच्छेद क्र ४.८. मधील आक्षेपाबाबत.

उपरोक्त विषयीबाबत मा. लोकलेखा समिती समोर दि. २६/६/२०१८ रोजी साक्ष झाली. सदर साक्षी दरम्यान मा. लोकलेखा समितीने प्रामुख्याने पुढील प्रमाणे मुद्दे उपस्थित करणेत आले..

१) प्रथम निविदा कार्यवाहीस विलंब का झाला.

२) सदर कामास केलेल्या अंदाजपत्रकातील तरतुद व खर्चाचा तपशिल.

३) कामाशी संबंधीत तत्कालीन अधिकारी.

४) बीओटी पध्दतीने भाडेकरार कालावधी ७० वर्षे इतका कसा निर्धारीत केला.

विषयांकीत प्रस्तावित काम प्रामुख्याने तीन टप्प्यात झालेचे दिसुन येईल यामध्ये१) प्रथमतः मनपाचे स्थापत्य विभागामार्फत निविदा काढणेत आली. सदरचे कामांतर्गत G + 2 एवढे आरसीसीचे काम करणेत आले.

२) तदनंतर मनपाचे आर्थिक स्थितीमुळे उर्वरीत प्रकल्प बीओटी तत्वावर करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेत आला. त्यानुसार दुस-या टप्प्याचे उर्वरीत प्रकल्प बीओटी तत्वावर पुर्ण करणेकामी निविदा कार्यवाही करणेत आली.

३) सदर कामास स्थानिक विरोध झाल्याने प्रकल्पाचे उर्वरीत काम बीओटी वर न करता मनपा फंडातुन करणेबाबतचा निर्णय घेणेत आला. तदनंतर तिस-या टप्प्यामध्ये मनपाचे फंडामधुन उर्वरीत काम पुर्ण करणेत येवुन मनपाचे भुमी आणि जिंदगी विभागाकडे पुढील कार्यवाहीकामी हस्तांतरीत करणेत आला.

मा.लोकलेखा समिती कडील उपस्थित मुद्दांचा मुद्देनिहाय खुलासा खालील प्रमाणे

१) प्रथम निविदा कार्यवाहीस विलंब का झाला :-

सदर प्रस्तावित कामास प्रथमता मा.मनपा सभा ठराव क्र ४४९१, दि. १३/६/२००३ अन्वये र.रू. १.९६ कोटी रकमेस प्रशासकीय रकमेस मान्यता मिळाली आहे. तदनंतर सदर कामास वास्तुविशारद यांची नेमणुक प्रस्तावास दि. २९/११/२००३ अन्वये मान्यता मिळाली. मा. स्थायी समिती ठराव क्र. ५०४४, दि. १६/१/२००४ अन्वये वास्तुविशारद नेमणुकीस मान्यता घेवुन कामाचे आदेश दि. २५/२/२००४ रोजी देणेत आले. वास्तुविशारदाने प्रकल्पास क्र बी.पी./चिंच/२३/२००४, दि. ३१/३/२००४ अन्वये बांधकाम परवानगी घेणेत आली. मनपाचे सन २००४-०५ चे अंदाजपत्रकामध्ये सदर कामास तरतूद उपलब्ध नसल्याने निविदा कार्यवाही करता सुरू करता आली नाही. सन २००५-०६ चे अंदाजपत्रकात र.रू. १५,००,०००/- इतकी तरतुद प्रस्तावित केलेनंतर प्रकल्पाचे काम करणेस दि. ३/२/२००५ मध्ये निविदा प्रसिध्द करून निविदा कार्यवाही पुर्ण करून मा. स्थायी समिती कडील ठराव क्र ११२६६, दि. ०५/१०/२००५ अन्वये दि. २८/१०/२००५ रोजी कामाचे आदेश देणेत आले.

उपरोक्त बाबींचे आवलोकन करून निविदा कार्यवाहीस विलंब झाला नसल्याचे आढळुन येईल. याबाबत कृपया प्रपत्र अ चे अवलोकन व्हावे.

कृ. न. पा

२)सदर कामास केलेल्या अंदाजपत्रकातील तरतुद व खर्चाचा तपशिल :-

अंदाजपत्रकातील वर्षनिहाय तरतुद व खर्चाचा तपशिलखालील प्रमाणे आहे.

अंदाजपत्रकीय तरतुद व खर्चाचा तपशिल				
अ.क्र	वर्ष	मुळ तरतुद	सुधारीत तरतुद	खर्च
१	२००४ - ०५	०	०	२४२१३४
२	२००५ - ०६	१५००००००	२५००००००	३०८१३३
३	२००६ - ०७	१५००००००	२३००००००	२८७६८२९
४	२००७ - ०८	२००००००	५००००००	४०३२४१९
५	२००८ - ०९	५००००००	०	०
६	२००९ - १०	१३२२०००	१०३००००	१०२९३२५
	एकुण	२४८२२०००	११४३००००	८४८८८४०

३) कामाशी संबंधीत तत्कालीन अधिकारी :-

सदर कामासाठी तत्कालीन अधिकारी खालीलप्रमाणे.

सदर प्रकल्पासाठी तत्कालीन अधिकारी		
१.	उपअभियंता	श्री. प्रविण काळुस्कर
२.	कार्यकारी अभियंता	श्री. महाडीक (अंदाजपत्रक), श्री. श्रीकांत सवणे (कार्यादेश)
३.	शहर अभियंता	श्री. एकनाथ उगीले
४.	मा. आयुक्त	श्री.दिलीप बंड

४) बीओटी पध्दतीने भाडेकरार कालावधी ७० वर्षे इतका कसा निर्धारीत केला :-

बीओटी वरील प्रकल्प प्रस्तावास मा.मनपा सभा ठराव क्र ५१०४, दि. ०९/०२/२००४ अन्वये बीओटी तत्वावरील जागा ९९ वर्षांचे कराराने हस्तांतरीत करणेस मान्यता देणेत आली आहे.

सदरचा प्रकल्प दि. २८/०७/२०१७ रोजी पूर्ण करणेत आले असून मनपाचे भुमी आणि जिंदगी विभागाकडे पुढील कार्यवाहीकामी दि. १८/०९/२०१७ हस्तांतरीत करणेत आला. सद्यस्थितीमध्ये प्रकल्पाचा वरील मजला पोलीस आयुक्तालय कार्यालयासाठी देणेत आलेला आहे व तळ मजल्यावरील व्यावसायिक गाळे वितरीत करणेचे काम भूमि जिंदगी विभागामार्फत करणेत येत आहे.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८

११५

भाग ब – बीओटी विभागामार्फत करणेत आलेली कार्यवाही

१.	बीओटी तत्वावरील प्रशासकीय मान्यतेचा ठराव	मनपा सभा ठराव क्र ५१०८, दि. ०९/०२/२००४ बीओटी तत्वावरील जागा ९९ वर्षाचे कराराने हस्तांतरीत करणेस मान्यता.
२.	पुढील कामासाठी मनपा अंदाजपत्रकामध्ये तरतुद	मनपाची आर्थिक स्थितीमुळे उर्वरीत प्रकल्प बीओटी तत्वावर करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेत आला.
३.	बीओटी तत्वावर निविदेस मान्यता	दि. १८/०७/२००९ चे बीओटी कमिटीची मिटींग
४.	प्रथम निविदा प्रसिध्दी	दि. २१/०८/२००९ स्विकृतीची मुदत मुदतवाढीसह दि. ०५/११/२००९
५.	एकुण प्राप्त प्रस्ताव	०४ पैकी ०२ पात्र प्रस्ताव कमी किंमतीचा असल्याने दि ०५/२/२०१० रोजीच्या बीओटी कमिटीमध्ये फेर निविदा मागविण्याचा निर्णय
६.	फेर निविदा प्रसिध्दी	दि. २५/२/२०१० स्विकृतीची मुदत मुदतवाढीसह दि ३१/०५/२०१०
७.	एकुण प्राप्त प्रस्ताव	०४ पैकी पात्र ०१ प्रस्ताव मे इंटरनॅशनल कन्व्हेअर लि. यांचा रक्कम रूपये ५.९५ कोटीचा प्रस्ताव.
८.	LOI (Letter of Intent)	दि. २३/९/२०१० रोजीचे बीओटी कमिटीमध्ये मान्यता. त्यानुसार दि १९/१०/२०१० रोजी LOI देण्यात आला.
९.	शासनस्तरावर मा. मुख्यमंत्री महोदयांकडुन तसेच श्री विलास लांडे व इतर विधानसभा सदस्य यांनी तारांकित प्रश्न क्र २३९००	अनुषंगिक खुलासा दि. २८/२/२०११ व दिनांक २८/१/२०१३ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र शासनाकडे सदर करणेत आलेला आहे.
१०.	बीओटी कमिटी	दिनांक १२/०७/२०१३ रोजीचे बीओटी कमिटीतील निर्णयानुसार विकसकास देण्यात आलेला LOI रद्द करणेत येऊन प्रकल्प मनपा फंडातुन राबविणे बाबतचा निर्णय घेण्यात आला.
११.	LOI रद्द करणे.	मे. इंटरनॅशनल कन्व्हेअर लि यांना दि. ७/८/२०१३ रोजीच्या पत्रान्वये प्रकल्पाचा LOI रद्द करणेत येत असले बाबत कळविणेत आले.
१२.	मा. असिस्टंट ऑडिट ऑफिसर मा. महालेखाकार कार्यालय मुंबई यांचेकडील आपेक्षा बाबतचे पत्र	दिनांक १२/७/२०१३ रोजीचे बीओटी कमिटीतील निर्णयानुसार विकसकास देण्यात आलेला LOI रद्द करणेत येऊन प्रकल्प मनपा फंडातुन राबविणे बाबतचा निर्णय घेण्यात आला. येणेप्रमाणे दि ३/४/२०१४ रोजी आक्षेप पुर्तता खुलासा अहवाल मान्यतेकामी सादर.
१३.	नगरविकास विभागाकडील पत्र क्र लोलेस २०१५ / प्र.क्र २४ / नवि – ३१, दि. २७/१०/२०१५ अन्वये खुलासा	दि. ३१/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे अहवालातील परिच्छेद क्र ४.८बाबत स्पष्टिकरणात्मक ज्ञापन नगरविकास विभागाकडे सादर. (प्रपत्र १ ते ११सह)
१४.	मा. असिस्टंट ऑडिट ऑफिसर यांचेकडील स्थानिक लेखापरिक्षा अहवालातील लेखा परिच्छेद क्र ४.८ मधील दि. २८/१/२०१६ रोजीच्या आपेक्षा बाबतचे पत्र	सदर बाबतचा खुलासा दि. १३/५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सादर करणेत आला.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

-२५१

भाग अ – निविदा पध्दतीने करणेत आलेली कार्यवाही

१.	जागेचे क्षेत्रफळ	३३६४.६२ चौ.मी.
२.	जागेचे आरक्षण	क्र. २११. दुकानदारांचे पुर्नवसन करीता
	अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र	१.००
	कामास प्रशासकीय मन्यता	र.रू १.९६ कोटी
	मनपा सभा ठराव	४८९१, दि. १३/०६/२००३
	प्रकल्पास वास्तुविशारद नेमणुक प्रस्ताव मान्यता	दि. २९/११/२००३
	मास्थायी समिती मान्यता ठराव	५०४४, दि. १६/१/२००४
	वास्तुविशारदास कामाचे आदेश	दि.२५/०२/२००४
	बांधकाम परवानगी	दिनांक ३१/०३/२००४
	तांत्रिक मान्यता	क्र. शअ/तांमा/७९/२००४-०५, दि. २५/०१/२००५
	प्रकल्पाचे अंदाजपत्रकाकरीता तत्कालीन अधिकारी	१) उपअभियंता - श्री. प्रविण काळुस्कर २) कार्यकारी अभियंता - श्री. विठ्ठल महाडीक ३) शहर अभियंता - श्री. एकनाथ उगीले ४) आयुक्त - श्री. दिलीप बंड
	निविदा क्रमांक	४१/१-२००४-०५
	निविदा रक्कम	र.रु. १,४१,६२,१०९/-
	निविदा विक्री	दि. ३/२/२००५ ते २/३/२००५
	निविदा स्वीकृती	दि. ०९/३/२००५ ते ११/३/२००५
	निविदा उघडणे	दि. १६/०३/२००५
	निविदा ग्राह्यता कालावधी	दि. १३/७/२००५ पर्यंत
	निविदेस मान्यता	१२/०९/२००५
	मास्थायी समिती मान्यता ठराव क्र .	११२६६, दि. ०५/१०/२००५
	करारनामा दि.	दि. १९/१०/२००५
	कामाचे ठेकेदार	मे.बी.के.खोसे
	कामाचे आदेश दि.	दि. २८/१०/२००५
	सदर प्रकल्पासाठी तत्कालीन अधिकारी	१) उपअभियंता - श्री. प्रविण काळुस्कर २) कार्यकारी अभियंता - श्री. श्रीकांत सवणे ३) शहर अभियंता - श्री. एकनाथ उगीले ४) आयुक्त - श्री. दिलीप बंड

अंदाजपत्रकीय तरतुद व खर्चाचा तपशिल

अक्र.	वर्ष	मुळ तरतुद	सुधारीत तरतुद	खर्च
१	२००४ ०५ -	०	०	२४२१३४
२	२००५ - ०६	१५०००००	२५०००००	३०८१३३
३	२००६ - ०७	१५००००००	२९०००००	२८७६८२९
४	२००७ - ०८	२००००००	५००००००	४०३२४१९
५	२००८ - ०९	५००००००	०	०
६	२००९ १० -	१३२२०००	१०३००००	१०२९३२५
	एकुण	२४८२२०००	११४३००००	८४८८८४०

	कामाची मुदत	१५ महिने
	कामास मुदत वाढ	दि.२२.११.२००७
३.	प्रकल्पावर स्थापत्य विभागा मार्फत करणेत आलेला खर्च (भाववाढसह)	र.रु. ८५,००,०००/-
४.	बिल अदायगी दिनांक	२७.०२.२००८
५.	बिल अदायगी अधिकारी	१) कनिष्ट अभियंता – श्री. कुदळे एस.एम २) उपअभियंता - श्री. एस.एम रत्नपारखी ३) कार्यकारी अभियंता - श्री. दुबे

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

११६

भाग ब – बीओटी विभागामार्फत करणेत आलेली कार्यवाही

१.	बीओटी तत्वावरील प्रशासकीय मान्यतेचा ठराव	मनपा सभा ठराव क्र ५१०८, दि. ०९/०२/२००४ बीओटी तत्वावरील जागा ९९ वर्षाचे कराराने हस्तांतरीत करणेस मान्यता.
२.	पुढील कामासाठी मनपा अंदाजपत्रकामध्ये तरतुद	मनपाची आर्थिक स्थितीमुळे उर्वरीत प्रकल्प बीओटी तत्वावर करणेबाबत धोरणात्मक निर्णय घेणेत आला.
३.	बीओटी तत्वावर निविदेस मान्यता	दि. १८/०७/२००९ चे बीओटी कमिटीची मिटींग
४.	प्रथम निविदा प्रसिध्दी	दि. २१/०८/२००९ स्विकृतीची मुदत मुदतवाढीसह दि. ०५/११/२००९
५.	एकुण प्राप्त प्रस्ताव	०४ पैकी ०२ पात्र प्रस्ताव कमी किंमतीचा असल्याने दि ०५/२/२०१० रोजीच्या बीओटी कमिटीमध्ये फेर निविदा मागविण्याचा निर्णय
६.	फेर निविदा प्रसिध्दी	दि. २५/२/२०१० स्विकृतीची मुदत मुदतवाढीसह दि ३१/०५/२०१०
७.	एकुण प्राप्त प्रस्ताव	०४ पैकि पात्र ०१ प्रस्ताव मे इंटरनॅशनल कन्व्हेअर लि. यांचा रक्कम रूपये ५.९५ कोटीचा प्रस्ताव.
८.	LOI (Letter of Intent)	दि. २३/९/२०१० रोजीचे बीओटी कमिटीमध्ये मान्यता. त्यानुसार दि १९/१०/२०१० रोजी LOI देण्यात आला.
९.	शासनस्तरावर मा. मुख्यमंत्री महोदयांकडुन तसेच श्री विलास लांडे व इतर विधानसभा सदस्य यांनी तारांकित प्रश्न क्र २३९००	अनुषंगिक खुलासा दि. २८/२/२०११ व दिनांक २८/१/२०१३ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र शासनाकडे सदर करणेत आलेला आहे.
१०.	बीओटी कमिटी	दिनांक १२/०७/२०१३ रोजीचे बीओटी कमिटीतील निर्णयानुसार विकसकास देण्यात आलेला LOI रद्द करणेत येऊन प्रकल्प मनपा फंडातुन राबविणे बाबतचा निर्णय घेण्यात आला.
११.	LOI रद्द करणे.	मे. इंटरनॅशनल कन्व्हेअर लि यांना दि. ७/८/२०१३ रोजीच्या पत्रान्वये प्रकल्पाचा LOI रद्द करणेत येत असले बाबत कळविणेत आले.
१२.	मा. असिस्टंट ऑडिट ऑफिसर मा. महालेखाकार कार्यालय मुंबई यांचेकडील आपेक्षा बाबतचे पत्र	दिनांक १२/७/२०१३ रोजीचे बीओटी कमिटीतील निर्णयानुसार विकसकास देण्यात आलेला LOI रद्द करणेत येऊन प्रकल्प मनपा फंडातुन राबविणे बाबतचा निर्णय घेण्यात आला. येणेप्रमाणे दि ३/४/२०१४ रोजी आक्षेप पुर्तता खुलासा अहवाल मान्यतेकामी सादर.
१३.	नगरविकास विभागाकडील पत्र क्र लोलेस २०१५ / प्र.क्र २४ / नवि – ३१, दि. २७/१०/२०१५ अन्वये खुलासा	दि. ३१/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये भारताचे नियमक व महालेखापरिक्षक यांचे अहवालातील परिच्छेद क्र ४.८बाबत स्पष्टिकरणात्मक ज्ञापन नगरविकास विभागाकडे सादर. (प्रपत्र १ ते ११सह)
१४.	मा. असिस्टंट ऑडिट ऑफिसर यांचेकडील स्थानिक लेखापरिक्षा अहवालातील लेखा परिच्छेद क्र ४.८ मधील दि. २८/१/२०१६ रोजीच्या आपेक्षा बाबतचे पत्र	सदर बाबतचा खुलासा दि. १३/५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सादर करणेत आला.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

भाग क – उर्वरीत काम करणेसाठी स्थापत्य विभागामार्फत करणेत आलेली कार्यवाही

१.	बीओटी तत्वावरील प्रस्ताव रद्द करून विकसीत करणेबाबतचा निर्णय	दि. १५/०६/२०१५
२.	स्थापत्य विभागामार्फत उर्वरीत प्रकल्प पुर्ण करणेसाठी प्रशासकीय मान्यता	मनपा सभा ठराव क्र ६६३, दि. ०६/०४/२०१५
३.	स्थापत्य विभागामार्फत उर्वरीत प्रकल्प पुर्ण करणेसाठी तांत्रिक मान्यता	Vide CE/B ward/TSR/154/2015, र.रू. १,५८,५०,०००/-
४.	स्थापत्य विभागामार्फत उर्वरीत प्रकल्प पुर्ण करणेसाठी निविदा	३७/०१-२०१५-१६
५.	स्थापत्य विभागामार्फत उर्वरीत प्रकल्प पुर्ण करणेसाठी निविदा रक्कम	र.रू. १,५८,५०,०००/-
६.	कामाचे आदेश	दि. १६/०२/२०१६
७.	ठेकादाराचे नाव	मे. ए. आर. नायडु
८.	कामाची मुदत	१८ महिने
९.	प्रकल्पावर झालेला खर्च	र.रू. १,४४,६२,८६३/-
१०.	काम पुर्णत्वाचा दि.	दि. २८/०७/२०१७
११.	प्रकल्पाचे भुमी आणि जिंदगी विभागाकडे हस्तांतरण	दि. १८/०९/२०१७

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
चिंचवड - ३३

परिशिष्ट-ब

(शा.म.मु.) एचबी १४१९–८ (७००—११-२०१८)

बुधवार, दिनांक ६ जून, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ६ जून, २०१८ रोजी विधान भवन,मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरू होऊन दुपारी २.३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(६) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(७) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(८) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(९) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१०) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(११) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(१२) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री.कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री.सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रितः-

महालेखाकार कार्यालय :

(१) श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार कार्यालय

(२) श्री.सतीश नानाजी वासनिक, उप महालेखाकार, नागपूर

वित्त विभाग :-

श्री.नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

नगरविकास विभाग :-

(१) श्रीमती मनिषा म्हैसकर, प्रधान सचिव, नगरविकास विभाग

(२) श्री.अश्विन अ.मुडगल, सभापती, ना.सु.प्र. नागपूर

(३) श्री.बालाजी खतगांवकर, आयुक्त, मिरा-भाईदर महानगरपालिका

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ च्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. ४.३, ४.५ व ४.६ संदर्भात प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २६ जून, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २६ जून, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरु होऊन दुपारी २.३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री.राजेंद्र पाटणी, वि.स.स. तथा कार्यकारी समितीप्रमुख

सदस्य :

(२) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(३) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(४) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(५) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(७) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(८) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(२) श्री.सो.न.सानप, अवर सचिव.

(३) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी.

निमंत्रितः-

महालेखाकार कार्यालय :

(१) श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार कार्यालय

(२) श्री.सतीश नानाजी वासनिक, उप महालेखाकार, नागपूर

वित्त विभाग :-

श्री.नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

नगरविकास विभाग :-

(१) श्रीमती मनिषा म्हैसकर, प्रधान सचिव, नगरविकास विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ च्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. ४.८ व ४.९ संदर्भात प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक २९ ऑगस्ट, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २९ऑगस्ट, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरु होऊन दुपारी २.३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१२) श्री. शंभूराज देसाई, वि.स.स.

(१३) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१४) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री.अ.चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री.सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रितः-

महालेखाकार कार्यालय :

(१) श्री. यशवंत ठाकरे,प्रधान महालेखाकार, मुंबई

वित्त विभाग :-

(१) श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

नगरविकास विभाग :-

(१) श्री.नितीन करीर, प्रधान सचिव, नगरविकास विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ च्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. ४.५ संदर्भात प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.३० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(४) डॉ.सुनिल देशमुख, वि.स.स.

(५) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(६) श्री.विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(७) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री.सो.न.सानप, अवर सचिव

(३) श्री.रवींद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र ४.३, ४.५, ४.६, ४.८ व ४.९ नगरविकास विभागाशी संबंधित समितीने तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत करण्यात आला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई